# मासलेवाईक प्राणी

( स्वभाव चित्रें )

शालेय प्रत

रघुवीर सामंत



पहिले सात

[ तज्ज्ञांच्या मार्गदर्शनासह ] ★ [ पुष्प ११ वें ]

[ आठव्या-नवव्या यत्तांसाठीं पुरवणी वाचन ]



कुमार श्रेणी

रघुवीर सामंत

# मासलेवाईक प्राणी



# मासलेवाईक प्राणी

( स्वभाव चित्रें )

शालेय प्रत

रघुवीर सामंत

# मासलेवाईक माणसें

( स्वभाव चित्रें )



रघुवीर सामंत

—पारिजात प्रकाशन—पुष्प ७ वें—द्वितीय आवृत्ति—

ओ ळ ख तां ?

रघुवीर सामंतांची

उ
प
का
री

मा
ण
सें

प्रवासांतील सोबती
अभ्रपटल
आकाशगङ्गा

मराठींतील एक अभिनव

प्रदीर्घ सामाजिक कादंबरी

तीन खंड : डेमी ७८० पृष्ठें; अँ. कागद; कापडी बांधणी

— पारिजात प्रकाशन —

ओळखीची वाटतील !

# मासलेवाईक बाजी
## ( स्वभाव चित्रें )

प हि ले सा त

लेखक

रघुवीर सामंत

[ आठव्या-नवव्या यत्तांना पुरवणी वाचनालायक ]

★

— विद्यार्थी-मार्ग दर्शन —


**श्री. भिवाजी अर्जुन परब, एम्. ए., एस्. टी. सी.**

[ मराठीचे अध्यापक, चिकित्सक स. शि. हायस्कूल, मुं. ४. ]

**श्री. रघुवीर सामंत, बी. ए. बी. टी.**

[ माजी मराठी अध्यापक, चिकित्सक स. शि. हायस्कूल, मुं. ४. ]



दीपावलि १८७३ ] पुष्प ११ वें [ मूल्य १५ आणे

—अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन—

किशोर श्रेणी - - मनोरंजन

सौ. स्नेहल सामंत, पी. ए.
यांनीं
अमर ज्योति वाङ्मय प्रकाशनसाठीं
१४बी, हरजीवनदास एस्टेट,
व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४,
येथें प्रसिद्ध केलें.

या व पुढील सर्व आवृत्त्यांचे सर्व प्रकारचे हक्क
संचालक 'अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन' यांजकडे

**मासलेवाईक प्राणी–पहिले सात**

| | |
|---|---|
| १ शिस्तीचा शिलेदार | ४ स्थितप्रज्ञ |
| २ फणसाचे गरे | ५ परमेश्वरी प्रकाश |
| ३ कावळे हेडसर | ६ बाबूजी |
| ७ न्याय–देवता. | |

श्री. रघुनाथ ज. सामंत, बी.ए.बी.टी.
यांनी
सागर साहित्य छापखाना,
२०, त्रिभुवन रोड, मुंबई ४,
येथें मुद्रित केलें.

# मासलेवाईक प्राणी
## ( पहिले सात )
## [ पहिली ओळख ]

या पुस्तकांत सात व्यक्तिचित्रें दिलीं आहेत. तीं वाचलीं असतां निरनिराळ्या सात व्यक्ति डोळ्यापुढें उभ्या राहतात. या सात व्यक्ति म्हणजे मनुष्यस्वभावाचे मासलेच होत. कुणाची शरीरयष्टि स्पष्टपणें दृष्टीसमोर उभी राहते, तर कुणाची चेहरेपट्टीच मनांत भरते; कुणाच्या करड्या स्वभावाची मनावर छाप बसते, तर कुणाच्या दिलदार स्वभावानें चित्त सुखावतें. संसार स्वप्नासारखा चालवून स्थितप्रज्ञाप्रमाणें वागणाऱ्या व्यक्तीचें दर्शन घडतांच मन गंभीर होतें. या व्यक्तींत फार दुर्दैवी प्राण्याचाहि नमुना आढळतो. दुसऱ्यांचा संसार आपलाच मानून त्यांच्या सुखदुःखाशी तन्मय होणारा एकाकी जीवन जगणारा कारकून या सातजणांतच आहे; त्याला पाहून, दुसऱ्यांना सुखवून आपण सुखी व्हावें, असें वाटल्याशिवाय राहत नाहीं. सातवी व्यक्ति न्यायाधीश; होय, तिचें पुसट दर्शन होतांच 'वेळेचें इतकें का महत्त्व आहे?' असे नकळत उद्गार निघतात.

अशीं हीं सात माणसें वाचकापुढें उभीं करतांना श्री. सामंत यांनीं कुशल चित्रकाराचा मार्ग चोखाळला आहे. चित्रकार रंग वापरतो, छायाप्रकाश खेळवून आपले रंग उठावदार व परिणामकारक होतील अशी खबरदारी घेतो. हे आणि असे दुसरे प्रयत्न करून त्याला तसबीरींतील व्यक्तीचा चेहरा तेवढा विशेषत्वें चितारतां येतो. त्या चेहऱ्यावरून त्या व्यक्तीच्या स्वभावाची ओळख होते, पण ती वरवरची असते. अशा चेहरेपट्टीवरून त्या चित्रगत व्यक्तीच्या स्वभावाच्या नाना छटा दृग्गोचार होणें शक्य नाहीं, तसेंच त्या व्यक्तीच्या चांगुलपणाचें, दुबळेपणाचें, वैगुण्याचेंहि दर्शन घडणें अशक्य. पण व्यक्तिचित्र रेखाटणाऱ्या कलमबहाद्दराची गोष्ट त्याहून भिन्न आहे. तो शब्दांच्या कुशल योजनेनें व्यक्तीचें सर्वांगदर्शन घडवूं शकतो. मात्र असें करतांना तो आपलें चित्र प्रभावी होईल अशा प्रकारेंच व्यक्तींच्या विविध अंगांची निवड करतो व त्यांचें मोजक्या व परिणामकारक शब्दांत वर्णन करतो; त्यामुळें त्याला संपूर्ण 'व्यक्ति' वाचकापुढें उभी करतां येते. चितारायच्या व्यक्तीच्या वर्तनाच्या, संवादाच्या, चालण्याबोलण्याच्या लकबी लेखकाला वर्णन करतां येतात; तो त्या व्यक्तीच्या भूतवर्तमान काळांचें

दर्शन घडवून त्याच्या भविष्याचीहि कल्पना आणून देतो. शद्वांनीं काढलेलें व्यक्तिचित्र हें रंगांनीं काढलेल्या तसबिरीपेक्षां निःसंशय अधिक पूर्ण व प्रभावी असतें. छायाचित्रांतील व्यक्तिमत्त्व असतें त्याहून हातानें काढलेल्या तसबिरींतील व्यक्तिदर्शन अधिक सखोल असतें, आणि कवीनें प्रतिभेनें निर्मिलेलें शद्वचित्र छायाचित्रापेक्षां व तसबिरीपेक्षां शतपटीनें श्रेष्ठ असतें.

श्री. सामंतची कला शद्वचित्रकाराची आहे. त्यांनीं निर्मिलेलीं व्यक्तिचित्रें बहुधा तैलचित्रासारखीं आहेत; त्यांत छायाचित्रकाराची सफाई आढळत नाहीं त्याप्रमाणेंच छायाचित्रकाराची क्षणिक परिणामकारकता किंवा उथळपणा दिसत नाहीं. तैलचित्र अगदीं जवळून पाहून चालणार नाहीं. तें किंचित दुरून पाहावें लागतें. या पुस्तकांतील व्यक्तिचित्रें एकदां वाचल्यावर जर वाचकानें मन अंतर्वक्र करून तीं पाहिलीं तर त्यांतील मासलेवाईक माणसें अधिक पूर्णतेनें डोळ्यापुढें उभीं राहतात. याचें एक कारण असें आहे कीं, व्यक्तीचें वर्णन करतां करतां शद्व अपुरे पडून तिथें रेघा आणि टिंबें दिलीं आहेत. श्री सामंतांच्या व्यक्तिचित्रणांत रेघांना व टिंबांना फार मोठें महत्व असतें; जें शद्वांनींहि प्रकट करतां येत नाहीं तें श्री. सामंत रेघांटिंबांनीं निर्दिष्ट करतात.

हीं व्यक्तिचित्रें ठळक दिसावींत म्हणून लेखकानें कसून काळजी घेतली आहे. प्रत्येक व्यक्तिचित्राचें नांव देतांना लेखकानें अशी खबरदारी घेतली आहे कीं तें व्यक्तिचित्र वाचल्यावर त्या नांवांत असलेली सूचकता व अर्थ वाचकाला एकदम संपूर्णतया दृग्गोचार व्हावा. या नावांपैकीं 'फणसाचे गरे' हें नांव तर या दृष्टीनें नमुनेदार आहे. या नांवामुळेंच प्रसंगवजा वाटणारें व्यक्तिचित्र पूर्णतया वाचकाला दिसतें; चित्रगत व्यक्तीच्या स्वभावाचे विशेष ठळकपणें दिसतात, आणि फणसाचे बाह्य कांटे व अंतर्गत रसाळपणा यांचा लेखकानीं कसा खुबीनें उपयोग केला आहे तें चांगल्या रीतीनें लक्षांत येतें. श्री सामंतांनी व्यक्तिचित्रांचीं नांवें किती कुशलतेनें योजलीं आहेत तें पहायचें असल्यास, नांवें न वाचतां कांहीं व्यक्तिचित्रें वाचावीं व नंतर त्यांचीं नांवें वाचावीं. 'शिस्तीचा शिलेदार,' 'स्थितप्रज्ञ,' 'न्यायदेवता' वगैरे नांवें सूचक व सार्थ आहेत.

या व्यक्तिचित्रांच्या शीर्षकांची सूचकता व सार्थता हाच तेवढा या कलाकृतींचा विशेष आहे असें नाहीं. व्यक्तिचित्र निर्मितांना मानवी स्वभाव निर्दिष्ट करण्यासाठीं मनाचे कप्पे उकलून दाखविणारे संवाद लेखकानें प्रसंगोपात्त योजले आहेत. चितारायच्या व्यक्तीच्या तोंडीं. तिच्याबरोबर



बोलणाऱ्या इसमांच्या बोलण्यांत, तिच्याविषयीं अप्रत्यक्ष बोलणाऱ्यांच्या संभाषणांत असे शद्व योजले आहेत, कीं स्वभावपरिपोष व्हावा, मानवी मनाच्या अंतरंगाचें दर्शन व्हावें, आणि ते शद्व उच्चारतांना त्या त्या व्यक्तीच्या तोंडून विशिष्ट 'आवाज' किंवा 'आवाजाची लकब' वाचकाला ऐकू येते, त्यामुळें ती व्यक्ति प्रत्यक्ष जगांत वावरत आहे असें वाटतें. 'शिस्तीचा शिलेदार,' 'बाबूजी,' 'कावळे हेडसर,' फार काय 'न्यायदेवता' सुद्धां या बाबतींत पारखून पहा—म्हणजे सवादांतील शद्वयोजना व विशिष्ट लकबी केवळ त्या व्यक्तींच्या स्वभाववर प्रकाशाचा झोत टाकून मानवी मनाचें दर्शन मोठ्या खुबीनें करीत असल्याचें दिसून येईल. कठोरपणा, सरळपणा, उदारपणा वगैरे गुण दाखविणारी शद्वयोजना व्यक्तिचित्र उठावदार करतें 'कावळे हेडसर' मधील संवाद पाहिल्यास त्यांत तुम्हांला 'कावळे'चें व्यक्तित्व, त्याच्या स्वभावाच्या छटा उकलून दाखविल्याचें दिसेल. दुसरें नुसत्या निर्भयवजा स्वभाववर्णनामुळें उत्पन्न होणारी रुक्षता श्री. सामंतांनीं कटाक्षानें टाळली असून जिथें संवादाला फारसा अवसर नाहीं, तिथें त्रोटक संवाद देऊन सूचकता साधली आहे. उदा. "न्यायदेवता" या चित्रांतील संवाद पहावेत. हें व्यक्तिचित्र अगदीं लहान असतांहि 'न्यायदेवते'ची मूर्ति, न्यायाधीशाचें व्यक्तित्व त्रोटक संवादांमुळेंच मनांत भरण्याइतकें प्रभावी झालें आहे. 'बाबूजी' हें व्यक्तिचित्र म्हणजे श्री. वि. द. घाटे यांच्या 'कारकुना'चा व्यत्यास आहे. श्री. घाटे यांचा कारकुन एकाकी व दुःखी आहे, त्याच्या अंतसमयीं त्याचें जीवन दुःखी करणारें रहस्य उघडें पडतें. 'बाबूजी' एकाकी आहेत, पण त्यांचा मित्रसमुदाय फार मोठा. त्यामुळें सदा त्यांच्या घोळक्यांत बाबूजी दुःखी नाहींत, सर्वांना सुखवीत, हंसवीत ते इहलोक सोडून जातात; शेवटीं म्हणजे मेल्यावरहि ते सर्वांना हसवितात. असा हा मासलेवाईक कारकून चितारतांना श्री. सामंतांनीं संवादाचा चांगला उपयोग केला आहे.

हे सात मासलेवाईक प्राणी अलौकिक आहेत असें नाहीं. हीं सात माणसें असामान्य नसलीं तरी त्यांचें चित्रण असामान्य आहे. त्यामुळें हीं व्यक्तिचित्रें पाहिलीं असतां मनुष्यस्वभावाचे मनोहर नमुने नव्यानेंच दिसतात. या नाविन्याचें कारण लेखकानें योजलेल्या पार्श्वभूमीत आहे. उदाहरणार्थ, 'शिस्तीचा शिलेदार' मध्यें खेडेगांवच्या दुपारच्या रखरखीत उन्हाचें वर्णन केलें आहे त्यामुळें काकाजींचा करडा स्वभाव अधिक करडा असल्याचा प्रत्यय येतो. 'स्थितप्रज्ञां' तील अण्णांच्या पत्नीच्या

आजाराची कथा अशीच परिणामकारक आहे व तीमुळें अण्णांची स्थितप्रज्ञता उत्कटतेनें प्रत्ययास येते. 'फणसाचे गरे' यांतील पार्श्वभूमीचें वातावरण फार कुशलतेनें चितारलें असल्यामुळेंच सामान्य प्रसंगावर आधारलेलें हें स्वभावचित्र गऱ्यांप्रमाणें 'गोड' उतरलें आहे.

श्री. सामंतांच्या या मासलेवाईक प्राण्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पाहण्यासारखा आहे. 'शिस्तीचा शिलेदार' अर्थात् चोख व्यवहाराचा, कडक शिस्तीचा भोक्ता आहे. 'फणसाचे गरे' चाखणाऱ्यास जगांत गैरसमजामुळें उत्पन्न होणाऱ्या कटुतेची गंमत वाटेल. आणि आपण दुसऱ्याच्या जागीं राहून विचार केल्यास गैरसमजांस जीवनांत स्थान नाहीं हे व दुसरे विचार सुचतील. 'स्थितप्रज्ञा'च्या दृष्टीनें जगाकडे पाहिल्याशिवाय अभागी जीवाला जीवन जगणें कठिण आहे व बाबूजीप्रमाणें दुसऱ्यांना सुखविण्यांत व हसविण्यांतहि सुख आहे असें विचारी वाचकास अधिकाधिक पटूं लागतें. असा विविध जीवनविषयक दृष्टीकोन हीं व्यक्तिचित्रें वाचतांना दिसून येतो. त्याचा मुख्य विशेष म्हणजे तो निरोगी आहे. जीवन अधिक सुखकारक व सुसह्य करण्याचें सामर्थ्य त्यांत सांठविलेलें आहे. 'परमेश्वरी प्रकाशां'ल दुर्दैवी प्राण्याचेंहि चित्र याला अपवाद नाहीं. कारण तें व्यक्तिचित्र रेखाटतांना लेखकानें अंगीकारलेला जीवनविषयक दृष्टिकोन सहानुभूतीचा, माणुसकीचा आहे. तो पाहतां जगांतील दुर्भागी जीवांकडे कसें पाहावें हें कळून चुकतें.

असो. विद्यार्थ्यांनी या व्यक्तिचित्रांविषयीं स्वतःच सर्व प्रकारें विचार करावा. तथापि, श्री. सामंतांच्या मासलेवाईक प्राण्यांची ही ओळखहि विद्यार्थ्यांस मार्गदर्शक होईल अशी आशा आहे.

**भि. अ. परब.**

---

# शिस्तीचा शिलेदार ★ १

त्या तेवढ्या तेवढ्या टापूंत काकाजी नुसते प्रसिद्धच नव्हते; त्यांचं नांव उच्चारलं कीं लहानांपासून थोरांपर्यंत, गरिबांपासून त्यांच्याबरोबरीच्या श्रीमंतांपर्यंत साऱ्यांच्याच अंगाचा अगदीं थरकांप होई!

स्टेशनवर उतरून त्यांचं नांव उच्चारलं, कीं कोणताही टांगेवाला, कांहीं न बोलतां, आपला टांगा समोर आणून उभा करील; नवखेपणाचा गैरफायदा घेण्याचा मोह आंतल्या आंत दडपील; दुसऱ्या 'पासिंदरा'ची वाट पहाणार नाहीं; कमींतकमी भाड्यांत शक्य तितक्या लौकर काकाजींच्या (तीन मैलावरील खेड्यांतल्या) घरासमोरच्या फाटकाशीं पाहुण्याला नेऊन सोडील; त्याची बॅगही उचलून घरांत नेईल.— अशी चौफेर ख्याति...

एखादा टांगेवाळाच इतका सुतासारखा सरळ वागे, असं नाहीं. हातांतला सोटा (साधारणतः बंदुकीप्रमाणें) खांद्यावर टाकून, आपल्या बंगल्याभोंवतीं-वाडींत किंवा आसपास-- काकाजींची काटकोळी काटक मूर्ती फिरूं लागली, कीं, कारण नसतां, त्यांच्या दृष्टिपथांत आपण न पडण्याची, त्या खेड्यांतला जो तो खूपच खबरदारी घेई—

तो हातांतला जाडजूड सोटा मारण्यासाठीं नसे, हें अगदीं साऱ्यांना ठाऊक होतं; पण त्यांच्या प्रश्नांचा भडिमारच अधिक भीति उत्पन्न करणारा असे. त्यांच्या शब्दांतील खोंच, अगदीं अंकुशाप्रमाणें–किंवा त्या खेडेगावांत बैलासाठीं वापरत त्या पराणीप्रमाणें–अगदीं बोंचक असायची!

लोक खूप लांब लांब पळोत, काकाजींना तें कुठलं पसंत पडायला? जगांत कुठंही खुट् झालं तरी त्याचा पडसाद त्यांच्या मनांत उठणार! प्रत्येकाच्या आयुष्यांत काय नि कसं चाललं आहे, याविषयीं पूर्ण समाधान झाल्याशिवाय, त्यांना कुठली चैन पडायला? म्हणूनच, त्यांचं कुतुहल नेहमीं चौकसपणें नि चोख काम करी.

काकाजी झोंपत तेवढाच वेळ काय तो, त्यांच्या भोंवतालच्या जगाला (मन मानेल तसं वावरायला) मोकळीक वाटे; पण त्यांची झोंपहि फारच थोडी!— दुपारीं वामकुक्षी एखादा तास आणि रात्रींचा चार पांच तास...

तेव्हां काकाजींच्या भोंवतालच्या जगाला, नाइलाजानें कां होईना, काकाजींच्या शिस्तीच्या जगांतच रहावं लागे. म्हणूनच—साऱ्यांना आपल्या या अनभिषिक्त शिलेदाराचा मनांत थरकांप दरारा वाटे!

— २ —

आपल्या बंगल्याच्या ओसरींत, कोपऱ्यांतल्या खिडकीजवळ टाकलेल्या कोचावर, काकाजी वामकुक्षीसाठीं पसरत. त्यांचे डोळे मात्र, एखाद्या इमानी कुत्र्यासारखे सदा जागरूक नि किलकिले! आपल्या मनांतल्या स्वप्नसृष्टींत व बाहेरच्या प्रत्यक्ष जगांत, मोठ्या जागरूकपणें, ते तशी आपली दृष्टि एकाच वेळीं एकदम फिरवीत!

अशा दुपारच्या वेळीं, त्या खेडेगावांत उन्हं रखरखीत तापलेलीं असत. तेथील एकमेव मोठा रस्ता लांबपर्यंत सरपटत जाऊन अजगरासारखा स्वस्थ पडलेला भासे; दोन्हीं बाजूच्या झाडांच्या छायांचे किंवा क्वचित् उन्हानें पाण्यासाठीं वखवखलेल्या ढोरांच्या कळपांचे त्यावर तुरळक हलते ठिपके दिसत.

पण हीं रवंथ करीत बसलेलीं गुरंसुद्धां, त्यावेळीं अगदीं चाहूल न लावतां गप्प बसत. मधून मधून भयभीत-भरल्या अंतःकरणानें...मोठमोठे सुस्कारे टाकीत. जणूं काय, त्यांनाही मनांत भीति वाटे,—"आपण उगीच हालचाल केली तर कोचावर किलकिले डोळे करून वरवर स्वस्थ पडलेला हा खाष्ट थेरडा आपल्यालाहि एकदम चौकसपणें प्रश्न विचारील, ‘कोण रेऽ कोणच्या गांवचा तूं? कोण, तुझा धनी कोण?"

त्यांत नवल नव्हतं; कारण, तिथं बसल्या बसल्या त्या उसाट ढोरांना मिळणारा तो नित्याचा ठराविक अनुभवच! कोणी (तहानेनें व्याकुळ) वांटसरू मागच्या बाजूला असलेल्या विहिरीकडे फाटक लोटून हळूच जाऊं लागला तर डुलक्या घेणारे काकाजी खडबडून जागे होत. आणि मोठ्यानें खांकरून विचारीत, "अरे कोण रेऽ? कुठं चाललास? गांव कोण तुझं?..." असल्या त्यापुढल्या



पांचपन्नास प्रश्नांना उत्तरं देतांना विचाऱ्याची ‘पाणी नको पण तोंड आवर’ अशीच स्थिति होऊन जायची!...

आपल्या असल्या प्रश्नांचा काकाजी एखाद्या अनोळखी तिऱ्हाइतावरहि सर्रास भडिमार करीत; तर मग त्यांचे नोकर, भागाइत, शेजारीपाजारी, हाताखालीं लहानसहान धंदे करणारे त्यांचे आश्रित, सारे त्यांना वचकून असावेत, दाराबाहेर उभे राहून त्यांच्याबरोबर त्यांनीं बोलावं, बोलतांना अकारण चांचरावं, यांत आश्चर्यकारक काय होतं?

शेजाऱ्यांचीं लहान मुलं, त्यांना आणि त्यांच्या दृष्टीला, अगदीं सावधगिरीनें टाळूनच आपआपले खेळ खेळत. ‘मुलांनीं खेळतांनाहि सहसा ओरडूं नये,—शांतपणें,.. अगदीं तोंड बंद करून खेळावं’—असं काकाजींचं प्रांजल मत! पण मुलं तीं मुलंच. ही सगळी शिस्त माहीत असूनहि, खेळतां खेळतां त्यांचं भान रहात नसे; क्वचित धोरण चुके. त्यांच्यांतला एखादा रस्ता ओलांडून ठिकठिकाणीं बसलेले गुरांचे कळप चुकवीत, आपल्याच खेळकर नादांत दबदबा धांवत, काकाजींच्या फाटकावर येऊन आदळे.

अशा वेळीं फाटकाजवळ बसलेलीं गुरं—‘आतां कांहीं तरी हाहाःकार, महाप्रलय होणार!’ अशा भीतीनेंच जणुं काय-बसल्या बसल्या लांब सुस्कारे टाकीत;... एखादं उभं असलेलं, पुढले पाय दुडून भीतीनें बसकण घेई; तर दुसरं एखादं बसलेलं, उठून पळून जाई.

तोंपर्यंत, तो बालवीर व मागें लागलेले त्याचे इतर सवंगडी (त्या भयंकर प्राप्त परिस्थितीची जाणीव होऊन) आपल्या खेळांतून जागे होत. उलट, काकाजींच्या दृष्टीच्या टापूंत, पण लांब असलेले, (वेळींच ‘पळण्यांतील शौर्य’ ओळखून) धुंगणाला पाय लावून अदृश्य होत.

काकाजींच्या दृष्टीच्या आणि मुलुखमैदान तोफेच्या भडिमार-कक्षेंत आलेला तो बालवीर मात्र थरथरां कांपूं लागे-नि काकाजींच्या सर्वंकष प्रश्नावलीला तोंड देतां देतां, त्याच्या सर्वांगाला (उन्हानें?) घामाच्या धारा लागत.

— ३ —

पण म्हणजे काकाजी दुष्ट होते असं मात्र यावरून म्हणतां येणार नाहीं! कारण, अशाच एखाद्या घामानें डबडबलेल्या मुलाला (तो रडकुंडीच फिरला तर)

जवळ घेऊन, एखादा हापुसचा आंबा खायला ते कमी करत नसत. पाणी प्यायला फाटकांत शिरणाऱ्या त्या माणसाला विहिरीवर पोहऱ्या मिळावा म्हणून किंवा पाण्यासाठीं धांवा टाकणाऱ्या त्या गुरांना कुंडीकडे जायला वाट मोकळी करण्यासाठीं फाटक उघडावं म्हणून, ते कधीं कधीं आपली वामकुक्षी आपल्या अंगाबाहेर झटकून टाकीत. शेजाऱ्या पाजाऱ्यांना काय हवं नको याचीहि ते अनेकदां आस्थेनें चौकशी करीत. नि हाताखालच्या नोकरांना किंवा आश्रितांना खाण्यापिण्यांत अगर पैशाअडक्यांत कसली कमतरता पडणार नाहीं, याचीहि ते मनापासून दक्षता बाळगीत.

पण ही त्यांच्या वागणुकीची दुसरी पायरी! कोणाच्या प्रथमच पटकन ती लक्षांत येत नसे. खोंचक प्रश्न, शिवराळ तोंड, भेदक दृष्टि व हातांतलि जाडजूड सोटा, (या गोष्टींप्रमाणेंच त्यांच्याकडे असलेली गडगंज संपत्ती) यांची एकंदर गोळाबेरीज मात्र सामान्यपणें साऱ्या लोकांच्या मनांत वज्रलेपासारखी राही.

—आणि मग ' काकाजी ' म्हटलं, कीं-घरांतलीं, घराभोंवतालचीं, किंबहुना गांवाभोंवतालचींहि लांबलांबचीं सारीं घाबरत.

— ४ —

काकाजींनीं हें सर्व आपल्या हिंमतीवर मिळवलं होतं. त्यांच्या आयुष्याचा खडतर पूर्वार्ध व आतां चालू असलेला म्हातारपणचा उत्तरार्ध यांत जमीन-अस्मानाचं अंतर होतं. पण त्यांचं अस्मान त्यांना कधींच ठेंगणं वाटत नसे; आणि या आजच्या अस्मानापर्यंत ते आपल्या कर्तबगारीच्या व धोरणीपणाच्या पंखावरूनच उडत उडत पोंचले होते.

काकाजी तसे फारच धूर्त होते. ' आवळा देऊन कोहळा काढणं ' त्यांना चांगलंच कळे. माणसांना स्तुति आवडते, हें—(लहानपणीं तोंडं वांकडीतिकडीं करत त्याविरुद्ध साऱ्या विधानांचा कित्ता गिरवूनहि) ते अजून विसरले नव्हते. ' आत्मानं सततं रक्षेत् दारैरपि धनैरपि ' अशा धोरणानें ते वागत; म्हणूनच त्यांना आजची परिस्थिति प्राप्त झाली होती. लहानपणीं फटिंग असलेले काकाजी आतां म्हातारपणीं संपत्ति, घरदार, गुरंढोरं, नोकरचाकर यांच्या गराड्यांत वावरतांना दिसत;... तें सारं त्यांच्या या चिकाटीच्या धोरणानेंच!



पण मिळालेलं सांभाळण्याचीहि कला काकाजींना औरच होती. याबाबतींत त्यांची जन्मजात शिस्त तर त्यांना फारच उपयोगी पडे!

म्हणींत म्हणतात त्याप्रमाणें, अक्षरशः लोटा घेऊनच, या परप्रांतांत आलेले काकाजी, आतां इथं स्थिर झाले होते. देश त्याप्रमाणें वेश व लोकांच्याप्रमाणें भाषा बदलण्याचं माहात्म्य ओळखूनच, गेल्या कित्येक वर्षांत काकाजी बोलत व वागत आले होते; त्यामुळें त्यांची राहणी इतकी बदलली होती, कीं, हा अस्सल गुजराथी बनिया आहे, हें कोणालाहि सांगितल्यावांचून कधीं समजलं नसतं.

ती बनियेगिरी मात्र त्यांच्या रक्तांतलीच! आपल्या प्रत्यक्ष आयुष्यांतच त्यांनीं कोठेकं आणली होतीं. प्रत्येक लहानसहान गोष्टींत देखील त्यांचा हिशेब चाले.

त्यांच्या घरांत त्यांच्या मुलालाहि आतां मुलं झालीं होतीं. पण त्यांचा तो मुलगा मात्र त्यांच्यापुढें उभा रहायला, एखाद्या लहान मुलाप्रमाणें, अजून थरथरा कांपे. आपल्याकडून त्यानें घेतलेल्या प्रत्येक रुपयाला बाजारांत सोळा आणे मिळतात, याची जाणीव कायम ठेवून, काकाजी त्याच्याकडून तपशीलवार हिशेब घेत. आधींपासूनच सावधगिरी बाळगून, त्यानें (काकाजींच्याच धोरणानें) ' ओलीसुकी ' केली तर कदाचित् त्यांतून तो निभावे. नाहींतर—साध्या-सुध्या हिशेबी गडबडगुंड्यांनीं—काकाजींपुढें त्याचा टिकाव लागणंच अशक्य! कारण, अशा वेळीं, चारचौघांदेखतहि आपल्या मुलाची कठोर शब्दांत कानउघडणी करण्यास काकाजी मागंपुढं पहात नसत.

— ५ —

एकदां काकाजी असेच वामकुक्षी घेत होते. बाहेर उन्हाच्या ज्वाळा निघत होत्या. फाटकापाशीं एक अनोळखी बैलगाडी उभी राहिली. एक कुंभार रहाटाला लागणाऱ्या बांड्या विकायला घेऊन आला होता.

काकाजींनीं आपले किलकिले डोळे त्याच्याकडे फिरविले. मोठ्यानें ललकारून, त्याच्या नांवागांवाची चौकशी केली; नि मग, बांड्यांच्या भावाचीहि स्वभावानुसार घासाघीस केली.

आपल्या मुलाला हांक मारून, शेवटीं, काकाजींनीं त्याला सांगितलं, " अरे, दोन कोड बांडीजोडी निवडून घे. दीड आणा जोडी. "

गाडी मागल्या बाजूला पोंचेपर्यंत काकाजींनीं डोळे बंद करूनच हिशेब केला होता. पुढल्या पांच मिनिटांत या कुशीवरून त्या कुशीवर वळून ते पुन्हां डुलक्याहि घेऊं लागले होते.

रिकामी गाडी फाटकांतून बाहेर पडली व ती रस्त्यानें धावूं लागली, तेव्हां झालेला तिच्या चाकांचा खडखडाट काकाजींच्या कानीं पडला. त्यानें मात्र ते दचकून जागे झाले.

काकाजींना खडबडून उठून बसतांना पहातांच, त्यांच्याकडे आलेल्या प्रतिष्ठित नातलग पाहुण्यांनीं हंसून विचारलं, " कां, झाली झोंप, काकाजी ? "

पण तिकडे लक्ष कुठं होतं काकाजींचं ? त्यांनीं एकदम मोठ्यानें आपल्या मुलाला हांक मारली—" बच्चूऽ इकडे ये. "

— ६ —

बच्चू लगबगीनें चांचरतच पुढं झाला.

काकाजींनीं बांडीवाल्याला पैसे किती चुकते केले याची चौकशी केली; तेव्हां बच्चू एकदम निष्पापपणें म्हणाला, " हिशेबानें झाले तेवढे—साडे सात रुपये."

पण त्या शब्दांनीं धरणीकंपाचा धक्का बसल्याप्रमाणें काकाजी दचकून कोचावरून ताडकन उभे राहिले. त्यांच्या चेहऱ्यावरील रागाच्या दाट छटा पाहून बच्चू तर अधिकच कावराबावरा झाला होता. ' आपलं कांहीं तरी चुकलं असेल कां ?' असा संशय येऊन तो थरथरूं लागला.

जवळच तक्क्याशीं बसलेले काकाजींचे पाहुणे बापलेकांमध्यें होणाऱ्या भावी खटक्याच्या कल्पनेनेंच गोंधळले बावरले होते.

इतक्यांत, काकाजी रागानें मोठ्यांदा गरजले, " तूं तो तद्दन गांडो छे, बच्चू ! बावीस वर्षांचा घोडा झालास; दोन पोरांचा बाप झालास !!...पण अजून कवडीची अक्कल नाहीं. जा—पुन्हां हिशेब कर. दीड आणा जोडीप्रमाणें दोन कोडी बांडीजोडी ! इथं माझ्यासमोर उभा राहून बोटं मोडत हिशेब नको करूंस !—स्वतः धावत जा आणि त्या गाडीवाल्याला पकड आधीं ! पळ...पळ... "

मिनिटभरहि न थांबतां खुंटीवरची टोपी डोक्यावर चढवून, हातांत असलेल्या आपल्या लहानग्या मुलासकट गाडी गेलेल्या रस्त्यानें बच्चू उन्हांतूनच धावूं लागला.



काय झालं तेंच पाहुण्यांना समजेना; ते अधिकच गोंधळले.

पण बच्चू लांब जाईपर्यंत काकाजी त्याला ओरडून सांगत होते, " तुझ्या बापानें तुला उधळण्यासाठीं नाहींत पैसे ठेवलेले. निर्लज्ज !—लाखाचे बारा हजार करणारा !— जा—आधीं त्या गाडीवाल्याला पकडून आण...माझ्यासमोर... "

— ७ —

काकाजींना ह्या प्रकाराचें स्पष्टीकरण विचारण्याची पाहुण्यांची छातीच नव्हती; ते निमूटपणें तक्क्याशीं बसले होते बिचारे ! पण बसल्याबसल्या त्यांची चुळबुळ चालली होती.

शेवटीं, कांहीं न बोलताच ते उठले व हळूच कोपऱ्यातील छत्री घेऊन ते फाटकांतून बाहेर पडले; रागावलेल्या काकाजींनीहि त्यांना कांहीं एक प्रश्न विचारला नाहीं. उलट—पुढला कांहीं वेळ काकाजी रागारागानें सोप्यांत झराझर येरझारा घालत होते..

कांहीं वेळानें पाहुणे उन्हांतून उघडे बोडकेच घाम पुसत पुसत आले व रस्त्यावरून फाटकांत शिरले.

ते दारांतून आंत येतात न येतात, तोंच काकाजींनीं त्यांना प्रथम सवाल टाकला, " हं, कुठें गेलां होतां ? "

हुश्श करीत, पाहुणे तक्क्याजवळ येऊन बसत म्हणाले, " लहान मुलासकट बच्चुभाई मघां धांवत गेला ; ऊनंहि फार होतं; म्हणून छत्री घेऊन गेलों होतो जरा पुढें ! "

" हुं " हुंकारतच काकाजींनीं त्यांना पुनः खोंचक प्रश्न विचारला, " आणि पुढं केलंत काय ? सांपडला का गाडीवाला ? ? काय केलंन् बच्चूनें ? ? ? "—

पाहुणे समाधानी आवाजांत म्हणाले—" बराच लांब गेला होता. हांका मारून मारून शेवटीं थांबवला आम्ही ! बच्चुभाईंना आपली चूक समजली होती. जोडीऐवजीं प्रत्येक नगाचे म्हणजे दुप्पट पैसे आपल्याकडे आले. असं सारं मग त्या गाडीवाल्यानें कबूल केलं; आणि हिशेबाबाहेरची रक्कम दिली कीं परत... बच्चुभाईकडे ! येतायत् आतां हळुहळु मुलाला घेऊन, पाठोपाठ ! "—

ऐकतां ऐकतां काकाजी त्यांच्यावरहि एकदम ओरडून म्हणाले– "हे हे... तुम्ही दुसरे, शिकलेले शहाणे ! तुम्ही काय दिवे लावलेत जाऊन आणखी ? हेंच केलंत् ना ? अहो, काय... पावणेचार रुपयांना काकाजी महाग झाला होता, असं वाटलं तुम्हाला ? ? तुम्ही एक गाढव... आणि न् बच्चू सात ! ! "...

पाहुणे दचकले, वरमले; बैठकीवर पुन्हा चटकन् उठून बसले !

पण काकाजी अजूनहि रागानें पुढें म्हणत होते, "अहो, म्हातारी मेल्याचं दुःख नाहीं ! पण काळ सोकावतो ! ! – बच्चू एवढा लहानसा हिशेब चुकला ; तो गाढव असेल ! पण त्या बदमाश गाडीवाल्यानें पैसे हातांत पडतांच, गाडी चौखूर सोडावी, म्हणजे काय ? उद्यां तो जगाला ओरडत सांगेल, 'काकाजी वाण्याचा बच्चू गाढव आहे' म्हणून ! ... मला नाहीं सहन होणार हें,... मी जिवन्त आहे तंवर !– मग आपला सावळा गोंधळ होणारच आहे या बच्चू घेलाभाईचा !आणि तुम्हीं मोठे शहाणे गेलां,... तर त्या गाडीवाल्याचा कान पकडून, त्याला तरी इकडे फरफटत आणायचा नव्हता ? – नुसतं शिकून अक्कल येत नसते ! ! "

पाहुण्यांना आपलं डोकं गरगरल्यासारखंच वाटत होतं ! - ते शरमिंदे झाले होते ; पण काकाजींना शेवटींहि त्यांची माफी मागावीसंहि वाटलं नाहीं ! –इतका भयंकर गुन्हा, त्यांच्या दृष्टीनें त्या पाहुण्यांनीं व बच्चूनें मिळून केला होता !–

— ८ —

पण मग काकाजींची असली प्रत्येक वागणूक एका विशिष्ट दृष्टीची व अर्थपूर्ण असे. खाण्यापिण्यांत, कपड्यालत्त्यांत त्यांना नाहीं ती काटकसर करण्याची कधींही इच्छा होत नसे ; पण प्रत्येक बाबतींत त्यांची एक ठरलेली शिस्त असे. आणि त्या शिस्तीविरुद्ध कोणीहि गेलेलं त्यांना खपत नसे. मग तो अगदीं एखादा सरकारी अंमलदार कां असेना !...

हो, काकाजींच्याकडे सरकारी अंमलदारांचं प्रस्थ मात्र बरंच असे. कोणी प्रांत, कोणी मामलेदार, काकाजींच्या खेड्याजवळ कधीं फिरतीवर असतांना मुक्कामाला राहिला तर काकाजी त्याला 'भेट' घेऊन भेटायला जात.



पण त्यांवेळीं त्यांचा एकच ठराविक पोषाख असे. गुडघ्याखालपर्यंत धोतर, पिवळा अगर काळा बगला, जरीचं उपरणं आणि गुलाबी रंगाचं काठेवाडी पागोटं ; हातांत त्यांचा प्रसिद्ध सोटा व पायांत जोडा !– बस्, यांत वर्षानुवर्ष तिळभरही फरक झाला नव्हता.

साहेबाची भाषा कोणतीहि असो, त्याच्याबरोबर बोलण्याच्या काकाजींच्या भाषा दोन ! एक शुद्ध मराठी, किंवा दुसरं मोडकं हिंदी. उरलं सुरलं काम त्यांच्या 'भेटी' करत. या भेटी मात्र निरनिराळ्या ऋतूप्रमाणें ( ताजी भाजी, कलमी आंबे, राजेळी केळीं वगैरे प्रकारें ) आपलं स्वरूप पालटत.

अर्थातच काकाजींचं वाटेल तें लहान-मोठं काम अगदीं सुतासारखं सरळ पार पडे.

याचा अर्थ मात्र असा नव्हे, कीं, काकाजींसारखे कडक शिस्तीचे शिलेदार अंमलदारापुढें नांगी टाकून मऊ होत. आपला आब राखून, काकाजी त्यांच्या बरोबरहि बरोबरीच्या नात्यानें नेहमीं वागत; म्हणूनच हे सारे अंमलदार काकाजींच्या खेड्याच्या बाजूस फिरतीवर आले, कीं, आगाऊ निरोप देऊन, आपण होऊनच काकाजींकडे चालत येत. त्यांच्याबरोबर आदरानें वागून त्यांचा पाहुणचार घेत.

असा कोणी अधिकारी पाहुणा घरीं आला, कीं, काकाजी त्यांना सामोरे जात. दर दोन दिवसांनीं गड्याकडून सारवून तुळतुळीत केलेलं आपलं काळसर स्वच्छ अंगण ते मोठ्या अभिमानानें त्यांना दाखवीत; मग आपल्या घराला त्यांच्यासह प्रदक्षिणा घालत;...ठिकठिकाणच्या झाडांची माहिती सांगत;...आणि शेवटीं, फिरून पुढल्या दारानें ओसरीवर येत; आणि तक्क्याजवळ त्यांना बसवीत म्हणत, "हें असं आहे आमचं खेडवळ वैभव, रावसाहेब!—"

मुद्दाम आणून ठेवलेल्या नक्षीदार ट्रेमधील किटली वगैरे चहाच्या सर्व संचांत स्वतःच्या हातानें ते चहा तयार करत. मोठ्या आस्थेवाईकपणें पाहुण्याचं चहापान झाल्यावर, एका तबकांत ठेवलेला विड्यांचा जुडगा व काड्यांची पेटी ते पुढे करत. नि (आतां अगदीं पत्र्याच्या थाळीप्रमाणें झालेलं) आपलं जुनाट, [illegible] रक्षापात्र आपल्या व त्यांच्या मध्यें ठेवीत. (कोणी साहेब पांढरी विडी ओढतात, हा ठाऊक असलेल्या बातमीचीहि काकाजींकडे अशावेळीं मुळींच डाळ शिजत नसे.)

इतका सरंजामी सत्कार पार पडल्यावर, दोन दोन मिनिटांनीं एक विडी विझवून, त्या रक्षापात्रांत टाकत टाकत, जुडग्यांतून पुन्हां एक एक नवी शिलगावून हळू हळू धूर सोडीत, काकाजी तासन् तास त्यांच्याशीं दिलचस्प बोलायला तयार असत.

—१—

एके दिवशीं असेच एक 'प्रांतसाहेब' त्यांच्याकडे आले होते. चहा वगैरे घेतल्यावर काकाजी व ते गप्पा मारीत बसले होते.

गप्पा मारतां मारतां दोघांचाहि विड्या ओढण्याचा सपाटा चालला होता. काकाजीहि त्यांच्याबरोबर बोलत होते; पण बोलतां बोलतां मधूनच उठून, 'हूं हूं' करीत, बाहेर अंगणांत जाऊन, ते परत येऊन बसत.

रावसाहेबांनीं एक विडी पेटवली. काकाजी एकदां बाहेर जाऊन आले. थोड्या वेळानें त्यांनीं दुसरी पेटवली. काकाजी पुन्हां बाहेर येऊन गेले. अर्ध्या तासांत जवळजवळ पांच सहा वेळां हा असा प्रकार झाला!–रावसाहेबांना तर काकाजींच्या या अस्वस्थ हालचालींची नि अंगणांत जाऊन क्षणभर खिडकीजवळ उभे राहून परत येऊन बसण्याची, कांहींच कल्पना होत नव्हती.

शेवटीं काकाजी पुन्हां जेव्हां अंगणामध्यें नवव्यांदा जाऊन परत येऊन बसले, तेव्हां रावसाहेब हातांतील विडीचे शेवटचे दोन झुरके घेऊन, ती अंगणांत फेंकून देत त्यांना म्हणाले, "काकाजी! काय चाललंय् काय तुमचं, मघांपासून? पुन्हां पुन्हां बाहेर जातां, आंत येतां!! कोणाची वाट कां पहात आहां?"

पण रावसाहेबांचे हे सारे शब्द संपण्यापूर्वीच, काकाजी पुन्हां दहाव्यांदा अंगणांत पोंचले; ते पूर्वीप्रमाणेंच दहाव्यांदा खालीं वांकले व नुकतीच रावसाहेबांनीं फेंकून दिलेली विडी उचलून, ते आंत येत म्हणाले, "माफ करा, रावसाहेब. आपल्यासारखे थोर पाहुणे घरीं आलेले असतां आणखी कोणाची वाट पहाणार मी! पण ऽ... रागावूं नका; आपल्या समजण्याची मात्र वाट पहात होतों, इतका वेळ, मी ..."

आणि परत येऊन अंगणांतून येतांना बरोबर आणलेलं रावसाहेबांनीं फेकलेलं विडीचं थोटूक, दोघांमध्यें मघांपासून पडलेल्या रक्षापात्रांत टाकून, काकाजींनीं



किंचित् खोचक स्मित केलं; नि पुढं, अदबीनेंच, पण कांहींशा उपरोधिक स्वरांत, ते म्हणाले, "त्याचं असं आहे, रावसाहेब! मी आहे आपला एक कांहींसा शिस्तीचा माणूस! माझ्या घरासमोरचं हें अंगण एक दिवसाआड सारवून कसं चक ... स्वच्छ ठेवलं आहे मी, पाहिलंत ना! मला अभिमान वाटतो त्याचा!"...

कांहींच न जाणून, गोंधळलेल्या नजेरनें रावसाहेब काकाजींकडे पहात होते; तोंच काकाजी पुढें म्हणाले,–"तुमच्यासारख्या मोठ्या माणसांनीं माझ्याकडे पायधूळ झाडली; माझ्याकडून आपलं माझ्या स्थितीला साजेसं सगळं आदरातिथ्य झालं; शेवटीं, विड्यांचा जुडगा मी आपल्यापुढें केला! त्यावेळींच राखेचं हें भांडेंहि समोर ठेवलं होतं मी आपल्या–"

चमकलेल्या रावसाहेबांकडे सस्मित पहात काकाजी संथपणेंच पुढं म्हणाले–"पण आपण मघांपासून विड्या खिडकींतून अंगणांत भिरकावतां. आतां शिस्त काय माझ्यासारख्यांनीं शिकवायची थोडीच या वयांत, आपल्याला? पण मला वाटलं, माझं अंगण तरी निदान मला साफ ठेवतां येईल!– तेव्हां, तें माझ्या आवाक्यांतलं काम तेवढं...मघापासून करतोंय् मी, निमूटपणें! आतां आपण मुद्दामच विचारलंत,... म्हणून बोललों. नाहीं तर बोललोंहि नसतों यांतलं काहीं – माफ करा हं ..."

आणि एवढं बोलून, काकाजीनीं हंसत हंसत जुडग्यांतली एक नवी विडी रावसाहेबांपुढें धरली व त्यांच्या वरून बंद झालेल्या तोंडांतलि त्या विडीला, काकाजींनी आपल्याच हातानें एक काडी ओढून लावली व ती विझवून त्या समोरच्या राखेच्या तबकडींत टाकली!–

---

## फणसाचे गरे ★ २

चार ओळखीच्या लोकांच्या निरुंद बिऱ्हाडांची ( व त्यांत अडगळीप्रमाणें पडलेल्या सामानाची ) मोजणीमापणी करण्याचा माझा संवय नाहीं. तेव्हां साधारणतः, फिरतीवर असतांना, एखाद्या मध्यम कां होईना, पण हॉटेलांतच उतरण्याची कोशीस करतों मी !

इतकं असूनही परवां परगांवीं-पुण्याला-गेलों,... तेव्हां माझ्या एका गबाळ्या मित्राकडे उतरण्याची पिसाट कल्पना माझ्या मनांत त्या दिवशीं शिरली.

सहा वांकड्या बोळांचीं वळणं घेतल्यानंतरच शेवटीं त्याच्या पत्त्यातला जुनाट वाडा लागला. 'माणसानं नम्र असावं व आलेल्या परिस्थितींत समावून घ्यावं !' हें सुभाषित मनांत आणूनच, मी मान वांकवली नि त्या दगडी दारांतून आंत शिरलों. समोर दिसणाऱ्या ( कधींच रंग न लावलेल्या ) दाराच्या हलूंच लोटून ठेवलेल्या फटीदार फळकटावर ( मंथरेप्रमाणें अष्टवक्र दिसणारी ) गंजलेली कडी लोंबकळत होती.

मी क्षणभरच तारायंत्र सुरूं केलं. आंतून पावलं वाजलीं. स्वत: माझ्या मित्रानेंच पुढं होऊन आपल्या संसाराचा पहिला पडदा उघडला. खरं म्हणजे, रोजच्या अगदीं मामुली प्रश्नोत्तरानेंच नाटकास सुरवात झाली. मग ट्रॅन्सफर सीन-साठीं चहाचे कप आणण्यापूर्वी आंत जातां जातां, दाराजवळच्या माझ्या छोट्या ट्रंकेवर स्वारीनं माझं होल्डॉल ठेवलं...

थोडावेळ अंतर्धान पावून, शेवटीं ' कट्ऽ क्ऽ कट ' करणारे दोन कळकट कप हातांत घेऊन माझ्या मित्रवर्यांनीं दुसरा प्रवेश केला.

कांहीं न बोलतांच, मी बसलेल्या खुर्चीसमोरील लांकडी फळ्यांच्या कॉटवर त्यानें बसकण घेतली. एक कप माझ्या पुढं केला; आपल्या हातांतील कपाचा फुटलेला अर्धा कान पकडून, तो आपल्या जाड भिंगांच्या चष्म्यांतून माझ्याकडे पुन्हा कांहीं न बोलतांच, किंचित प्रश्नार्थक चेहऱ्यानें पाहूं लागला.



— २ —

बऱ्याच दिवसांनी तसे पहिल्यांदाच भेटलेलों–त्यामुळें मग अनेक विषय आमच्या बोलण्यांत येऊन गेले. पाऊण तासही निघून गेला. भेटीचा नवेपणाहि संपला. पण कपडे काढण्याच्या गोष्टी त्याच्या तोंडून कांहीं निघेनात !

मग त्याऐवजी काय वाटलं, कुणास ठाऊक ? आपल्या संवयी-स्वभावाप्रमाणें डोळे किंचित मिचमिचे करून, माझ्याकडे तोंड फिरवत तो पुटपुटला, ' हं, उतरलां आहांत कोणाकडे,... सांगा आधी ? '

एकदम विजेचा धक्का बसल्याप्रमाणेंच माझी स्थिती झाली. प्रत्यक्ष वळकटी-ट्रंक समोर दिसत असूनही त्यानें तो प्रश्न विचारल्यावर, त्यावर पुढं बोलावं काय तेंही मला समजेना. मी त्याच्याकडे गोंधळून पाहूं लागलों.

तोंच तो पटकन पुढं म्हणाला, ' बुधवारांत बघा......दोन रुपये दिवसाची चांगली जेवणा-राहाण्याची सोय झाली आहे हल्लीं ! '

त्या माहितीच्या त्याच्या अनाहूत पुकारानें तर मी साफ थंडच पडलों ! बऱ्याच वर्षांचा स्नेही माझा तो !– कधीं भेटला तर माझ्यासाठीं अगदीं जीव टाकणारा ! हा आतांपर्यंतचा निरपवाद अनुभव. नि त्याच्याच घरीं, त्या दिवशीं, तसा प्रथमच मी उतरलों–तों–

तरी हंसण्याचा प्रयत्न करून, त्यावर वेळेवर सुचलेलं उत्तर मी दिलं; त्याला वाईट वाटणार नाहीं, एवढा वेळ काढून, अखेर उगीच मामुली कामाचं निमित्त सांगितलं; नि जागचा उठलों.

आपला गबाळा काष्टा नीट नेसत, तोहि दारापर्यंत मजबरोबर चार पावलं पुढें येत म्हणाला, " उद्यां सकाळीं मात्र जेवावयास या हं ! मी वाट पहातों. "

जुलमाचा हुंकार देऊन, वळकटी-ट्रंक सांवरत, त्या जुनाट बोळांतून मी खैरसलामत बाहेर पडलों !

— ३ —

हमरस्त्यावरून चालतां चालतां, डोक्यांत विचारचक्र सुरूं झालं होतं, " मूर्खच बेटा ! साधे शिष्टोपचारही नाहींत ! पुन्हां दांभिकपणाही पहा कसा अंगांत

भरपूर! हँ...उद्यांच्या जेवणाचं आमंत्रण! कशाला? बुधवारांत दोन रुपये दिवसाची सोय झालीच आहे कीं!-”

ओघानेंच नेहमीच्या हॉटेलांत उतरणं मला भाग झालं;-मग नेहमीप्रमाणेंच जेवणखाण, झोपणं, सकाळीं कामाला जाणं,...सर्व कांहीं—

सकाळच्या जेवणाच्या वेळीं मात्र मनांत विचारांचं एक तुंबळ युद्ध झालं!-

“कसलं तें आमंत्रण? तोंडदेखलेपणाच! आणि...एवढ्या प्रकारानंतर? ...नकोच आतां तें!”-

लागलींच मॅनेजरकडून मी पान वाढविलं, जेवलों; नि अगदीं साडेबारापर्यंत शांत विसांवा घेतला.

पण पडल्यापडल्या, पुन्हां ‘तो गाढव आहे; तऱ्हेवाईक आहे!’ या विचाराबरोबरच ‘तो माझा मित्र आहे’ याचीहि जाणीव मला सारखी होत होती.

अखेर मनांत काय विचार आला, कोण जाणे! नकळतच पटकन उठलों. कपडे चढविले; बाहेर पडलों व त्याच्या घराच्या वाटेनें चालूंहि लागलों.

—४—

कपाळमोक्ष होणार नाहीं, इतक्या सावधगिरीनें, (त्या कालच पुऱ्या परिचित झालेल्या जुनाट, खुजा, दगडी दिंडीतून) मी आंत शिरलों. समोर पाहिलं,... त्याच्या संसाराचा पडदा यावेळीं उघडाच होता.

आपल्या गुलमिशांवर हात फिरवीत, (मी काल बसलों होतों त्या खुर्चीवर) मळलेला व विरलेला कद नेसून माझा मित्र उघडाबंब बसला होता!

मला पहातांच तो किंचित हंसला. त्या हंसण्यांत ‘राम’ मात्र नव्हता. उजव्या हाताच्या आंगठ्यांत जानवं अडकवून, तें गरगर फिरवीत, तो दारापर्यंत सामोरा आला; आणि माझ्याकडे तीक्ष्ण नजरेनें पहात, त्यानें मानेनेंच मला आंत खुणावलं.

मीहि-कांहीं न बोलतांच त्या कॉटवर बसलों.

तो माझी वाट पहात, इतका वेळ थांबला असेल, अशी मला कल्पनाही नव्हती. त्याच्याविषयीं माझं मन काल बरंच बिनसलं होतं खरं; पण त्याचा प्रेमळपणा अगदींच बेडापार नाहीं, याच्या त्या प्रत्यक्ष जाणीवेनें मी आनंदलों.



‘उशीर फार केलांत!’ तो मग शांतता मोडून पुटपुटला. ‘आईला ताटकळत बसावं लागलं! बरं चला! कपडे काढा पाहूं आतां! कीं जेवूनच आलां आहांत?’

मी प्रथम चांचरलोंच. पण मग, खऱ्याखोट्याची व्याख्या मनांतल्या मनांत बदलत, मी झटकन म्हणालों, “छे! छे!”

लागलीच कोटटोपी काढली; त्यानें दिलेल्या तांब्यांतल्या पाण्यानें हातपाय धुतले. नि त्याच्याबरोबर मी आंतील दाराकडे वळलों.

तेवढ्यांतच, तो एकदम थबकला;...आणि माझ्याकडे पाहून (एकप्रकारच्या हुकमी आवाजांत) म्हणाला, “सद्गुरु! सदरा काढा. सदरा काढा.”

त्याक्षणीं, माझा नेहमीचा सगळा युक्तिवाद नाहींसा होऊन, मला नकळत, अगदीं एखाद्या यंत्राप्रमाणें, मी पटकन् हुकमेहुकूम सदरा काढला! त्याच्या शब्दांत जोरदारपणाच होता तसा! पण एका नव्या जाणीवेनें मीच पटकन् ओशाळलों व चांचरत त्याला अस्पष्टपणें म्हणालों,...“पण..हें पहा...जानवं नाहीं हो गळ्यांत!”

“च् ऽचच्ऽ! नाही? अर् र्!” प्रथम दचकून... पण मग पुन्हा अवसान आणून, सूचकपणें मला तो म्हणाला, “बरं तर मग...सोगा टाका डाव्या खांद्यावर; आणि चला लवकर—”

—आणि लागलीच आंत वळून, तो आपल्या आईला मोठ्यानें म्हणाला, “आईऽग, येताहोंत् ग आम्हीं—”

—५—

त्याच्या काळोख्या खोलींतच, एका पाटावर सोंवळ्यांतला तो-आणि दुसऱ्या पाटावर मी...भरलेला, भ्रष्ट ब्राह्मण!...दोघेहि निमूटपणें जेवत होतों.

त्याची आई चुलीजवळून पुन्हां पुन्हां येऊन वाढत होती.

माठाची भाजी, आंबट वरण, चटणी...अगदीं साधा बेत! मी गोंधळल्या मनानें खाली मान घालून गुपचूप जेवीत होतों.—

तेवढ्यांत तो अगदीं मोकळ्या घरगुती पद्धतीनें म्हणाला, “ही रात्रीचीच पोळी काऽग, आईऽ? अग, मग बरणींतला गुळांबा न् लिंबाचं लोणचं काढ कीं- ...छानच लागेल!”

तिनेंहि हंसून त्याच्यापुढें बरणी ठेवली; त्यानें चमच्यानें त्यांतला गुळांबा काढला; आणि माझ्या व आमच्या पानांत वाढून घेतला. तेवढ्यांत, त्याच्या आईनें सहास्य चेहऱ्यानें खार व लिंबाच्या फोडी आमच्या पानांत घातल्या.

सारंच वातावरण कसें मोठं गमतीदार होतं तें! आणि त्यांत गुंग होऊन, संध्याकाळचं जेवण तेव्हांच उरकून घेत होतों, मीहि!– हॉटेलांत जेवल्याच्या आठवणीचा मागमूसहि नव्हता माझ्या मनाला नि पोटालाहि...

— ६ —

जेवल्यानंतर, एका बशींत काप्या फणसाचे गरे व खोबऱ्याच्या कातळ्या ठेऊन, तें सारं त्यानें माझ्या पुढें केलं!

"हं, सद्गुरु, आतां बोला!" क्षणभरानें तो मला म्हणाला– "तुम्ही माझ्यावर रात्रीं रागावलांत; हो ना? हं, कांहीं एक बोलूं नका–निदान इतका मूर्ख आहे मी, असं नका समजूं,... पण काल तुम्हाला बुधवारांतली सोय सांगायला तसंच कारण होतं;... घरांत आमच्या...'पांचवी'–होती. आणि, आईच्या नियमाप्रमाणं,...बाहेरच्या माणसांना घेतां येत नाहीं घरांत,...त्या दिवशीं. तो मोडून तुम्हाला आग्रह करणारा मी कांहीं समाजसुधारक नव्हे! साधा गरीब संसारी माणूस आहे मी!—"

बोलणार काय? त्याच्या तोंडाकडे मी आश्चर्यानें पहातच राहिलों.—

तेवढ्यांत तो पुढें म्हणाला, "आज मात्र दहा वाजल्यापासून, तुमची वाट पहात, असाच इथं खुर्चीवर बसलों होतों. दोन्ही प्रकारें वाटत होतं, याल किंवा येणारहि नाहीं. अंधुक आशा मात्र होती. माझ्या घरांत माझ्या माणसांच्या सोईसाठीं, त्यांच्या भावनांसाठीं, 'माझ्याकडे उतरा' असा तुम्हाला खोटा आग्रह मी केला नाहीं;... पण म्हणून कांहीं कसला गुन्हा केला नव्हता मी..."

त्याक्षणींची त्याच्या डोळ्यांतील चमक आत्मविश्वासाची होती. त्याच्याविषयीं अधिकच आपुलकी वाटूं लागली मला! —

तोंच तो पुढें म्हणाला, "शेवटीं आलांत! बरं झालं. आईलाही आनंद झाला, ठरल्याप्रमाणें तुम्हीं आलांत, त्याचा! असं पहा–तुम्हाला सुखवण्यापेक्षां माझ्या म्हाताऱ्या आईला सुखविणंच मला बरं वाटलं!–पण मग--मर्चा आपली



सारं गुंडाळून ... तुम्हींहि सदरा काढला; धोतराचा सोगा खांद्यावर घेतला; त्याबद्दल मी तुमचाहि फार आभारी आहे. त्याला तुम्हीं दांभिकपणा म्हणा पाहिजे तर! पण जगांत आतां माझ्या म्हाताऱ्या आईचे दिवस थोडेच राहिले आहेत! नाहीं? कसं वाटतं तुम्हाला?"

— ७ —

इतक्यांत,...थोड्या दिवसांपूर्वीच जगाची पहिली ओळख झालेलं त्याचं तें तान्हुलं आंतल्या खोलींत रडूं लागलं—

त्याक्षणीं, तो आवाज कानीं येतांच, माझ्या त्यावळच्या भावविवश मनांत विचार आला, "आजच्या जगाबरोबरच हें तान्हुलं वाढल्यावर, माझ्यासमोर बसलेल्या त्याच्या या बापाचे आजचे हे विचार, त्याला मोठेपणीं समजतील–समजतील का पण?"

आणि त्या विचाराबरोबरच समोरचा काप्या फणसाचा एक गरा तोंडांत टाकून मी स्वस्थपणें चघळूं लागलों—

---

रघुवीर सामंतांचें
**– हृदय –**
[मराठी अभिनव आदर्श शब्दचित्रें]
**दुसरी आवृत्ति**
प्रकाशनाच्या मार्गावर

# कावळे हेडसर ★ ३

पाटसकर मास्तरांना बऱ्याच दिवसांनीं भेटायला म्हणून; स्वतःशींच हसत मी आंत शिरलों; तेव्हां मंगळवारांतल्या त्या भव्य इमारतींतून मुलंमुली हसत-खिदळत बाहेर पडलीं.

अर्जाप्रमाणें बोलावणं येऊन, पाटसकर चार वर्षांपूर्वी प्रिन्सिपॉलना भेटायला गेले होते, तेव्हां मी त्यांच्याबरोबर होतो. मग, कसलासा वादविवाद करीतच, आम्हीं त्या जाळीच्या मोठ्या लोखंडी फाटकांतून बाहेर पडल्याचं, पायऱ्या चढतां चढतां, आज मला पटकन् आठवलं;...पण अधिक कांहींच आठवेना—

इतक्यांत,...त्या मोठ्या दाराजवळच एक व्यक्ती उभी असलेली मला दिसली. जुनाट पिवळसर डगला अंगांत, जुनीशीच वेलबुट्टीची टोपी डोक्यांत, गंधाची बारीकशीच टिकली कपाळाला, पायघोळ सोगा सोडलेलं स्वच्छ धोतर! सारा पोषाख नि अविर्भाव दरारा उत्पन्न करणारा होता. आपली भेदक नजर चौफेर गरगर फिरवीतच, ते तिथंच उभे होते—

माझ्या मनानें पटकन् कयास बांधला—'कोणीतरी मास्तर असावेत शाळेतले ते!'

एवढ्या मोठ्या इमारतींच्या कोणत्या बाजूस वळलें म्हणजे शिक्षकांची खोली सांपडेल व पाटसकर मास्तरांना भेटतां येईल, हें मला समजेना. जवळपास शिपाईहि दिसेना. त्यांतून, मधल्या सुटीमुळें तर मुलांचा दंगा न् ये-जा सारखी चालूच होती. मी जास्तच बांवरलों...

गोंधळलेल्या नजरेनें मी तसं चौफेर पहात आहे, इतक्यांत, दाराजवळच्या त्या मास्तरांनीं, तीन चार लहान मुलांना (कोलांट्या उड्यांच्या खट्याळ सर्कशीबाबत) हुकमी आवाजांत दबकावलं; नि आपल्या पायांतील वहाणा करकर वाजवीत माझ्याच बाजूस होऊन, मला ते सामोरे झाले!—



किती अगत्याचं तें त्यांचं वागणं!—आदबशीर नि हळुवार आवाजांत त्यांनी मला विचारलं—"कोण पाहिजे आपल्याला?"

त्या वाक्यांतील झोंकानें तर क्षणभर भारल्यासारखंच झालं मला; आणि अधिकच मार्दव दाखवून, मी त्यांच्याशीं पुटपुटलों, "पाटसकरांना"—

"पाटसकर सरना का?— या या!— आज 'मंथ एंडिंग'...तेव्हां 'हाफ् हॉलिडे' आहे; ... 'कॅटलॉग वर्क' करीत 'टीचर्सरूम' मध्यें 'एंगेज्ड' असतील ते..."

त्याच्याबरोबरच मी दोनचार पावलं पुढं टाकलीं; तेवढ्यांत, ते अर्धवट वळून मला पुन्हां म्हणाले, "पण याऽना आपण! – हरकत नाहीं कांहीं,... 'लॉंग रिसेस' आहे हां..."

त्यांच्या त्या आदबशीर, अस्खलित, स्वागतपर उद्गारांनीं एकदम त्यांच्याकडे मी चमकून पाहिलं; कारण, क्षणभरच मला पटकन् वाटलं, "यांना पूर्वी कुठंतरी पाहिलं तर नाहीं आहे ना मी?"

पण मी असा विचार करी तोंपर्यंत, त्यांनीं दोन तीन वळणं घेतलीं होतीं; आणि यंत्राप्रमाणें त्यांच्या मागून चालत, मीहि शिक्षकांच्या खोलीच्या दारांत जाऊन उभा राहिलों होतों.

— २ —

खोलीमधल्या टेबलाभोंवतीं बरीच मास्तर मंडळी बसली होती. टेबलावर वाफा निघणाऱ्या चहाचे भरलेले कप व ट्रेमधून खाण्याच्या पदार्थांवर कोशिंबीर पसरलेल्या बशा होत्या; आणि सभोंवतीं बसून मोठमोठ्यानें बोलत, ते मास्तर आपल्या चार तासांच्या शिकविण्याचा शीण घालवीत होते.

त्यांतच, पाटसकर मास्तर, एका बाजूला तावातावानें कांहींतरी वाद घालत, चहा पीत खात होते.

'थांबा हं!' असं म्हणून मला दाराशीं थांबवून, ते वाट दाखविणारे पुढे गेले.

ते लगबगीनें टेबलापाशीं गेले. पाटसकरांच्याच जवळ उभे होते ते; तरी त्यांची शोधक दृष्टी मात्र खोलीभर इकडे तिकडे फिरत होती. तें पाहून माझ्या

किंचित् आश्चर्यचकित मनाला क्षणभर प्रश्न पडला, ' पाटसकरांना हे ओळखतच नाहींत कीं काय ? '

पण ते तसे घुटमळत टेबलाजवळ उभे राहिलेले पाहून, मास्तरमंडळींच्या बोलण्यांत मात्र थोडा खंड पडला. बहुतेक सगळेच त्यांच्याकडे संशयी मुद्रेनें वळून पाहूं लागले.

तेवढ्यांतच, ते उभे असलेल्या जागेवरून किंचित् हलले. त्यांनीं टेबलाला अर्धाअधिक वळसा घातला. तसेच, खोलीच्या कोपऱ्यांत पडलेल्या आरामखुर्चीवर हातपाय पसरून निवांत बसलेल्या मास्तराच्या अंगावरून ते पुढें गेले; व शेवटीं, भरभर पावलं टाकीत, पुनः तीरासारखे पाटसकरमास्तरांजवळच येऊन पोहोंचले; क्षणभर तिथंहि किंचित् घुटमळले !

—आणि मग, अगदीं त्यांच्या कानाला तोंड भिडवून, ते कांहींसें पुटपुटले.

त्यावेळीं बाकीच्या मास्तरांचे चेहरे किंचित् गोंधळले होते. थोड्या संकोचानें हळुहळुं बोलत, त्यांच्याकडे व निरोप कानांत पडल्यामुळें उठून उभ्या रहाणाऱ्या पाटसकर मास्तरांकडे, जणूं यांत्रिक हालचाल करतच, सारा शिक्षकवर्ग पहात होता.

तोंच...माझा निरोप घेऊन गेलेले ते मास्तर, माझ्याकडे वळून, खुणेनें मला पाटसकरांकडे बोट दाखवीत जणूं काय म्हणाले, ' या—या ना... हे पहा पाटसकर ...इथं आहेत ! '

पण लागलीच त्यांचा चेहरा पूर्वीपेक्षां अधिक गंभीर झाला; आणि आम्ही दोघे एकमेकांजवळ येईं तों ते निघूनहि गेले होते.

ते गेल्यावर, मी दुसऱ्या कोपऱ्यांतलि एका बांकावर, पाटसकरांशेजारीं ' काय दोस्त ? ' म्हणत बसलों. पण रहावेना म्हणून मी प्रथमच त्यांना विचारलं, ' आतां गेलेल्या मास्तरांचं नांव काय रे ? '

' कोण ?...ज्यांनीं आतां माझी भेट करून दिली तुला, ते म्हणतोस का ? ' पाटसकर थोडं हसत पुढं म्हणाले, ' वाः ! अरे ते तर आमचे कावळे हेडसर ! '

आणि एवढं बोलूनहि ते पुन्हां मोठ्यामोठ्यानें हसूं लागले.

या साध्या विधानावरही हसण्याइतका मास्तरी विनोद त्यांनीं काय साधला तें न समजून, मी तर अधिकच आश्चर्यानें त्यांच्याकडे पाहूं लागलों—



— ३ —

' म्हणजे, तुम्हांला जोडून असलेल्या प्रायमरी शाळेचे, हेडमास्तरच म्हणायचे ना हे ? ' माझ्याच कोड्याचं मीच स्पष्टीकरण करण्याचा एक प्रयत्न करून, पाटसकरांच्या बेछूट हसण्यांत मी व्यत्यय आणला.

" बारेऽ वा ! म्हणजे आमची प्रायमरी शाळा म्हणजे काय तुला ' कावळ्यांची शाळा ' वाटली होय ? "—तरीही पाटसकर हसतच होते.

("कावळे हेडसर" म्हणून मला ओळख करून दिलेली) ती व्यक्ति-म्हणजे मराठी शाळेचे हेडमास्तरहि नव्हेत, असं म्हटल्यावर, ( पाटसकरांना ते माझा निरोप स्वतःच पोचवतात, त्या अर्थीं— ) त्यांचे तरी ते हेडमास्तर खासच नव्हत, एवढं तर्कानें जाणण्याइतकी माझी बुद्धी देवदयेनें शाबूत होती. मला पाटसकरांच्या हसण्याचा रागच आला.

तेवढ्यांतच, बांकाशेजारच्या दारांत वाहणा करकरल्या. तीच ती व्यक्ति ( की जिच्याबद्दल पाटसकरांनीं मला नुकतंच चमत्कारिक कोडं घातलं होतं ) दारांत उभी राहून आंत ती पहात होती !

मघासारखंच दाराशीं थबकणं;...मघासारखाच गंभीर चेहरा ! जगांतली कोणती तरी कायमची हरवलेली भयंकर गोष्ट प्रयासानें हुडकून काढण्याच्या आवेशाची, मघासारखीच ( किंचित् वक्रभुवयांतून बाहेर पडणारी ) संशोधक, धांवरी, तरल, चौफेर फिरणारी दृष्टी ! मघासारखीच अस्वस्थ हालचाल व त्यामुळें तेल पाजलेल्या त्या कोंकणी वाहणांची हळूच होणारी कुरकुर !—

त्यानंतर ' भक्ष्य सापडलं रे सापडलं ' असा चेहऱ्यांत पुन्हां पुन्हां सूक्ष्म पालट करून, निरनिराळ्या कोपऱ्यांतून निवांतपणें बसलेल्या व्यक्तींवर पडलेल्या त्यांच्या अनपेक्षित झांपी...त्या त्या कानाशीं केलेल्या त्या रहस्यमय कुजबुजी !—

मला वाटतं, त्या चौकोनी खोलींत झालेल्या त्यांच्या त्या हालचालींचा नकाशा ( माफ ) काढला असता कोणी, तर भूमितीतील एखाद्या भयंकर प्रमेयाची आकृतीच तयार झाली असती !...व अधिक—उणें चिन्हं जमेस धरलीं असती,... तर सुरवातीच्या मध्यबिंदूपासून झालेल्या त्यांच्या हालचालींची बेरीज शून्यच भरली असती.

इतक्या घोळानंतर, शिरतांनाच (अगदीं दारांशींच) असलेल्या मी व पाटसकर बसलों होतों त्या बांकापाशीं ते आले !—

या त्यांच्या मधल्या हलत्या प्रवेशानें माझं कोडं तर अधिकच गहन झालं...

मधूनच एकदां पाटसकरांकडे व एकदां त्या हालत्या आकृतीकडे मी पहात होतों !—पण पाटसकर मात्र मौन स्वीकारून गालांतल्या गालांतच हसत, माझ्या निरीक्षणाला पूर्ण वांव देत होते !—

शेवटीं, त्यांना जवळ आलेले पहातांच, पाटसकर तिकडे पाहूं लागले; कानाजवळ तोंड केल्याशिवाय त्यांना कोणाशीं बोलतांच येत नसे, असं दिसलं; पाटसकरांना त्यांनीं कांहींतरी गुजगोष्ट सांगितली; गहन चेहरा करून त्यांनीं आपल्याला सर्व समजलंसं दाखविण्यासाठीं मान हालविली !...

आणि मला अधिकच बुचकळ्यांत पाडून, तो आपला दुसरा प्रवेश संपवून आल्या दारानें कावळे हेडसर पुन्हां बाहेर जाऊं लागले...

— ४ —

तेवढ्यांतच पाटसकर मोठ्यानें 'शुक् शुक्' करून एकदम ओरडले, "अरे अरेऽ पोवळेऽ ! जरा त्या कोपऱ्यांतल्या मडक्यांतून ग्लासभर पाणी देशील का प्यायला आणून ?"

त्या शब्दांनीं मी आश्चर्यानें दचकण्यापूर्वीच, कावळे हेडसर जातां जातां जागच्या जागीं थबकले;...मागें वळले;...माझ्या पहाण्यांत प्रथमच त्यांच्या चेहऱ्यावर किंचित् हास्य झळकून गेलं.—

पण मग, घाईघाईनें मडक्याकडे जाऊन, त्यांनीं ग्लासभर पाणी आणून पाटसकरच्या हातांत दिलं...

"आःऽहाः !...आतां ठीक !" असं म्हणून, (गटगटां पाणी पिऊन रिकामा केलेला) ग्लास पाटसकरांनीं त्यांच्या हातीं दिला. आणि मग जरा खालमान करावयास हातानें पोवळ्यांना खूण करून, त्यांच्या कानांत ते मोठ्यानें पुटपुटले, "जरा दोन तीन काड्या दे बुवा काढून, पोवळे !—आंकडेमोडीचं उरलंसुरलं काम संपवावयाचं आहे बापुडं ! आणि कोळशाशिवाय तर इंजन चालणार नाहीं पुढं !—"



'पोवळे' पुन्हां किंचित् हंसले; नंतर ते थोडेसे लाजले: त्यांनीं आपल्या झग्याच्या बाजूच्या खिशांतून हळूच आगपेटी काढली; पाटसकरांकडे ती मोठ्या अदबीनें दिली व लगबगीनें चालूं लागण्यापूर्वीं कुजबुजून म्हटलं, "मग सावकाशच परत या, सर !"—

'पोवळे' निघून गेल्यावर मात्र, इतका वेळ गंभीर झालेले पाटसकर माझ्याकडे साभिप्राय पाहून मोठ्या मोठ्यानें हसूं लागले—

मघांपासूनच्या साऱ्याच गोष्टी इतक्या गडबडीनें झाल्या होत्या, कीं...मला मध्यें कांहीं बोलतां-विचारतांच आलं नव्हतं. त्यांत आणखी तें सर्व झाल्यावर, पाटसकर असे पुन्हां हसूं लागले !

म्हणूनच, मी त्यांना थोडं दटावून म्हटलं, "काय चावटपणा चालवला आहेस रे, पाटसकर, मघांपासून ?— प्रथम म्हणालास हे आमचे 'कावळे हेडसर' !... मग म्हणालास 'कावळ्यांची शाळा' नव्हे ही ! ते समोर दिसल्यावर त्यांना तूं 'अरे तुरे' म्हणतोस ! अगदीं पाणी आणायला सांगतोस;... 'पोवळे' म्हणून भलतीच कुठली हांकहि मारतोस !...हे मास्तर नव्हेत हें आतां कळलेच...पण मग आतां आहेत तरी कोण हे ?..."

पाटसकर मिनिटभर खूप हंसले; मग मला गुपित सांगण्याच्या आविर्भावानें हळूच म्हणाले, "अरेऽ हा आमचा शिपाई... आपण दोघे प्रथमच मागं सुरुवातीला आलों होतों, त्यावेळीं तूं पाहिला आहेस कीं याला ! सारे त्याला 'अहो पोवळे' म्हणतात...इरसाल मुलं अगदीं न विसरतां प्रश्नचिन्हात्मक 'काऽहेडसर ?' म्हणतात...मी आपला त्याला 'अरे पोवळे' म्हणतो...."

पाटसकरांबरोबर पूर्वीं आलों असतां 'पोवळे' भेटल्याची माझी आठवण जागृत होत आहे, तोंच पाटसकर पुढें म्हणाला, "पगार रुपये साडेबावीस... पण कमाई रुपये मात्र कमींत कमी सत्तर पंचाहत्तर,... अर्थात् निदान नव्या मास्तरांइतका !... आणि त्यानें मला नुकतीच कानांत सांगितलेली रहस्यमय गुप्त गोष्ट म्हणजे 'पुढल्या महिन्याचा कॅटलॉग तयार करायचा असला तर घेऊन येतो मी कोरा'..."

त्या त्यांच्या आचरट पण अनपेक्षित गौप्यस्फोटानें मलाहि त्यांच्याबरोबर पुन्हां हसूं लोटलं.

— ५ —

पाटसकर नवीन कोरा कॅटलॉग घेऊन आले आणि एकीकडे धूर सोडीत हातानें मुलांची नांवं भरभर उतरत, मजबरोबर बोलूं लागले, " पोवळे म्हणजे एक चालतं बोलतं गूढगुंजन आहे, या जगांतलं ! त्याचं सारं आयुष्यच गूढगुंजनानें भरलं आहे, म्हणेनास !... "

" पण अजून त्यांचं सारं प्राथमिक गूढंच सोडवलं नाहीस तूं–" मी मध्येंच रागावून त्यांना अडवून म्हटलं, " एकूण हेडप्यून ना तुमचा तो ?—"

" कशावरून ठरवायचं म्हणतोस हें ? पगारावरून म्हणशील तर मुळींच नाहीं !... दुसरा अठ्ठावीसाचा गरीब बिचारा एक वेडा खंडू आहे ! " ते हंसून म्हणाले, " रुबाबावरूनच म्हणायचं तर मग त्याला प्यून तरी कां म्हणतोस ! आह्मी म्हणतों तेंच म्हण !— ' कावळे हेडसर ' "

" किती वर्षांचा आहे ? " मी माझी चौकस दृष्टी दाखविली.

" वयानं कां ? आहे सुमारें चाळीस !–" पाटसकर तुटकपणें उत्तर देऊन म्हणाले, "पण नोकरीनें सुमारें नऊदहा !–तरी तपस्वी आहे हा तो ! फक्त पाऊण तपाची तपश्चर्या झाली आहे त्याची ! पण त्याला विचारलंस तर आमच्यांतले कांहीं नवीन मास्तरही ' त्याचे विद्यार्थी ' असल्याचं सांगेल तो !... "

" तें असो; पण म्हणजे शिपाई होण्यापूर्वी काय करीत होता तो, आपल्या ऐन तारुण्यांत ?... "

" वा: !– अरे, एक महा पुराणपुरुष आहे तो ! " पाटसकर शाईच्या रबरानें कॅटलॉगमध्यें खोडाखोड करीत म्हणाले. " प्रथम प्रथम वर्तमानपत्रं घेऊन तो नाक्यानाक्यावरून हिंडे; मग वर्तमानपत्रं निर्माण करणारा प्रत्यक्ष ब्रह्मदेव–कंपोझिटर–झाला ! कांहीं दिवसांनीं बाइंडिंग खातं सोपं वाटलं त्याला. त्या काळांत 'सुरी मारणं' हें त्याचं वैशिष्ट्य होतं. मग पाहून पाहून स्टेशनरी मालाचं व वह्यांचं दुकान काढलंन् त्यानं ! तेव्हां मुलांची ये-जा वाढूं लागली. ओघानें त्यानें आपली पाटी ' स्टेशनर्स व बुकसेलर्स ' अशी बदलली. त्या धंद्याच्या व्यवहारांत प्रकाशक लोक फार फायदा खातात या आलेल्या प्रामाणिक अनुभवावर तो स्वत:च प्रकाशकहि झाला शेवटीं ! अंकलिप्यांची एकदम १०००० ची ' एडिशन ' काढलीन् ! झालं ! या गडबडींत जगाचा अनुभव त्याला पुष्कळ



आला ! पण त्याचा मागचा एक एक धंदा लोपत गेला. शाळा, मुलं, पुस्तकं, यांचा संबंध मात्र वाढत गेला. आणि मग एखाद्या ' पाहीन, पाहीन, आणि विलायतेला जाईन ! ' असं म्हणणाऱ्या बेकार ग्रॅज्युएटप्रमाणें,...त्यानें सर्व पाहीलं, पाहीलं,...आणि शेवटीं आमच्या शाळेंत शिपाई झाला तो ! "

— ६ —

" पण साधा शिपाई होण्यांत असं काय साधलं त्यानं ? हें तर तूं अधिकच गूढगुंजन करूं लागलास !—" मी पाटसकरांना म्हटलं.

" यांत गूढगुंजन रे कसलं, वेड्या ?–अगदीं सूर्यप्रकाशासारखं स्वच्छ आहे तें ! " पाटसकर गैरहजर मुलांची बेरीज करीत म्हणाले, " प्रत्येकाचं एक अवतारकार्य म्हणून असतं !— आपल्या या अंतिम ध्येयासाठींच जणूं, त्याची ती पूर्वतयारी होती ! तोंपर्यंतचा सारा अनुभव जमेस धरूनच, त्यानें हा पेशा शेवटीं पत्करला. अंकलिपीच्या प्रकाशकाप्रमाणें तो प्रथम मराठी शाळेंतच शिपाई होता. तरीहि अवघ्या नऊ वर्षांतच ही त्याची प्रगती कशी, झाली असं तुला वाटतं ? अंगीं ती कुवत असल्याशिवाय ?– अरे बाबाऽ...'सर्व्हायवल ऑफ् दि फिटेस्ट ! ' जग आहे हें ! आमचा तो मेंगळा खंडू म्हणूनच तर सायडींगला पडलाय् ! नुसता २८ रु. पगार काय करायचाय् ? मला कोणी विचारलं तर मी पोवळ्यालाच हेड-प्यून म्हणेन. कारण त्यालाच आपल्या धंद्याच्या साऱ्या गुरुकिल्ल्या ठाऊक आहेत !— वरीष्ठांशीं नमून, लाचारीनं वागायचं हें त्याला कळतं ! खालच्यांना गोड लाथा मारायचंही कौशल्य त्याच्याकडे भरपूर आहे. बरोबरीच्यांना खालचा दर्जा कसा द्यायचा याचं मर्म तो जाणतो. आणि आपल्यापेक्षां थोड्या वरच्या लोकांना तर तो मोठ्या खुबीनें ' आपणांसारिखे करतो तात्काळ '.. ! आजच्या काळांत एखादा शिपाईसुद्धां हुकूमशहा असावा लागतो, होऊं शकतो, हें तत्त्व तो हिटलरपेक्षांही जास्त चांगलं जाणतो !—"

पोवळ्याच्या तपश्चर्येचं माहात्म्य पाटसकर माझ्याकडे असं वर्णन करीत होते. त्यावेळीं माझ्यासमोर त्यांनीं नुकतंच सांगितलेलं विविधतेनें भरलेलं त्याचं पूर्व आयुष्य उभं राहात होतं !

" आतां हेंच पहा, कीं,—" तेवढ्यांत पाटसकर पुन्हा म्हणाले, " जुन्या गोष्टींचा नवा उपयोग किती सुंदर तऱ्हेनें करतो तो !— मघां पाहिलास तो

त्यानें चढवलेला मोठा डगला !— हा शाळेंत दाखल झाला तेव्हां आमच्या साहेबांच्या अंगावर होता तो. आज तोच अंगावर घालून त्याच शाळेंत पोवळे स्वत: हिंडत आहे ! यांत काय त्याचं कमी कर्तृत्व दिसतं ? जगांत जगायला अगदीं लायक माणूस आहे तो !—"

— ७ —

"त्यांचा जुना कोट घातला म्हणजे कांहीं तो स्वत: प्रिन्सिपॉल होत नाहीं !" मी थोडं हंसून पाटसकरांनीं केलेल्या पोवळेच्या त्या कौतुकाला सौम्य विरोध केला.

"अरेऽ पण त्याची तरी कुठं इच्छा आहे तशी ?" पाटसकर माझ्याकडे वळून हसत हसत त्याची वकीली करूं लागले; "रस्सीखेंच म्हणजे काय, सुवर्ण-मध्य म्हणजे काय,...त्याला चांगलं समजतं ! त्या पोशाखामुळें तूं निदान त्याला मास्तर तरी समजलास ना ? बस्स ! झाला हेतु सफळ ! पण तूंच काय, अरेऽ त्याचा पोशाख, त्याचं वागणं, त्याचं बोलणं,...यामुळें...तूंच काय, पण आमच्या-पैकींही कांहीं,...त्याला आपल्या बरोबरीचा समजतात. त्या खंडूला 'अरे' आणि याला 'अहो' हा भेदभाव तरी कोणी निर्माण केला, तुला वाटतं ? असल्याच प्रकारच्या पोवळेच्या योजकतेच्या कौशल्यानें !"

मी पाटसकराकडे पाहून हंसत आहे, तोंच ते पुढं म्हणाले, "न बोलतां हजारों कामं करील तो ! शद्बापेक्षां त्याची दृष्टीच अधिक बोलकी आहे; बोलण्या-पेक्षां त्याचं करणंच अधिक जोरकस असतं; तसा बोलत नाहीं फारसं तो; पण तो एक मतांचा मनुष्य आहे. एक धोरणी पुरुष आहे मोठा ! चेंबर्लेननंतर यालाच कां प्राईममिनिस्टर केला नाहीं, याचं मला मोठं आश्चर्य वाटलं !— एकवेळ मला ब्रिटिशांना गांधींसारखं अनावृत्त पत्र लिहिण्याचा मोहही झाला होता. पण गांधींच्या पत्राची दुर्दशा पाहून मीच हात आंखडता घेतला."

"पुरे पोरकटपणा ! तुझ्या पोवळेचा राजकारणाशीं संबंध काय पण ?" मी त्यांच्या कल्पनासाम्राज्यांत शिरायला त्यांना मध्येंच अटकाव केला.

"काय ? राजकारण ??" पाटसकर हंसून म्हणाले, "अरेऽ राजकारणच काय, समाजकारण, वाङ्मय, शिक्षण, प्रकाशन, सर्व बाबतींत त्याचा हात धरणारा कोणी सांपडणार नाहीं आमच्यांत ! वाचा मात्र फुटली पाहिजे त्याला !... हिटलरला कोणीतरी ठार मारलं पाहिजे, हें 'हिटलरला वेड लागलं' ही बातमी



प्रसिद्ध होण्यापूर्वींच त्यानें मला सांगितलं होतं ! महाराष्ट्र मागें पडला, हें माड-गोळकरांना समजण्यापूर्वींच त्याला समजलं ! दिवसेंदिवस आपला समाज चव-चाल होत चालला आहे, दुबळा होत चालला आहे, हें त्याच्याबरोबर वाद घातलास तर मोठ्या खुबीनें पटवून देईल तो ! एक बायको जिवंत असतांना लोक सुखासाठीं सुखासुखीं दुसरं लग्न कां करतात, हें त्याला दरी अजून आपला अनुभव जमेस धरून कळत नाहीं !"

मी हसत आहे तेवढ्यांत पाटसकर पुढं म्हणाले, "वाङ्मय ? वा: ! मोरमकरसाहेबांनीं 'विविधज्ञान विस्तारा'साठीं किती झीज सोसली हें तो सांगू लागला कीं अजूनही हळहळतो ! 'मनोरंजन' जास्तींत जास्त यशस्वी होण्या-साठीं धडपडूनही, मित्र कित्येकदां किती निराश होत, ही त्याच्या अगदीं डोळ्यापुढील गोष्ट ! 'संदेश' कचेरींत व 'चाबूकस्वार' कार्यालयांत डुलक्या घेत घेत 'साहेब' किती भरभर कॉप्या कंपाझिटरांकडे लिहून देत, अन्...त्यांच्या सारखा वाक्‌चगार संपादक सापडणं आतां किती दुर्मिळ आहे, हें त्याच्याइतका दुसरं कोणी सांगूं शकणार नाहीं ! काकासाहेबांचा 'नवाकाळ' मागल्या लढाईंत कसा वाढला व मामासाहेबांनीं 'दुनियेंत' उगाच उडी घेतली नसती तर का बरं झालं असतं;... याबद्दलही त्याच्या पोतडींत त्याचीं मतं आहेत. उगीच नाहीं मतांचा मनुष्य म्हटलं मी त्याला ! हं..."

"हे झाले त्याच्या वर्तमानपत्रविक्याच्या न् कंपॉझिटरच्या आयुष्यांतील अनुभव ! दुसरेही धंदे केले होतेन् ना म्हणतोस त्यानें ?" मी पुन्हां कुतुहलानें पाटसकरांना विचारलं.

"हो, होऽ ! एक कां ? अनेक ! ...आणि त्याबद्दलही त्याचीं स्वतंत्र मतं आहेत." पाटसकर कॅटलॉग संपवून बाजूला ठेवीत म्हणाले, "केलान् अंकलिपी प्रकाशन धंदा !–पण तो बोलण्याच्या ओघांत आला म्हणजे सांगतो– 'साहेब, गेला आतां, प्रकाशकाचा धंदा गेला !...काळ्या मचकुर कागदावर छापलेलीं पुस्तकं, वर दुप्पट किंमत छापून, पाऊणपट किंमतींत ग्राहकांना देणाऱ्या 'सरस' नी 'सुरस' ग्रंथमालांनीं जेवढा पैसा केला आणि त्यावेळच्या बुकसेलरांनीं तसल्या पुस्तकांवरच्या कमिशनवर जेवढे बंगले बांधले, तेवढा ड्राईंगपेपरवर लठ्ठ पुस्तकं छापणाऱ्या आतांच्या प्रकाशकालाही मिळवणं शक्य नाहीं. बुडत चालला धंदा,

साहेब ! कॉंपिटिशन ! कॉंपिटिशन ! त्यावेळीं तें नव्हतं. आतां उठला-सुटला प्रत्येक झाला प्रकाशक नी बुकसेलर, प्रकाशक नी बुकसेलर ! एकाच वेळीं एकमेकांचे नि स्वतःचे गळे कापायचे धंदे हे ! इकडे कागदाचा भाव कडाडलाय् ! तगडं महाग झालीं !... शिरस चढला ! माणूस काय धंदा करणार ? बोला ?.? शाळेच्या पुस्तकांत चार पैसे मिळायचे, तेबी आतां गेले. सगळाच सत्यानाश ! तुमची हल्लींची काय बिटी की फिटी म्हणतात ना साहेब, तिनंच गोंधळ घातला ! उठला सुटला काढतोय् गुच्छ आणि हार ! गुच्छ अन् हार !! नि जाड टायपांत छापलं नि वर रंगीबेरंगी साडी नेसवली कीं झालं म्हणे मुलांचं पुस्तक !- पण आपल्याला काय कळतंय् त्यांत ? साधे शिपुरडे आपण, सर ! !'—"

पाटसकर हसले आणि पुढं म्हणाले, " अरेऽ एकदां त्याची ही गाडी सुरूं झाली कीं तो मनांतली सारी मळमळ ओंकून टाकणार एकदांची ! आणि मग मात्र पुन्हां पहिला गंभीर चेहेरा करून कांहींएक न बोलतां तो पुढला महिना काढेल ! "

— ८ —

" असा आहे तुझा पोवळे म्हणतोस ?" मी हसून म्हणालों नि मग त्यांना विचारलं " पण तुमची इतकी दिलजमाई आहे, तर मघां पाणी पिण्याचं अन काड्या मागण्याचं माझ्यापुढं सारं नाटक कां केलंस रे ? "

पाटसकर पुन्हां खवचटपणें हसूं लागले, आणि मग हांसत हांसता थांबून म्हणाले, "ओळखलंस ! ओळखलंस !... पण बाबा मानसशास्त्र आहे हें ! दिलजमाई तरी काय फुकट आली आहे ? मी त्याला ओळखतों, हें तो ओळखतो, हें मी पण ओळखतों, म्हणूनच ! अशी एखाद्याकडेच तो नांगी टाकतो. तेव्हां मधून मधून त्याची नांगी तशी ठेंचलेली ठेवावी लागते. ' बाबाऽ तूं एक शिपाई आहेस !' अशी त्याला मधूनच पुन्हां एकदम जाणीव करून द्यावी लागते. नाहींतर—हां हां म्हणतां, त्याच्या बरोबरीच्या नात्याची वहिवाटच पडून जायची !— विशेषतः, तो असले चमत्कारीक चेहेरे करून गूढगुंजन--काव्य करूं लागला, कीं, त्याच्या त्या डबडयाच्या काव्यमय परमोच्च बिंदूपासून एकदम त्याला कड्यावरून खालीं ढकलून द्यावा लागतो- मग तो असा शिपायांत पडला कीं, माणूस म्हणून तत्काळ जागा होतो !—"



" त्याची तुझी दिलजमाई व्हावी, हें आश्चर्य म्हणायचं ! " पाटसकरांना मी पुस्ती दिली.

" होऽना ! अरे ती तर गंमतच आहे ! माझ्याबरोबरही सुरवातीला बेटा आपलं गौडबंगाल खेळत असे ! दोन तीन वेळा मी निरनिराळ्या वर्गांत शिकवीत असतांना, तो हळूंच आंत डोकावून पहून गेल्याचं माझ्या लक्षांत आलं होतं. जणूं काय आम्हीं वर्गांत काय करीत आहोंत हें तो पाहून जात असावा !"

मी उत्सुकतेनें पाटसकरकडे पहात असतां, ते हसून पुढं म्हणाले, " एके दिवशीं अचानक मी त्याचा सोक्षमोक्ष लावला. त्या दिवशीं त्याची मला चाहूल लागतांच, शिकवतां शिकवतां मी ताडकन् उठलों; आणि दारांत जाऊन, त्याचं एकदम मनगटच धरलं; आणि त्याला दरडावून विचारलं, ' काय पाहिजे रे, पोवळे, तुला ? कां डोकावून पहात होतास ? '— ' कांहीं नाहीं ' असं त्याचं गुळमुळीत उत्तर ऐकतांच, मी तडक त्याला प्रिन्सिपॉलकडे नेलं, अन् त्यांनाहि स्पष्ट विचारलं, ' तुम्ही याला माझ्याकडे हेरगिरीला पाठवलं होतं, सर ? '—"

पाटसकर मध्येंच नाटकी पद्धतीनें थांबले; मी जास्तच उत्सुकपणें त्यांच्याकडे पाहिलं; तेव्हां ते पुढें म्हणाले, " आमचे प्रिन्सिपॉल आहेत फार धोरणी ! त्यांनी लागलीच त्याला बाहेर जायला सांगितलं; आणि मग माझं सांत्वन करीत मला ते म्हणाले ' अहो तो चमत्कारिक मनुष्य आहे ! तुम्ही उगीच त्याच्या नादी कां लागतां ? आपल्याच कल्पनेनें अनेक गोष्टी करतो तो ! कधीं कधीं मलाही त्यातलं कांहीं कांहीं तो सांगतो, नाहीं असं नाहीं ! पण चांगलं काय, वाईट काय, मलाही कळतं !— आतां त्या मूर्खाला काय सुधारणार आपण ?— बाकी हुशार आहे, चलाख आहे, तिकडं पहावं आपण ! बाकी सोडावं ? नाहीं ?' "

क्षणभरानें पाटसकर हंसून मला म्हणाले, " आणि त्यांचंही एका अर्थीं बरोबरच होतं ! अठरा अवधानी हरहुन्नरी मनुष्य ! शिपाई म्हणून तो शाळेला मिळायलाहि मोठं भाग्य लागतं ! "

— ९ —

" पण या प्रसंगानेंच तुझी-त्याची दोस्ती ?" मी पाटसकरांना विचारलं.

" जरूर, तेव्हा वाढायलाच पाहिजे होती तुमची !- "

" हेंच तें !- तुम्ही आमच्या बी. टी. मेथडनें शिकलेलीं पोरं नव्हेत !-"

पाटसकर गमतीनें हंसून म्हणाले. “ इथं बघ, आमच्या मानसशास्त्राचा प्रांत सुरू झाला. अरे बाबा, या त्याच्यावरील कुरघोडीनेंच तर तो नरम आला !– चार दिवसांनीं माझ्याकडे पाहून हसला–आठ दिवसांनीं माझ्याशीं बोलला ! पंधरवड्यानें माझ्याकडे दिल खुलं केलन् ! अगदीं महिन्याभरांत आपलं आत्म-चरित्र मला सांगितलंन् ! आपला तोल ओळखलान्...आणि माझ्याशीं वाग-तांना तरी तो सावरलान् !– ‘ अहो पोवळे ’ ला मी ‘ अरे पोवळे ’ म्हणूं लाग-तांच मला तो ‘ साहेब ’ म्हणूं लागला !– ”

“ इतका पाताळयंत्री आहे ?–” मी पाटसकरांच्या स्पष्टीकरणाला नवी कलाटणी दिली –

“ धोरणी आहे, कारस्थानी आहे...नाटकी आहे, म्हण पाहिजे तर !– पाटसकर म्हणाले. “ पण पाताळयंत्री म्हणजे दुष्ट आहे असं नाहीं म्हणणार मी !– माणसाच्या मनाची मात्र त्याला चांगली पारख आहे. तास चाललेला असला आणि समोरच्या घरांत मोठ्यानें रेडिओ चालला असला, तर हा आपणच मोठ्या रुबाबांत जाऊन आदबीनें त्यांना विनंती करील !– दोन मिनिटांत गोंगाट थांबेल; आणि वर्ग सुरळित पुढं चालूं लागेल...मागें एकदां समोर ११॥ चे लग्न निघून वाजंत्री न् मंगलाष्टकं सुरू झालीं होतीं. हा त्या समारंभांत धरिानें शिरला. भटजींचा भसाडा आवाज थोडा हळूं झाला–वाजंत्री चार मिनिटांनें थांबली न् पुन्हां परत येतांना तीन नारळ घेऊन आला आपला, पोवळे !– ड्यूटी करतां करतां तीन दिवसांच्या आमटीची बेगमी !... आहे कीं नाहीं ? ”

“ पण मुलांबरोबर मात्र फार चढेल वागत असेल नाहीं ? ” मी दुसऱ्या बाजूस दृष्टी फिरवली.

“ नाहीं !– तेहि त्यांच्या वयावर, यत्तेवर न् स्वभावावर बरंचसं अवलंबून असतं ! ” पाटसकर हसून म्हणाले. “ लहानांना दम देईल; पण त्यांचा कैवार घेईल !... मधल्यांना धीर देईल; आणि त्यांच्या कलानें सारं करील ! सहावी सातवीच्या ‘ घोडे ’ मुलांबरोबर छाती पुढें करून चालेल. ”

– १० –

एक प्रसंग आठवीत पाटसकर किंचित थांबून पुढं म्हणाले. “ तिसरींतला एक मुलगा परवां वर्गात धाडकन् खालीं पडला...तिरमिरला;...पोवळे धांवत गेला;



त्याला त्यानं अलगद उचलून नेऊन, खुर्ची मागं कलवून बसवलं ! अर्धवट भानावर येतांच, मुलगा घाबरून म्हणाला, ‘ नकोरे नको ! पोवळे सर येतील !’ पण त्याला वारा घालून प्रेमानें धीर देत, हा म्हणाला, ‘ अरे दम तूं ! सर येऊं देत, नाहीं तर अगदी हेडसर येऊ देत ! कांहीं एक घाबरूं नको ! मी आहे ! ’ तो सावध झाल्यावर त्याला त्यानें आपल्या खिशांतल्या आण्याचा कपभर चहा पाजलान् अन् म्हणाला, ‘ जा ! तूं तडख घरीं पळ ! न् विश्रांति घे ! ’ सर रागा-वतील या भीतीनें त्याला तिथंच घुटमळतांना पाहतांच, पोवळे त्याच्या पाठीवर हात फिरवीत धीर देऊन म्हणाला, “ अरे जा तूं,...खुशाल जा घरीं; मी घेईन सरंचं सारं पाहून– ”

मला त्या प्रसंगाची गंमत वाटली; तेवढ्यांत पाटसकर म्हणाले, “ त्याचा आत्मविश्वासच दांडगा–कोणाला हार जाणार नाहीं बेटा !...सारीं मोठीं मुलं म्हणूनच तर...जणूं त्याला प्रश्नार्थक आवाजांत हांक मारतात, ‘ काऽहेडसर ’—”

“ मग त्याचं ‘ कावळे हेडसर ’ कसं झालं ? ”

“ त्याच्या काकदृष्टीवरून !– ” पाटसकर हसून म्हणाले, “ कारण इतकं त्याच्या अंतरंगाच्या खोल पाण्यांत शिरतं कोण ?... तेव्हां त्याची ही नेहमीं दिसणारी कावळ्याची नजर...नी मुलांनीं दिलेलं नांव यांचा मास्तरमंडळींनीं असा रुबाबदार विस्तार केला आहे, एवढंच !... पुन्हां मास्तरी जग जरा मागं पडतेयसं वाटलं, तर पोवळे स्वतः आपल्याच अधिकारांत आपलं जुनं रास्कोप घड्याळ न् त्याबरोबरच शाळेचंहि घड्याळ सकाळीं सुरवातीलाच दहा दहा मिनिटं पुढं करतो !...मागें करायचं असलं तरी अगदीं शेवटचा तास चालूं असतांनाच ! असल्या अनपेक्षित रस्सीखेचीनें आपोआप सुवर्णमध्य तयार होतो !...पण हीं किंवा असली गुप्त मतं तो बाहेर मात्र बोलून कधींच दाखवणार नाहीं !–मनां-तल्या खऱ्या भावना तो चेहऱ्यावर कधींच उमटवून दाखविणार नाहीं !–त्याचा चेहरा,... त्याचं चालणं, बोलणं, वागणं, हसणं, फार काय त्याचं सारंच जीवन...एक गूढगुंजनामक महाकाव्य आहे ! !– ”

– ११ –

“ आहे खरा तुझा कावळे हेडसर...एक प्राणी !– ” मी हसत म्हणालों.

“ एक मात्र गंमत आहे त्याची ! ” नवीनच हकीगत आठवल्यासारखा चेहरा करून पाटसकर पुढें म्हणाले, “ शाळेसाठीं आपण झाडूहि हातांत घेतों, हें आपल्या वरिष्ठांना दाखवण्याला तो लाजत नसला, तरी तिऱ्हाइतांपुढें किंवा आम्हां मास्तरांपुढंहि तो तसा यायचा नाहीं !–एकदां आमच्या एका पोरगेल्या शिपायानें हा रविवारी दुपारीं झाडत असतां ‘ साहेब बोलावताहेत ’ म्हणून निरोप दिलान् !–घाईघाईनें जवळ पडलेला झाडू झटकन् हातांत उचलून घेऊन, पोवळे मोठ्या दाराशीं आला; तिथं कोणी पगडीवाले पाहुणे पहातांच, त्यानें घाईघाईनें हातांतला झाडू वाटेंतच टाकला व धोतराचा सोगा नीट खालीं सोडीत, तो पुढं झाला. त्यांना पाहिजे ती माहिती मिळाली आणि ते निघून गेले. पण त्यानंतर अर्धा तास तो त्या गड्याशीं जोरजोरानें भांडत होता !– ‘ ‘ विजीटर ’ समोर मानसाची ‘ पोर्जीसन् ’ घालवायची म्हणजे काय ? ’ हाच त्यांच्या भांडण्याचा मुद्दा होता !— ”

पाटसकर आणखीहि कांहीं बोलत राहिले असते; पण तेवढ्यातच पोवळे दारावरुन हळूच तीन चार फेऱ्या मारून गेला ! . .

“ बहुतेक त्याला आपली काच्याची पेटी परत मागायची आहे ! . . ” पाटसकर हसून म्हणाले. “ पण तो बोलणार नाहीं ! . . अशा आणखी पांच सहाहि फेऱ्या मारील ! . . पक्का गूढगुंजन-कवी आहे ! . . त्याच्या असल्या काव्यांतून, वाटेल त्यानें वाटेल तो संशयी अर्थ काढावा ! . . ”

-- १२ --

पण मी त्यावर कांहीं बोलण्यापूर्वीच पाटसकरांनीं त्याला हांक मारली, “ अहो पोवळेऽ !– इकडं या पाहूं– ”

पोवळे जवळ आला. तो आल्यावर पाटसकर हसून म्हणाले, “ तुम्हाला आतां पांच मिनिटं आपल्या मागल्या बिऱ्हाडीं जाऊन घोंटभर चहा ’नी चार झुरके मारून यायचं असेल–. . . होना ?–काच्याची पेटी पाहिजे असेल तुमची तुम्हाला परत ?–. . . घ्याऽना मग !–लांबून लांबून येऊन काय जातां ? ”



पोवळेच्या गंभीर चेहऱ्यावरं क्षणभरंच ओशाळं हास्य चमकलं ! त्यानें [illegible] जगांत कोणालाच कळलं नाहीं अशा पद्धतीनें--पाटसकरांकडून ती काच्याची पेटी घेतली व आपल्या डगल्याच्या खिशांत कोंबली. मग हसत हसतच तो तिथून झटकन् निघून गेला !—

त्याच्या कमी बोलण्यांत, कमी हसण्यांत, हेरणाऱ्या दृष्टींत न् अस्वस्थ हालचालींत केवढा गहन-अर्थ भरला होता ! !–

एका न्याऱ्या जिवंत मासलेवाइक प्राण्याचीच ओळख झाली होती माझी, पाटसकरांच्या संगतीमुळें !—

---

—— ओळखतां ? ——

रघुवीर सामंतांची

**उपकारी माणसें**

* [ स्वयंपूर्ण खंड--१-२-३-४ ] *

मराठींतील

पहिलीच प्रदीर्घ कादंबरी

* [ पृष्ठें डेमी ९०० हून अधिक ] *

१ प्रवासांतील सोबती ( पत्रात्मक )
२ अभ्र-पटल ( कथनात्मक )
३ आकाश-गङ्गा ( आत्मचरित्रात्मक )
४ घरोघरच्या देवी ( नाट्यात्मक )

— ओळखीचीं वाटतील —

# स्थितप्रज्ञ ★ ४

आपल्या डळमळत्या जुनाट खुर्चीवरील बैठक, नाकावर टेंकून कानांना दोरीनें बांधलेली लडबडती चाळशी, जाड भिंगांमागचे किलकिले डोळे, अंगणांतील ( फारशी प्रभा नसलेल्या ) प्रभाकर कंदिलाचा उजेड, कुठल्याहि वर्तमानपत्रांतील कुठलाहि मजकूर, असल्या एकूण साहित्यावर अण्णांचं नेहमीं अव्याहत वाचन चाले.

वाढत्या वयामुळें त्यांच्या चेहेऱ्यावर थोड्या जास्त सुरकुत्या दिसत; तरी त्यांचा तो परिचित ( किंचित स्थूल ) देह, दिवसेंदिवस तांबड्या रंगावर झुकणारं गुडघ्याइतकं मळकं धोतर, अंगातील रेघारेघांचा सैलसा सदरा, कांहींशा हंसऱ्या पण गंभीर म्हाताऱ्या चेहेऱ्याला शोभून दिसणाऱ्या दाभणकांठी पांढऱ्या मिशा, ... असा सारा अगदीं पुरातन काळापासून चालत आलेला थाट, जशाचा तसा तिथच्या तिथंच होता !—

नव्या व धांवत्या जगाकडे अण्णा वैद्यांनी आपल्या जुन्याच चष्म्याच्या जाड भिंगांतून, आपली मंद स्थिर दृष्टि रोजरोज टाकल्यामुळेंहि असेल कदाचित्, त्यांच्यांत फारसा फरक पडलेला नसावा !—

पंधरा वर्षांपूर्वी पन्नाशीनंतर, सरकारी नोकरीचं पन्नास रुपयांचं पेन्शन घेऊन, एका बाजूच्या या खेड्यांतील त्या लहानशा घरांत अण्णा वैद्य एकदां येऊन राहिले, ते तिथंच एकाद्या ग्रहाप्रमाणें स्थिर होऊन, आपल्या नित्याच्या ठराविक कक्षेंत शांतपणें फिरत होते !—

वास्तविक, वैद्यकी त्यांचा केवळ आवडता शोक; पण पेन्शनच्या जोडीला, इथं आल्यापासून बसल्याबसल्या त्यांनीं तो सुरू केला. आणि या बाबतींतलं त्यांचं मोठं तत्त्व–(त्यालाहि स्वतांच्या दृष्टीनें त्यांनी कांहीं स्वार्थी मर्यादा--मुरडी घातल्या होत्याच म्हणा )—म्हणजे, ' जगांत प्रत्येक गोष्टीला प्रत्येक कालखंडांत कांहीं तरी कमी जास्त किंमत ही असतेच !—



मग तेथलीं जवळपासची दहापंधरा खेडवळ घरं नि आसपासच्या [illegible]तील पांच-दहा लहानलहान खेडीं, यांच्यावर विसंबून, अण्णा वैद्य ( आपल्या [illegible] फावल्या वेळांतील धंद्यांतूनही) दहाबारा रुपये जागच्या जागीं उभे करीत !

याशिवाय अण्गांना आतां आणखी तीन प्रकारचे उद्योग ! एक म्हणजे [illegible] घरकाम स्वतः करायचं. दुसरं जवळपास शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे मिळतील तीं [illegible] इंग्रजी, मराठी वर्तमानपत्र-मासिकं वाचावयाचीं आणि तिसरं–सर्वांत मह[illegible]–म्हणजे चुरशीचे वादविवाद करायचे !—

[illegible] —

अण्णांच्या घरगुती कामांत हजारों गोष्टींचा समावेश होई—

[illegible] रहावयास आल्यानंतर, पहिली पांच वर्षं तर त्यांना फावला वेळही [illegible] नसे. त्या काळांत संधिवाताच्या विकारानें आजारी असलेल्या आपल्या [illegible] अत्यंत दक्षतेनें सेवाचाकरी करण्यांत ते अगदीं गुंग असत. तिच्या आजा[illegible] बाबतींत मात्र ते स्वतःच्या साऱ्या मात्रा गुंडाळून ठेवीत. डॉक्टर, वैद्य, [illegible], ताईत, अंगारे धुपारे, यांपैकीं कोणतीच गोष्ट–आपला विश्वास असो वा नसो–[illegible] त्या वेळीं वगळली नव्हती !... आणि खरोखरच, अतिशय शारीरिक व [illegible] हाल सोसूनहि त्यांनीं तिची इतकी अव्याहत शुश्रूषा केली होती, कीं, [illegible] उच्च त्याग पाहून कोणत्याही लोकप्रिय कादंबरीकाराच्या उथळ प्रेम[illegible] नायक–मानसपुत्रानें लाजेनें पटकन् मान खालीं घालावी व अण्णांचं [illegible] काल्पनिक असं म्हणतच सुस्कारा सोडावा !–

पण अखेर सर्व प्रयत्न निष्फळ ठरले; आणि त्यांची पत्नी, त्या आजारांतच [illegible], त्यांना सोडून गेली.

मूल ना बाळ; एकटा जीव. प्रथम अण्णांना वाईट वाटलं; पण मग, तिच्या [illegible] आपल्या साऱ्या तनमनधनाच्या दगदगींचा त्या मृत्यूनें एकदां काय[illegible] केला होता; नि याचं त्यांना अखेर समाधानच वाटलं. त्यानंतर मात्र, [illegible] वर्षे, त्यांचं हें नवीन एकाकी आयुष्य अखंड चालू झालं होतं.

सकाळीं उठलं, कीं, घरापाठीं बाळगलेल्या गाई–म्हशींची स्वतः सेवा [illegible] करायची; त्यांच्या धारा काढायच्या;...त्यांना पाळीपाळीनें आलटून

-पालटून स्वच्छ धुवायचं;... शेणगोठा करायचा;...आपलीं घरांतील भांडी-धुणीं स्वतां संभाळायचीं;...असं सारं चाले.

सकाळीं एका ठरलेल्या जांबानें दोन मापं दूध प्यायचं;...त्यानंतर इकडे चूल-वाइल-शेगडी यांवर भाजी-आमटी-भात अशी स्वयंपाकाला सुरवात, नि मागील परसांत, स्वतः हौसेनें लावलेल्या भाजीपाल्याला मधून मधून खतपाणी करायचं; तेवढ्यांतच, मध्यें कोणी पेशंट आला तर त्याची 'हजेरी,' त्याच्या औषधाचं 'काम्पाउंडिंग';-आणि बारा साडेबाराला स्वतःच केलेलं जेवण...

पुढले दोन तास वामकुक्षी;...मग जवळपास सांपडतील तेवढीं नवीं जुनीं नियतकालिकं चाळणं;...पांच साडेपांचच्या सुमारास चरावयास गेलेल्या गुरांच्या परतण्याची, वर्तमानपत्रांतून मधूनमधून दृष्टि काढून, वाट पहाणं;...आणि तीं आल्यावर, पुन्हां मागील परसांत त्यांची व भाजीपाल्याची निगा.

संध्याकाळीं सूर्यास्ताला, ( त्या सकाळच्याच जांबानें ) चार मापं दूध घेतलं, कीं, कोणाबरोबरहि, ( मनुष्य भेटेल तसा, तो म्हणेल तिथं जाऊन, ) त्याला आवडेल त्या विषयावर,—रात्रीं साडेआठपर्यंत—वादविवाद-चर्चा;—आणि शेवटीं, बरोबर साडेआठच्या ठोक्याला झोंपेची आराधना—झालं दिवस संपला !—

— ३ —

हा सारा कार्यक्रम अण्णांच्या इतका अंगवळणीं पडला होता, कीं, त्यांत जरा देखील फेर करणं, कोणाला—त्यांना स्वतःला देखील-शक्य नव्हतं !-

अण्णा इथं आले, तेव्हां त्यांच्या मागें एक गाय व एक म्हैस एवढाच परिवार होता. पण आतां ? नाहीं म्हटलं तरी-तीन म्हशी, चार गाई आणि लहान-मोठीं अनेक वासरें रेडकें झालीं होतीं. तरी पण त्यांतलं एकहि रोडकं नव्हतं, हें विशेष. पूर्वी ओसाड दिसणाऱ्या परसांत आतां तीन सीताफळी, दोन मोठे शेवगे, एक दोडक्याचा वेल, एक तोंडलीचा मांडव, कागदी लिंबाचं भरगच्च झाड, आंब्याचीं मोहरलेलीं दोन कलमं,...असं सारं सारं होतं.

—आणि म्हणूनच, घर मालकाला, कधीं कधीं अण्णा थट्टेनें म्हणत,—" अगदीं बारा वर्षांवर वहिवाट झाली आहे, बरं का, माझी ! आतां या साऱ्यांतील करशा करशावरं म्हणून तुमचा कांहीं एक हक्क नाहीं !-समजलं ? "



आणि त्यांच्या त्या धमकींत खूपच तथ्य होतं !-

वर्तमानपत्रं वाचण्याच्या बाबतींत तर अण्णा वैद्यांकडे नवं-जुनं, आपलं-दुसऱ्याचं,...हे किरकोळ भेदभाव फारसे कधींच नसत. एकादं वर्तमानपत्र त्यांनी स्वतः पूर्वी चाललेलं नसलं, म्हणजे झालं; त्यांचं काम होई. पूर्वी पूर्वी, ते एखादं वर्तमानपत्र स्वतः विकतहि घेत असत. पण मग, पुढं पुढं हीं महाराष्ट्रांतील वृत्तपत्रं दिवसेंदिवस संख्येनें बेटीं इतकीं झपाट्यानें वाढूं लागलीं,...(सनातनी-नवमतवादी, जहाल-मवाळ-शिवराळ, असले व आणखीहि कित्येक ) त्यांच्यांत इतके विविध गट पडूं लागले—कीं, एकाच माणसाला तीं सारीं विकत घेणं किंवा सांभाळणं शक्य होईना. टेबलावर पडल्यापडल्याहि तीं आपआपसांत हमरीतुमरीवर येऊं लागत !—

तेव्हां शेवटीं, एके दिवशीं, एकदम त्राग्यानेंच अण्णांनी स्वतःशीं ठरविलं, कीं-'कोणतंच पत्र स्वतः म्हणून विकत घ्यावयाचं नाहीं !'—कारण ते स्वतः तरी अगदीं उदारमतवादी होते. त्यांना हीं सारीं चालत व सारीं पाहिजे होतीं.

अर्थात् अण्णांनीं आपल्याला एक दंडक मात्र घालून घेतला होता; तो असा कीं, जें जें म्हणून दुसऱ्याकडे जवळपास सांपडेल, ( मग तें मालकानें स्वतःचं वाचून झाल्यावर त्यांच्या हातीं सावकाश अर्धमुर्ध लागूं दिलं तरी चालत असे त्यांना )-तें ते सर्व हस्तगत करायचं व ( शक्य तर जाहिरातीसकट, पहिल्या पानापासून शेवटापर्यंत ) सारं ओळ न् ओळ आत्मसात करायचं !—

—अर्थात् इतक्या सामुग्रीनंतर, अण्णांच्या दिनचर्येंत वादविवादाला विशेष स्थान मिळावं, यांत आश्चर्य कसलं ?—आणि म्हणूनच, दुसरं कसलं नसलं, तरी अण्णा वैद्यांना वादविवादाचं मात्र एक मोठं व्यसन होतं!...

— ४ —

आणि या बाबतींतहि लहान-मोठा, विद्वान्-गांवढळ, सनातनी-नवमतवादी असले कांहीं भेदभाव नसत, त्यांच्यापाशीं !—

म्हणूनच, ते लहान मुलांबरोबर इसापनीतीच्या किंवा पंचतंत्राच्या तात्पर्यात्मक गप्पागोष्टी करीत;...तर तरुणांबरोबर आवेशानें चढ्या आवाजांत व आवाज चढवीत...'बंगाल फाळणी,'...'दहशतवादी कट'...'महायुद्ध,'...

'सरकार–असहकार, '...'गांधीजींची हिमालयाएवढी चूक,'... 'समाजस वाद'... 'साम्यवाद,'...असले लहान मोठे सारे जोरदार व जाडेभरडे श वापरून, त्याबाबत वादाच्या गोष्टी करीत !—

प्रौढ, संसारी गृहस्थांना, आपल्या व इतरांच्या सुखदुःखमिश्रित सं अनुभवांचे ( दासबोधाचा आधार घेऊन व ज्ञानेश्वरीची पुष्टि जोडून ) बेरवा घुटके पाजीत; उलट, आपल्या बरोबरीच्या उतार वयाच्या माणसाबरोबर, एकदां 'ईश्वर आहे' ही बाजू घेऊन आणि एकदां 'ईश्वरबिश्वर सब झूट' अशी बाजू घेऊन, एकदां कपाळावर आठ्यांचं जाळं पसरून 'धर्म बुडाला' 'समाज मेला' असं म्हणत, तर एकदां 'अस्पृश्यांचा मंदिरप्रवेश' 'सं नियमन' या गोष्टींना पाठिंबा देत, समाजक्रांतीच्या आवश्यकतेबद्दल ते त तावानें तास तास चर्चा करीत.

आणि वादविवादाचे हे सारे प्रकार संपले, कीं, तेच सारे वि बोलतां बोलतां ( कधीं कधीं आलटून पालटून नि निरनिराळ्या वयाच्या व्य बरोबर सूक्ष्म गणितशास्त्राच्या आधारें लढून ), चर्चेला मस्त विविधता आ हाहि त्यांचा एक मोठा वैयक्तिक शोक असे !—

— ५ —

तरीपण, कडाक्याचा कसलाहि वाद चाललेला असला, तरी आप दिनचर्येच्या लहानसहान ठराविक कार्यक्रमांना मात्र अण्णा कधीं विसरत नस कीं, फांटा देत नसत !—

'कांसव सशाच्या पुढें कां गेला ?' याविषयीं तात्पर्यात्मक चर्चा क करतां, अण्णा मध्येंच थांबत, नि समोर बसलेल्या त्या छोट्या बालगोपाळ एकदम सांगत,—"अरे बाळांनो, म्हशीचं शेण भरून टाकायचं आहे माझ मला मदतीला लागा मागल्या गोठ्यांत...तुमच्यांतले कोण कोण येतंय्? चला..

'हॉटसनवर गोगट्यानं गोळी कशी झाडली ?' किंवा, 'भगतसिं असेंब्लींत बाँब व हँडबिलं कशीं उधळलीं !' याविषयीं गरमागरम चर्चा खुश चालू असूं द्या; ते मध्येंच आपल्याजवळ बसलेल्या तरुणाला म्हणत, "श हं ! मला तर अजून तांदुळहि वैरायचे आहेत आधणांत ! आणि माझं सका दूध घ्यायचंहि राहिलं आहे ! माझी अंबू शिंची कमी धार द्यायला लागलीय्...



'पूर्वीचा मॅट्रिक व आतांचा बी. ए.' अगर 'पूर्वीचा बी. ए. व आतांचा एम्. ए.' यांची बसल्या बसल्या अगदीं आवर्तदशांशापर्यंतहि ते समीकरणं मांडून तुलना करीत; 'चालू जमान्यांतील बेकारी व तीवरचे उपाय' या बाबत अण्णा बोलत;...किंवा आजच्या नवमतवादी तरुणांच्या 'कवि–विवाहा' विषयीं अगर एकंदरींतच चालू असलेल्या प्रेमाच्या पाणचट चाळ्यांविषयीं बोलत. अशावेळीं ते आपलीं सडेतोड मतं अगदीं स्पष्टपणें बोलून दाखवीत !—

पण मग, असं करतां करतां, आपल्यासमोर बसलेल्या प्रौढ माणसाला अण्णा एकदम म्हणत, "तें कांहीं नाहीं ; जग बघा,—आपण म्हणतों त्यापेक्षां झपाट्यानं बदलत आहे ! तरी पण दिवसोंदिवस हा अस्सा उथळपणा वाढतोय थोडं सुख व पशुवृत्ति याबाजूसच साऱ्या समाजव्यवहाराच्या तराजूचा कांटा झुकूं लागला आहे ! पशूंत व माणसांत आतां भेद कसला राहिला, सांगा ? पण बरी आठवण झाली ! माझीं गुरं चरून परततील आतां; गेलं पाहिजे मला !"

आणखी थोडं पुढंहि जाऊन, 'बाठ्यांतून झाड व झाडांतून बाठा' असली जगाच्या उत्पत्तिलयाच्या गहन तत्वज्ञानाची चालू असलेली शृंखला, तिथल्या तिथच, मध्येंच तोडून, स्वतःलाच जणुं काय लागलेली त्यावेळची निर्विकल्प समाधि एकदम भंग पावल्यासारखे ते खडबडून जागे होत. आणि आपल्याबरोबरीच्या समोरील वृद्धाला सुस्कारा टाकून म्हणत — "हं ! हें कोडं असं एकदम सुटणारं थोडंच आहे, महाराज ?— आजपर्यंत किताकांनीं हात टेकले आहेत या वादापुढं !— सायुज्यता, मोक्ष, खायच्या गोष्टी नव्हत त्या...काय ? हं !— असो...चला–माझी झोपेची वेळ झाली आतां ..."

— ६ —

आणि मग मात्र अण्णा एक मिनिटभरहि तिथं थांबत नसत त्यापुढं...

पण दुसरा दिवस उजाडला, की, मग मात्र अफूच्या गोळीचा अंमल उतरल्यावर, दर्दी अफूबाज जसा पुन्हां आपल्या अफूच्या डबीकडे नव्यानें वळतो ना, तसेच) अण्णा वैद्यही आपल्या एकंदर दैनिक कार्यक्रमाकडे व एखाद्या नव्या चर्चेकडे (आदल्या दिवसाइतकेच) उत्साहानें वळत !—

अण्णांप्रमाणेंच जगाचा नि जगाप्रमाणेंच अण्णांचा आपल्या ठरल्या मुक्कामाकडे असा अव्याहत स्थितप्रज्ञ प्रवास अखंडपणें चालू होता !...

# परमेश्वरी प्रकाश ✶ ५

प्रॉमिसरी नोटा नि चलनी नोटा यांची आधीं ओळख होणं नि मग स्नेह वाढणं, हें कधीं शक्य आहे का? तरी पण खंडाळेकरांचा नि माझा परिचय मात्र अगदीं अघटितपणें वाढत गेला होता, एवढं खरं!

नोकरी नसल्यामुळें व्यापारी बनल्याचा माझ्या आयुष्यांतला नबळा कालखंड होता तो! ऑफिस मध्यावर थाटून, ('हेडा क्यूरा' 'डेन्टा बामा' 'व्हिटमाईन' 'एल किलर' अशा) गोडगोड नांवांच्या मोहक रंगीबेरंगी पाट्या, चित्रविचित्र आकाराच्या बाटल्या, नि त्याहून रंगेल, नव्या धर्तीचीं लेबलं, एवढ्या मालमसाल्यावर व (चुलत चुलत बहिणीला अवदसा आठवल्यामुळेंच केवळ, एकरकमी मिळालेल्या) पांचशें रुपयांच्या भांडवलावर, (अफाट उड्या मारण्याचा प्रयत्न करून) औषधी वस्तूंचा नवा व्यापार नुकताच मांडला होता मी! चित्रकार–ब्लॉकमेकर–छपाई मिळून सुमारें शंभर रुपये; 'कच्चीं' औषधें सुमारें पंचवीस रुपये; जाहिरात, पावत्या, स्टेशनरी वगैरे सुमारें शंभर रुपये; मित्रमंडळींचा चहाचिवडा सुमारें चाळीस रुपये, डिपाझिट–जागा–भाडें व 'भय्याभाडें' मिळून सुमारें पासष्ट रुपये, असा त्या रकमेपैकी जवळजवळ ३३० रुपयांचा खर्च करून बसलों होतों, पहिल्याच महिनाअखेर!

—पण पैशासह कोणी अनोळखी माणूस कांहीं केल्या माझ्या ऑफिसांत शिरेना!

— २ —

त्या दिवशीं सकाळीं, मोठ्या खिन्न मनानें, जमाखर्चाच्या तोंपर्यंतच्या वह्यांना चाळण लावून, खालीं शिल्लक पडते का हें पहात होतों, तोंच घंटा वाजली;– प्रथम कपाळावर आंठ्या नि नंतर मनांत आशा डोकावली—दार उघडून पहातों, तों एक काळीकुट्ट सडपातळ अनोळखी व्यक्ती हंसतमुखानें समोर उभी!—"हेल्थ एजन्सी ना ही?– मी खंडाळेकर! बिझिनेस टर्म्स विचारायला..."

"वा:...या, याऽना...आंत..." नवीनच पाटी लावलेला वकील किंवा डॉक्टर



एकदम माझ्या अगांत संचारला. एकाएकीं समोर पडणाऱ्या रबरी चेंडूवर मांजरीचं पिल्लूं जितक्या उत्साहानें उडी मारेल, तितक्या जोरानें, माझ्या त्या पहिल्याच नवख्या शिकारीवर मी झडप घातली.

पुढं ओढलेली खुर्ची, हंसरी दंतपंक्ती, चहा–सुपारी–सिगारेटचा आमिषी आमद, असला सर्व सुरुंग भरून, मी स्फोटाची अपेक्षा करूं लागलों!–तरीपण [illegible]पेक्षां–उजव्या बाजूच्या उघड्या शेल्फवरील—छोट्या सँपल बाटल्यांचाच व्यवहार बहुतेक करावा लागणार, असं माझं मन आंतल्या आंत पुकारत होतं...

तेवढ्यांत, धंदेवाईक खंडाळेकरांना वाचा फुटली; त्यांची सुधामधुर देववाणी एकदम बोलली–"तुमच्या मालाची आठवडाभर बरीच चौकशी झाली माझ्याकडे! तेव्हां आतां...'व्हिट्माइन' दोन डझन, 'एल् किलर' चार डझन, 'डेण्टाबामा' सहा डझन, 'हेडाक्युरा' आठ डझन सांगा गड्याला!–"

— ३ —

थोड्या अविश्वासानेंच, मी पटकन् जागेवरून उठलों; गडी बाहेर गेल्याची सबब हळूच पुटपुटलों; त्या नव्या नाटकांतली ऑफिसबॉयची भूमिका लगबगीनें वजावली; आणि उठून उभ्या राहिलेल्या खंडाळेकरांच्या हातांत मी बिलहि दिलं.

दाराकडे वळतां वळतां, बिल आपल्या खिशांत कोंबून, ते दहा रुपयांची नोट बाहेर काढीत मला म्हणाले, "हा घ्या ॲडव्हान्स!–बाकीचे उद्यां सकाळीं, याच वेळीं, नव्या ऑर्डरीबरोबर!– छे छे पावती कशाला?"

माझ्या व्यापाराची ती पहिली 'भवानी' हातांत घट्ट धरतांना मनाला वाटत होतं, "चला ललाटावर प्रकाश पडायला आज सुरवात तर झाली!–"

आणि खरंच होतं तें!–दुसऱ्या दिवशीं ठरल्यावेळीं, खंडाळेकरांनीं राहिलेले १० रु. दिले! आणखी ४० रु. मालाचा कॅशमेमोहि फाडायला त्यांनीं मला सांगितलं. पहिलंच गिऱ्हाईक इतकं प्रामाणिक, अगदीं शद्बाला जागणारं!– माझ्या आनंदाला तर पारावर नव्हता; खंडाळेरावांकडे तें मी बोललोंहि...

त्यावर ते आस्थेवाईकपणें म्हणाले, "अहोऽ आम्हीही धंदेवाईकच माणसं ना!... नाहीं नाहीं तरी मी दहा बारा धंदे हाताळले आहेत आतांपर्यंत... नवीन धंद्याच्या काय खस्ता असतात, त्या आम्हांला कळत कां नाहींत? आतां

कधीं अलिकडे पलिकडे होतं. पण धंद्यांत तें चालायचंच् ! काळजी नको !--तुमचा सगळा माल हां हां म्हणतां उठवतों, पहा !—”

इतक्या प्रामाणिकपणें, स्पष्टपणें, आपलं मनोगत व्यक्त करणाऱ्या खंडाळेकरांना, त्याक्षणीं, मला मिठीच मारावीशी वाटली !—

— ४ —

त्यानंतर संबंध, जाणं-येणं, देवाण-घेवाण वाढत गेली. एके दिवशीं तर खंडाळेकर आले व ४०० रु. चा माल संध्याकाळीं बांधून ठेवायला सांगून गेले. गृहस्थाकडे झटपट धंदा करण्याचं कौशल्य खूप होतं !...

रात्रीं आठाला खंडाळेकर आले ! खोके हमालाच्या डोक्यावर चढविले. उ. हिंदुस्थानांत लांबपर्यंत कॅन्व्हासिंगला निघायचं होतं त्यांना, त्याच रात्रीं. खिशांतील पाकीट बाहेर काढून, दारांत क्षणभर थबकून, ते मला जरा संकोचानें म्हणाले “ आठ दिवसांनी दिल्लीहून बिल चुकवितों ! कसं ? प्रवासांत चार पैसे जवळ असलेले बरे ! !... चालेल ना ?”

तो प्रश्नच तसा सयुक्तिक; “ हो हो, राहूंद्या कीं !” मी झटकन् म्हणालो; त्यांचं पाकिट पुन्हां खिशांत गेलं. पत्त्याचं कार्ड माझ्या हातीं पडलं; आणि नंतर ते, हमाल नि त्यांच्याबरोबरच माझं औषधाचं मोठं खोकंहि दिसेनासं झालं...

वर्ष होऊन गेलं त्या प्रसंगाला ! दरम्यान, मूर्ख लोकांच्या जगांत, माझ्या धंद्याचा जम कल्पनेबाहेर बसत गेला. पण धंद्याचा भवानी करणारे आमचे खंडाळेकर अगर त्यांचं ( दिल्ली किंवा कुठच्याही उत्तर हिंदुस्थानांतील ठिकाणचं ) पत्र अगर मनीऑर्डर, माझ्या ऑफिसपर्यंत येऊन पोंचली नव्हती...

सुरवातीस त्यांच्या मौनाचं मी वकिली समर्थन केलं; पण दीडदोन महिन्यांनीं रुखरुख आणि तीन चार महिन्यांनीं नवा संशयहि बळावला !

एके दिवशीं संध्याकाळीं, बाहेरगांवच्या ऑर्डरप्रमाणें गडी पॅकींग करीत होता. मी देखरेख करीत होतों. तोंच घंटा वाजली.

स्वतः खंडाळेकरांचीच काळी कभिन्न मूर्ती अकल्पित समोर उभी !

— ५ —

प्रथम क्षणभर त्यांचा राग आला; पण पुढील त्यांच्या अस्खलित बोलण्यांत तो विरूनहि गेला. उलट त्यांच्या नवीन धंद्याची माहितीच ‘ आ ’ करून उत्सुकतेनें मी ऐकूं लागलों होतों.



तोंच,... खंडाळेकरांनीं खिशांतून एक जाहिरात काढली. मोठी आकर्षक दोनरंगी जाहिरात होती ती! – “ ‘ललाट-प्रकाशन- कार्यालय’ म्हणजे ?”–

“ हाच माझा नवा धंदा ! एक मोठं गुपित आहे तें ”...

“ पण मग, त्याच्याशीं माझा काय संबंध ? ”

अंगावर बाकी राहिली होती;—पण घरच्या अडचणीमुळें ! आतां या नवीन धंद्यांत कमाई होतांच मला ती मिळणार होती ! आज इतक्या दिवसांनीं ते येण्याचं मुख्य कारण—त्या नवीन धंद्यासाठीं व आलेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं माझी त्यांना थोडीशी मदत पाहिजे होती ! म्हणजे रोख पैसे नव्हेत. फक्त नक्त तीन साडेतीनशें रुपये किंमतीचा नवा माल दिला,...कीं बस्स् ! दोन्ही रकमा मिळून ६०० रुपयांची एकोत्रा व्याजाची प्रामिसरी नोटही घरींच लिहून खिशांतून आणली होती त्यांनीं ! खंडाळेकरांनीं असं तें कोडं सोडवलं.

तें ऐकून प्रथम मी गोंधळलों; मग खूप रागावलोंहि ! कठोर मनानें त्यांच्या दीन चेहऱ्याकडे रोखून पाहिलं, व शेवटीं—

पण तोंपर्यंत,...त्यांच्या तर डोळ्यांतून घळघळां पाणी वाहूं लागलं होतं. अगदीं गहिंवरून मला ते अडखळतच म्हणाले, “ विश्वास ! आतांपर्यंत ठेवलाच आहे...कळ सोसून आणखी थोडा ठेवा !– प्रॉमिसरी नोट देतच आहे; तेव्हां... अहो, शीर सलामत तर पगडी पचास ! पैशापेक्षां माणसाला किंमत जास्त...”

त्या कातर शब्दांनीं माझं हृदय कळवळलं ! ती प्रामिसरी नोट निमूटपणें हातांत घेतली; यादी गड्याकडे देऊन खोकीं बांधायला सांगितलीं व बिल-पावती करून त्यांच्या हातांत दिली.

फाटक्या, मचकट धोतराच्या सोग्यानें डोळे-कपाळ पुसत, खंडाळेकर म्हणाले–“ भालेराव, केव्हढा विश्वास हा !–माझ्या पोराबाळांवरचे हे उपकार कधीं कधीं विसरणार नाहीं, मी !– मरेपर्यंत पुरी परतफेड करीन म्हटलं तरीं होणार नाहीं !”

— ६ —

त्यांच्या त्या शब्दांप्रमाणेंच सारं घडायचं होतं....कारण त्यानंतर पुन्हा दीडवर्षपर्यंत खंडाळेकरांची भेट नव्हती. गडी पुन्हां पुन्हां सांगे, ते घरींच सांप-

डत नाहींत. एके दिवशीं मनाचा संताप होऊन, नकाशावरून ताडदेवाच्या पुलाखालीं त्यांचं घर धुंडाळूं लागलों. "कर्जतकरांच्या वाड्यांत दाराशींच 'ललाट-प्रकाश-कार्यालय' ची पाटी सांपडेल," असं त्यांनीं सांगितलं होतं; पण 'भेसच्या चोखखस दूध अंदर मिलेल,' 'कोळसाची घणी मोटा वकार' असल्या अनेक वाचल्या, तरी खंडाळेकरांचा 'प्रकाश-किरण' सांपडेना.

शेवटीं, पोस्टमन मदतीला धांवून आला. त्यानें त्यांचा बदललेला पत्ता सांगितला. ग्रँटरोडच्या पुलखालीं, 'नवी रताळ्याची चाळ' नांवाच्या एका मालगाडीसारख्या लंब्या चाळींत त्यांचं 'ललाट' आत गेलं होतं!—

नवा पत्ता पोष्टमनचाच होता; तेव्हां पांच मजले चढल्यावर, मी तत्काळ खंडाळेकरांच्या दारांत उभा राहूं शकलों. दारांतल्या पाटीनें खात्री पटवली.

शक्य तितका रागाचा पारा चढवून, तयार होऊन, मीं दरवाजा ठोठावला; दार उघडलं जाईपर्यंत, खंडाळेकर समोर दिसतांच,...कोणत्या थाटांत व सुरांत चिडायचं, व कसे पैसे मागायचे याबद्दलचं शेखमहंमदी मनोराज्य चालवलं.

— ७ —

शेवटीं, दरवाजा उघडला गेला!—पण...पण...विशेषाचा धुरकट भपकारा, दार उघडणारा लहानसा शेंबडा मुलगा, त्या दिडखणी गाळ्याच्या मधल्या दरवाजांतून आंतल्या बाजूला टाकलेल्या खाटेचा दिसणारा अर्धभाग...

त्यांच्याऐवजीं उलट, तें सारं दृश्य पाहून, माझा राग कुठल्या कुठं पळून गेला; तोंडाला खीळच बसली एकदम—

तेवढ्यांतच, खाटेच्या काथ्याचा आवाज, दारांतून हळूच बाहेर डोकावलेली एक तरुणशी बाई, तिचा फिकट चेहरा, डोळ्यांतलं खूपसं काजळ, हातांतलं लाल लाल हातापायाचं चिरगुटांत गुंडाळलेलं दीड दोन महिन्याचं मूल...

मी अधिकच भांबावलों; तेवढ्यांत, हातांतील मुलाला सावरीत ती पुढें येऊन म्हणाली—"नाहींत घरांत! कां?...पैशांसाठीं आलां होतां? अशी ही परिस्थिती आमची! हल्लीं नवीन धंदा काढलाय् ना 'ललाट प्रकाशाचा' यांनीं! खटपट खूप करतात; पण यशच नाहीं हाताला! तरीपण सवड झाली कीं...हें पहा—जरा वागवून घ्या हं आम्हांला!...उपकार होतील—"



तें दृश्य नि तिचे ते उद्गार! मी तर गलितगात्रच झालों!—प्रॉमिसरी नोट देतांना, त्यादिवशीं अश्रु ढाळतां ढाळतां, खंडाळेकरांनीं आपल्या तिसरेपणच्या संसारदक्ष बायकोचा उल्लेख केला होता! माझी आतां खात्री झाली. दारांत येणारा माणूस पैशासाठींच येतो, याची तिलाहि खात्रीच दिसली!—

विरघळल्या अंतःकरणानें मी निमूटपणें तोंड फिरविलं, आणि हताश मनानें जिनाहि उतरलों!

पण रस्त्यानें चालतां चालतां मात्र, मला माझाच खूप राग आला! 'पुन्हां वाट पाहून, पुन्हां पत्ता हुडकून जावं लागलं त्यांच्या घरीं नि पुन्हां त्यांची ती संसारदक्ष साध्वी तशीच पुढं आली, तर हें किती दिवस चालणार?—'

त्यानंतर वर्ष गेलं होतं!—अनेकदां गडी रिकाम्या हातानें परतला होता; खंडाळेकरांची भेट नव्हती. त्यांच्या संसारदक्ष बायकोला आठवण झाली नव्हती. ती जागाही ते सोडून दुसरीकडे गेले होते.

— ८ —

वाटेल त्यावेळीं वाटेल त्याच्याकडून एकच किंमत देणारे रोकड पैसे, चलनी नोटा—आणि एकदां बाहेर पळालेले पैसे (ठराविक मुदतीपर्यंत ठराविक व्यक्तींकडूनच) कदाचित् परत खेंचण्याची आशा दाखविणाऱ्या (जणुं परमेश्वरी इच्छेवरच अवलंबून असणाऱ्या) प्रॉमिसरी नोटा!—दोन्ही प्रकार आपल्या पाकिटांत आपण कोंबतों. या दुसऱ्या महत्वाच्या वस्तूंचं महत्व (नि त्याबरोबर पहिल्या महत्वाच्या वस्तूच) कमी होऊन, अखेर आपलं पाकीट तेवढं फुगीर दिसूं लागतं! प्रत्येकाला अनुभव असतोच म्हणा त्याचा!

त्या दिवशीं, मलाहि माझ्या पाकिटांत अशीच एक (दहा ठिकाणीं फाटलेली)—'हस्तलिखित नोट' सांपडली. तिच्या अवताराला आतां चार वर्षं होत आलीं होतीं. तिच्यावर आंकडा मोठा होता. पण तीं शून्याचीं मोठीं दोन वर्तुळंच समोरचं सारं जग व्यापत होतीं! मला क्षणभर जगच त्यांच्यासारखं वाटत होतं!

मारवाड्यांच्या दप्तरांतील प्रॉमिसरी नोटा निराळ्या नि आम्हां मध्यम वर्गांतील सभ्य गृहस्थांच्या पाकिटांतील अशा नोटा निराळ्या! जमीन-अस्मानच!

तिच्याकडे पाहतां पाहतां, एकाद्या स्टेजसारखं, तिच्या मजकुरावर हे असले तीन चार प्रसंगच उभारले जात होते !—

कोरीव सहीमागील खंडाळेकर बादशहासाहेबांना साक्षी ठेऊन, माझ्याबरोबर शेवटचं सुखदुःखाचं हितगुज करूं लागले होते.

शेवटीं मी रागारागानें त्या मुदतीबाहेरच्या प्रॉमिसरी नोटीच्या चिंधड्या खंडाळेकरांचं नांव घेत हवेवर उधळल्या ! नि कोट टोपी घालून बाहेर पडलों.

—९—

आश्चर्य असं कीं, त्या खिन्न विचारांच्या तंद्रीतच, गर्दीतून वाट काढीत, मी रस्त्याच्या नाक्याजवळ येतों, तों खंडाळेकरच स्वतः समोरच्या हॉटेलांत शिरण्याच्या इरादानें पायऱ्यांवर उभे !—

त्यांची चपापलेली दृष्टी माझ्याकडे वळली खरी; पण पाहिलं न पाहिलंसं करून, ते लगबगीनें आंत शिरले. मी रागावलों होतों, तरी सोक्षमोक्ष लावण्याच्या हेतूनें मीहि त्यांच्यामागून आंत शिरलों; नि त्यांच्याच टेबलाशीं जाऊन बसलों.

अगदीं त्यांच्या शेजारच्याच खुर्चीवर बसल्यानंतर त्यांचा नाईलाजच झाला.

तेव्हां मात्र " वा: ! फार दिवसांनीं भेटलांत.........." या वाक्यानें सुरवात करून, " परिस्थिति फार वाईट आहे...... " या वाक्यानें त्यांच्या चर्पटपंजरीचा शेवट झाला; त्या दरम्यान, त्यांच्या तिसरेपणच्या संसारदक्ष बायकोचा अशक्तपणा, कच्च्याबच्च्यांचा आजार वगैरेहि अनेक गोष्टी येऊन गेल्या; नि अखेर ते म्हणाले—" सगळ्याच धंद्यांची मंदाई ! पण हल्लींचा माझा धंदा मात्र कदाचित् जम धरेल. तुम्हांला ठाऊकच आहे म्हणा... ललाट–प्रकाश–यंत्र काढलं आहे मी ! जरा गुपीत सांगतों तुम्हांला !– तुम्हीं त्या धंद्यांत पडणार नाहींत ही खात्री आहे, म्हणूनच सांगतों, बरं का ऽ !"

मी धडधडत्या छातीनें, नवीन कोणत्या भानगडींत तर पडणार नाहीं ना, ही भीति दडपून त्यांचं सारं ऐकूं लागलों...

" ग्रँटरोडच्या पुलाखालीं मिळतात ना त्या...चपट्या डब्या ? त्या दोन तीन डझन एकदम घेतों; घरीं आल्यावर आंतली पावडर काढून आरशाच्या बाजूनें मध्यभागीं पाऱ्याला वर्तुळ करतों; तिथं काजळ फांसून तो पुनः अलगद बसवितों;" कीं, झालं यंत्र तयार ! मग झांकणाला ' ललाट–प्रकाश–कार्यालयाचीं ' लेबलं चिकटविलीं, नाक्यानाक्यावर हिरवे निळे खोब्या रेशमाचे तुकडे मिळ-



तात ना स्वस्त भावानें, त्यांच्या, आमच्या हिनें केलेल्या छोट्या छोट्या वाटोळ्या पिशव्या घातल्या,... कीं पॅकिंग तयार ! कांदेवाडींतल्या एका छापखान्यांत मिळणाऱ्या सर्व देवांचे व ग्रहांचे ठसे उठविलेलं नियमांचं एक पत्रक छापून घेतलं आहे; नियम आहेत पुष्कळ; पण त्यांतील एका माणसाला एकाहून अधिक पाळतां येणार नाहींत, अशीच खात्रीपूर्वक योजना आहे सारी ! एकदां हा माल तयार झाला, कीं जाहिरात कुठें रोखीनें, कुठें उधारीनें ! जाहिरातींत नियमाप्रमाणें वागून फायदा न झाल्यास पैसे परत करण्याची हमी असते. दिवसा दोन दिवसांनीं एखाददुसरा प्राणी लागतोच गळाला ! घरांत साडेचार पांच आण्याला पडलेला माल पांच रुपयांच्या भावानें जातो बाहेर !– चाललंय... ईश्वराची मर्जी ! नाहीं, मला सांगा नाहीं तर मुंबईत पोराबाळांचं चालवणार कसं हो ?— जगांत मूर्ख लोक आहेत ही तरी परमेश्वरी कृपाच !"

१०

भांबावल्यामुळें माझ्या तोंडून शद्ब आले—"कमाल तुमच्या परमेश्वरी —ललाट—प्रकाशाची ! आतां तुमच्या प्रॅमिसरी नोटीविषयीं बोलायलाच नको ! माझ्यापुढें नुसता काळोखच..."

"छे, छे ! विश्वास ठेवा ना माझ्यावर ! केव्हांतरी हा खंडाळेकर आपण होऊन येऊन, तुमचे पैसे तुम्हाला परत देतो कीं नाहीं,... पहा ! परमेश्वराची इच्छा असेल त्याप्रमाणें होईल सारं ! मी तुम्हाला विसरणार नाहीं कधीं, भोलेराव—"

माझी मलाच लाज वाटली,...त्यावेळीं !–"हल्लीं रहातां कुठं ?" हें विचारण्यातही आतां 'अर्थ' नव्हता. कारण त्यांच्या घरीं जाऊन, विशेषाच्या भपकाऱ्यानें माझा जीव कासावीस करून घेण्याची किंवा त्यांच्या त्या संसारदक्ष तिसेरपणच्या बायकोची नुसती मुलाखत घेण्याची...छे...कल्पनाहि सहन होत नव्हती मला ती !

ते त्यापुढेंही कांहीं बोलत होते; पण तिकडे कानाडोळा करत, मी काउंटरजवळ आलों; त्यांची वाट न पहातांच, कांचेच्या तबकडीवर रुपया टाकला; नि गपचूप पायऱ्या उतरलों..

घरीं गेल्यावर, त्या दिवशीं हिशेब लिहितांना, हॉटेलांत झालेला तो खर्च खोडून त्यापुढें लिहिलं:— " **परमेश्वरी – ललाट – प्रकाश ! ! !–** "

———

# बाबूजी ★ ६

ना घरदार; ना मूलबाळ; ना नात्यागोत्याचीं कोणीं माणसं. बाबूजी म्हणजे एक अगदीं सडेफटिंग माणूस. त्यांना आगापीछा कांहींएक नव्हता. ते बंगालांतून महाराष्ट्रांत केव्हां आले, त्यांचं शिक्षण कुठपर्यंत, कुठं, कधीं झालं, हें त्यांच्या माहितींतल्या कोणालाच ठाऊक नव्हतं.

खरं म्हणजे ते बंगाली आहेत, हें देखील त्यांच्या पोषाखावरून कोणी कबूल केलं नसतं. मराठी भाषा तर ते इतकी अस्खलित नि फर्डी बोलत, कीं, कोणाही नवीन परिचय होणाऱ्या माणसाला ते अगदीं महाराष्ट्रीयच वाटावेत व त्यानें आश्चर्यानें इतरांना विचारावं—"यांचं एखाद्या बंगाली माणसासारखं बाबूजी हें नांव हो कसं पडलं?—"

आणि त्याला मग कोणी सांगितलं, कीं, "अहो, ते बंगालीच आहेत; पंचवीस वर्षांपूर्वी ते इकडे एकटेच आले; आणि अजूनही ते एकटेच मुगभाटांतल्या प्रसिद्ध 'चिवडा चाळी' तल्या दोनखणीं खोलींत रहातात", तर त्याला पुन्हां आणखी एक आश्चर्याचा धक्का बसावा.

हो, बाबूजी महाराष्ट्रांत, कां कोणास ठाऊक, पळून आले होते. आले त्यावेळीं ते वीसबावीस वर्षांचे असतील, एवढंच.

इंग्रजी फर्डं बोलणं, अक्षर सुंदर, हिशेबाच्या कामांत हुशार, टायपिंग शॉर्टहँडची उत्तम माहिती. आणि पुन्हां दिसायला देखणा रुबाबदार!— कोणावरही त्यांची छाप पडावी!—असे होते बाबूजी त्यावेळीं.

तेव्हां,...आल्यानंतर रंगाच्या एका जर्मन कंपनींत ते जे क्लार्क म्हणून राहिले, ते तिथंच कायम झाले. पहिल्या लढाईनंतर, त्या जर्मन कंपनींत शिरलेला हा मनुष्य, आपल्या अंगच्या गुणानें, ही दुसरी लढाई सुरू होण्याच्या सुरवातीस, आतां तिथलं एक बडं प्रस्थच झाला होता. बाबूजींना चारशें रुपयांहून अधिक पगार मिळत होता. हाताखालीं शंभर शंभर रुपये मिळवणारे जवळ जवळ चाळीस कारकून होते.



पण चाळीस रुपयांचे चारशें रुपये झाले, तरी बाबूजींनीं चौदा रुपयांची मुगभाटांतल्या 'चिवडा चाळी' तली आपली खोली कांहीं बदलली नव्हती. त्यावेळीं महाराष्ट्रांत आलेला हा वीसबावीस वर्षांचा तरुण,... आतां चांगला पंचेचाळीशी ओलांडून गेला होता; तरी तसाच अविवाहित नि अगदीं एकटाच रहात होता.

कां बरं असं?—सर्वांनाच मोठं कोडं पडे!!

— २ —

डोळ्याला सोन्याच्या फ्रेमचा चष्मा, केस खूप वाढलेले ... पण सैरावैराच वाऱ्यावर उडणारे, ओंठावर कल्लेदार मोठ्या मिशा, तोंडावर मिस्कील हास्य!...अंगांत कधीं एकदम सूटबूट-नेकटाय्-कॉलर, तर कधीं जुन्या पिढींतल्या महाराष्ट्रीयासारखा बंद कॉलरचा मद्रास टस्सरचा लांब कोट, तलम फिनले धोतराचा ब्राह्मणी सोगा, डोक्यावर बनातीची उंच दिवाळाची काळी टोपी; मधूनच क्वचित्, त्यांना आपण बंगाली असल्याचीही आठवण होई,... कीं काय, कोण जाणें—त्यावेळीं, ते रेशमी पिवळसर लांब झगा अंगावर चढवीत नि जरा तोकड्या आठवारी धोतराचा अस्ताव्यस्त सोगा जमिनीवर लोळत टाकून रस्त्यानें उघडे बोडके फिरूं लागत.

मोठी विचित्रच व्यक्ती होती, बाबूजी म्हणजे!...

हाताखालचीं कारकून मंडळी, ऑफिसांतील शिपाई नि डोक्यावरचे जर्मन अधिकारी, सारेच त्यांचे दोस्त; सर्वच त्यांचीं घरचीं मंडळी!...

त्यांना मानापमानाचीहि कसली खोटी कल्पना नव्हती. 'प्रत्येकानें आपलं काम योग्यप्रकारें बजावलं, कीं, प्रत्येक जण सारख्या किंमतीचा' असंच त्यांचं मत होतं. आणि त्याप्रमाणेंच ते स्वतःहि नेहमीं वागत.

कोणी त्यांना म्हटलं, कीं, "बाबूजी, तुम्ही कधीं आपल्या मुलखांत जात नाहीं;... तुमच्या घरीं कोणी तुमच्या मुलखांतला येत नाहीं;... आणि आम्हां महाराष्ट्रीयांत तर तुम्ही अगदीं साफ मिळूनच गेल्यासारखं वागतां —हें कसं बुवा?"

तर त्यावर ते म्हणत—"अरे, कोण कोणाचा आहे या जगांत? कसला मुलख नि कसला देश घेऊन बसलास? मी बंगालांत जन्मलों म्हणून बंगाली! ...तुम्ही महाराष्ट्रांत जन्मलांत म्हणून महाराष्ट्रीय!... आपण सारेच या जगांत चार दिवसांचे प्रवासी पाहुणे! हवा कशाला खोटा हेवादावा नि प्रांतीय प्रेम?

जिवंत असेतोंपर्यंत प्रत्येकानें आनंदांत असावं !—नि दुसऱ्यालाहि आनंद द्यावा ! बस्स !–महाराष्ट्रांत आलों...महाराष्ट्रीयांत मिळून-मिसळून गेलों मी !–मद्रासांत गेलों असतों... तर मद्रासी झालों असतों!...नि आफ्रिकेंत गेलों असतों... तर निग्रो सुद्धां झालों असतों एकदम ! !”...

— ३ —

पण–‘ आपण महाराष्ट्रांत कां आलों ? ’ त्याचा मात्र बाबूजी कधीं थांगपत्ताही लागूं देत नसत.

त्यांच्या सर्व खानदानी वागणुकीवरून, त्यांच्या बहुतेक मित्रांचा मात्र कयास होता, कीं, ह्या हुशार मनुष्यानें कॉलेज शिक्षण अर्धवट टाकलं असावं; आपल्या श्रीमंत आईबापांशीं किंवा नातलगांशीं कसल्यातरी कारणांवरून भांडूनच तो घराबाहेर पडला असावा; नि त्याच वेळीं त्यानें ठरवलं असावं, कीं, ‘ आपण जाऊं तिथंच आपलं घर करूं ! ’

वास्तविक, बाबूजींचं म्हातारपणहि आतां डोकावूं लागलं होतं; तरी पण ते एकटेच ! हें पाहून कोणी त्यांना विचारावं, कीं, “बाबूजी, तुम्हाला आपलं घर, आपला संसार, आपलीं मुलबाळं, असावींत... असं कधींच कसंऽहो वाटलं नाहीं ?”

त्यावर बाबूजी आपल्या तुरळक रुपेरी होत असलेल्या केसांवरून हात फिरवति, हंसत हंसत म्हणत–“अरे, मला म्हाताऱ्याला आतां मुलगी रे देतोऽकोण ? पुन्हां बंगाली लोकांकडे मी गेलों...तर मला ते महाराष्ट्रीय म्हणतील !—नि तुम्ही महाराष्ट्रीय लोक मला बंगाली म्हणाल !—असलं हें लग्नाचं गौडबंगाल आपल्याला पाहिजेच आहे कशाला मुळीं ? ”

कोणी त्यावर मोठ्यानें हसूं लागला, तर बाबूजी लागलीच थोडे गंभीर होत; नि त्याला म्हणत...“ नाहीं तरी हवा आहे कशाला मला संसार ?–कारण, जगांतलीं सगळींच माणसं, आपलीं माणसं !–अरेऽदुनिया हेंच आपलं घर !–एवढीं फुलं दिसतात भोंवतीं फुलतांना–एवढीं लोकांचीं गोड गोड मुलं दिसतात आपल्याला हसतां–खिदळतांना...वाढतांना !–मग, तीं काय आपलींच नव्हत कां?...त्यांच्या आनंदानेंच आपण आनंदी व्हावं !...त्यांना सुखवूनच आपण सुखी व्हावं !...तीं घरांतच आणलीं...तीं अगदीं आपल्या मालकीचींच असलीं, म्हणजेच काय आपल्याला अधिक सुख होणार आहे ?–तुम्ही सर्व माझींच आहां...तुमचीं



घरंदारं, तुमचीं मुलंबाळं तींच माझीं !...आणि माझं आहे तें सारं तुमचंच आहे!”

तेव्हां असे चमत्कारिकच होते आमचे बाबूजी !—

— ४ —

आणि खरंच होतं तें !–बाबूजींचं सर्व वैभव तें त्यांच्या भोंवतालच्या सर्वांचंच होतं.

म्हणूनच बाबूजी एकटे होते तरी त्यांना त्यांचा चारशें रुपये पगार पुरत नसे. कारण सर्वांच्या अडचणी या त्यांच्याच असत. हो, बाबूजी एकटे होते; पण रोज ते कसल्या तरी चिंतेंत असत. कारण,... सर्वांचीं दुःखं तीं बाबूजींचींच दुःखं ठरत असत !–

बाबूजी बहुतेक चार मंडळी जमवून, स्वतः आनंद करीत; त्या लोकांनाही आनंद देत. पण बाबूजी दुसऱ्यांच्या आजारांत, त्यांच्या दुःखांत सुद्धां,.. त्यांच्याशीं समरस होऊन,... त्यांना धीर देत; त्यांच्या दुःखी घरांत जातीनें हजर असत. आणि त्यांत लहान-मोठे श्रीमंत-गरीब हा त्यांच्याकडे फरक नसे.

एकदां त्यांच्या ऑफिसमधल्या शिपायाची बायको अत्यवस्थ होती. तिची सुश्रूषा करायला, बाबूजींनी चार दिवस त्याच्या सोनापुरांतल्या कोंदट खोलींत जागरण केलं; त्याला डॉक्टर, औषधपाण्याची मदत केली. बायको बरी झाल्यावर तो त्यांचे कृतज्ञतेनें पाय धरूं लागला. तेव्हां बाबूजी त्याला जरा रागानेंच म्हणाले—“शिरप्याऽ, गाढवा, लाज नाहींऽरे वाटत तुला माझे पाय धरायला ? तुझ्या दगडाच्या देवाचे पाय धर जा हवे तर !–मी आपला नुसता माणूस आहे एक ! माणसासारखं वागणं ही कांहीं मोठी पाय धरण्यासारखी बाब नव्हे !... आपल्याला पाय दिलेले असतात माणुसकीनें चालायलाच्... ”

‘दर महिन्यातल्या पगारांतून,...माझे पैसे तरी कापून घ्या !’म्हणून शिरप्यानें त्यांना पुन्हां विनवलं; तेव्हां मात्र, त्यांनीं गपचूप त्याच्या इच्छेनुसार त्याच्या पगाराची कपात करण्यास सुरवात केली.

दीड वर्षांनीं अगदीं दिवाळीच्या तोंडावर शिरप्याला बोलावून, त्याच्यापुढें दोनशें रुपयांच्या नोटा करीत, त्याला ते म्हणाले–“ शिरप्या, लेका, तुझ्या माणुसकीमुळेंच तूं एवढे पैसे शिलकेत टाकलेस !...नाहींतर सत्रा व्यसनं करूनच तूं ते

उधळले असतेस !—जा, आतां हे पैसे घेऊन तुझ्या बायकोकडे दे. ती तुझ्यापेक्षां अधिक शहाणी आहे. समजलास ? ”

त्यावेळीं, त्या नोटा मोठ्या नाइलाजानें हातीं घेतांना, शिपायाच्या डोळ्यांतून अक्षरशः घळघळां अश्रू ओसरत होते!—

पण, ही एकच नव्हे, आमच्या बाबूजींच्या असल्या आणखीही कित्येक गोष्टी तुम्हाला सांगतां येतील.

— ६ —

या लढाईच्या सुरवातीची गोष्ट !—चेंबरलन साहेबांनीं नाखुषीनें जर्मनी-बरोबर युद्ध पुकारल्याची बातमी बाबूजींनी रेडिओवर ऐकली. त्या बातमीनें ते फारच अस्वस्थ झाले. त्यांना वाईट वाटलं;...त्यांच्या पटकन् लक्षांत आलं... “आतां आपल्या कंपनीला टाळं लागणार; कित्येक गोरगरीब कामगार कांहीं दिवस तरी साफ बेकार होणार... ”

आणि त्याप्रमाणेंच, अगदीं आठपंधरा दिवसांत तशी सरकारी योजनाहि झाली. ब्रिटिश सरकारनें बाबूजींच्या ‘साहेबां’ना नि त्यांच्या कंपनीला ताब्यांत घेतलं. सर्व नोकरांना नोकरी सोडण्याबद्दल नोटीसा दिल्या. ती रंग कंपनी सरकार पुढें चालवणार होतेच; तेव्हां त्यांना बाबूजींसारखा हुशार मनुष्य हातांत पाहिजेच होता. तरी पण, बाबूजींनीं अपला फंड, बक्षिसी, काय मिळालं तेवढं घेऊन, नोकरी सोडायचं ठरवलं!—

सरकारनें त्याचं त्यांना कारण विचारल्यावर त्यांनीं सांगितलं.—“मला—अगदीं सच्याफटिंग माणसाला, आतां करायची आहे काय नोकरी?—झालं तेवढं पुरं झालं !—स्वदेशाची नोकरी करतां आली नाहीं,... म्हणूनच आम्ही परक्यांची केली. ज्यांची नोकरी केली ते जर्मन गोरे होते; पण ते आमच्याशीं कांहीं वाईट नव्हते. त्यांनीं आमचं थोडफार तरी चीज केलं ! जर्मनांचे आजचे नेते कांहीं वाईट करीत आहेत, हें खरंच!... पण ते काय, तुम्ही काय, दोघे आम्हाला सारखेच!...तुमचं—त्यांचं भांडण!—तें तुम्ही खुशाल लढा !... पण या भानगडींत, आम्ही काय म्हणून... कोणाला चांगले नि कोणाला वाईट ठरवायचं ? एकाची नोकरी इमानानें केली. आतां कोणाचीच नको नोकरी मला ! एवढ्यासाठींच सोडतोंय् मी नोकरी ! ”



असं म्हणून, बाबूजी आपल्या नेहमींच्या खुर्चीवर जाऊन बसले. त्यांना चांगले वीसबावीस हजार रुपये हातांत मिळाले !...पण, ऑफिसांतील लहान लहान लोकांच्या नोकऱ्या गेल्या होत्या; तेव्हां त्यांना बोलावून, बाबूजींनी ( आपली प्रेमाची भेट म्हणून ) आपल्या पैशांतल्या लहानमोठ्या रकमा त्यांना उचलून दिल्या; नि शेवटीं, सर्वांचा निरोप घेऊनच, ते त्या दिवशीं, ऑफिसांतून आपल्या मुगभाटांतील ‘ चिवडा चाळीं’त कायमचे परत आले.

— ६ —

तसेच दिवसांमागून दिवस गेले. त्यांच्या ऑफिसांतील बहुतेकांना पुन्हां निरनिराळ्या नोकऱ्या लागल्या होत्या;...पण बाबूजी आतां बैठेच;...तरी त्यांच्या घरीं पूर्वीसारख्याच बैठकी भरत;...तेही आनंदानें सर्वांशीं पूर्वीप्रमाणें वागत; गप्पा—विनोदांत वेळ निघून जाई. त्यामुळें, बाबूजींचा प्रत्यक्ष संबंध संपला, तरी पूर्वीप्रमाणेंच, बाबूजींचं ते रोज दर्शन घेत. त्यांच्या सहवासांत दररोज चार घटका आनंदांत घालविल्यावांचून रहात नसत.

आणि बाबूजीही ( आपल्या आतांच्या मर्यादित ऐपतीप्रमाणें ) पूर्वीसारखेच त्यांच्या सुखदुःखांत त्यांच्याशीं वांटेकरी होत.

पण गेले दोन चार महिने मात्र, बाबूजींना त्यांचा निरुद्योगी बैठा कार्यक्रम मानवत नव्हतासं दिसत होतं. त्यांची प्रकृति भराभर ढांसळत चालली होती.

मंडळी जमे;...बाबूजीही ( आपल्या परिचयाच्या जुन्या शिपायापासून बरोबरीच्या माणसापर्यंत ) सर्वांच्या घरीं जात. पण बाबूजी दिवसेंदिवस खंगत चालले होते. अलीकडे अलीकडे तर त्यांच्या छातींत मधून मधून खूप जोरानें कळहि येई; त्यावेळीं, ते अगदींच कासावीस होत.

मेल्या पंधरवड्यांत तर बाबूजी आपल्या घरांतून बाहेरसुद्धां पडले नव्हते. सर्व मंडळींच्या आग्रहानें, शेवटीं, बाबूजींनी मोठ्या नाखुषीनें, मोठ्या डॉक्टरां-कडून स्वतःला तपासून घेण्याची परवानगी दिली.

पण तरी त्यापूर्वीं ते म्हणालेच— “ अरे गाढवांऽनोंऽ! मला करायचे आहेत काय आतां डॉक्टऽर नि औषधं तुमचीं ?—या तुमच्या जगाच्या धर्मशाळेंत पथारी टाकली होती ! आतां माझा मुक्काम संपला. तुम्हाला सोडून गेलंच पाहिजे मला ! तुम्हाला लागलंय् वेड ! मी आपला बाडबिस्तारा बांधतों कसा ! ! ”

—७—

पण बाबूजी इतक्या प्रेमानें इतकीं वर्षं त्या सर्व मंडळींशीं वागत आले होते; त्यामुळें कोणी त्यांचं ऐकेचना;...प्रत्येकाला आपल्याच घरांतला कोणी कर्ता मनुष्य आजारी असल्यासारखी हुरहुर व चिंता वाटत होती, बाबूजींच्या प्रकृतीबद्दलची!...

शेवटीं, चार मोठ्या डॉक्टरांनीं बाबूजींना तपासलं व एकदोघांना बाजूला घेऊन सांगितलं– "शरिरांत रक्तांचा पुरवठा फारच कमी झाला आहे. नि त्याचा परिणाम हृदयावर झाला आहे. पूर्ण विश्रांती व शक्तिवर्धक जालिम इंजक्शनं,... यावरच आतां काय होईल तें पाहायचं !– पण ते पुन्हां खडखडित बरे होण्याची आतां यापुढं आशाच नको !"

डॉक्टर गेल्यानंतर बाबूजी मोठमोठ्यानें हंसत म्हणाले,–– "काय रे वेडा मोह तुमचा हा !...मला म्हाताऱ्याला जगवण्यांत फायदा काय आतां तुमचा ?– या डॉक्टरलोकांना पैसे देण्यापेक्षां, तुम्हीऽच चार दिवस आणखी मौज करा कीं माझ्या पैशावर !–आहे काय त्यांच्या हातांत ? एकेकाचं एकेक अवतारकार्य असतं ! माझं संपलं आतां ! आणि मी मेलों तर जग काय ओस पडणार आहे ? आजच्या लढाईत रोज लाखों माणसं मरताहेत !––यांतलाच मी एक !––"

" बाबूजी, कांहीं तरीच बोलूं नका. तुम्ही जगलंच पाहिजे ! " त्यांचे कांहीं मित्र डोळ्यांत आसवं आणून म्हणाले., " तुम्ही गेलांत तर आम्हाला फार दुःख होईल... रडूं कोसळेल !... "

" हं हं ! तें मात्र मी ऐकणार नाहीं !–" बाबूजी नेहमींच्या आनंदी बेद-रकार वृत्तीनें हंसत म्हणाले– " अरेऽ, मी मेल्यावर सुद्धां तुम्ही हसलंच पाहिजे !– हंसतऽच रहाल !...माझ्यासाठीं तुम्ही अगदीं रडणार नाहीं,... असं मी कांहीं तरी नक्कीच करीन जाण्यापूर्वीं !–"

" तेंऽकसं शक्य आहे, बाबुजी ? " त्यांचे मित्र खिन्नपणें हिरमुसलं हंसत म्हणाले–" तुम्ही म्हणालांऽत तरी शक्य नाहीं !...तुमच्या वियोगानें आम्हांला रडूंऽच येणार !–"

बाबूजी पुन्हां मोठ्यानें हसत म्हणाले,- " अस्संऽ ? बरं बरं ! पाहूंऽयाच तर ? घोडा–मैदान अगदींऽजवळ आहे !–मी काय आतां दोन चार दिवसांचाच सोबती !...पण मी पुन्हां सांगून ठेवतों, ऐका!... मी जिवंतपणींच नव्हे,– तर मेल्यावर सुद्धांऽतुम्हाला हसवीन !––ही पैऽज तुमची माझी ! आहेऽकबूल ?"



बाबूजी पैज जिंकते किंवा हरते; पण बाबूजी मेल्यावर तिचा निर्णय तरी कसा लागणार होता ?...

म्हणूनच, त्यांच्या त्या चुरशीच्या बोलण्यामुळें, सर्वजण त्या मनःस्थितीतही एकदां मोठमोठ्यानें हसले !... त्यांची पैज मात्र कोणींच घेतली नाहीं.

—८—

ठरल्याप्रमाणें, गेले पांचसहा दिवस, डॉक्टर सकाळ–दुपार–संध्याकाळ बाबूजींना इंजक्शनं देत होते; औषधं पाजत होते;... बाबूजीही अगदीं आज्ञा-धारकपणें बिछान्यावर पडून साफ विश्रांती घेत होते. त्यांच्याभोवतीं अहोरात्र मित्रमंडळींचा (खिन्न चेहऱ्यांचा) परिवार आळीपाळीनें बसलेला होता.

अशावेळीं, बाबूजी स्वतः अगदीं मोकळ्या मनानें गप्पा मारत असत; विनो-दानें सर्वांना आनंदीत करीत हसवीत. बाबुजी आपल्याला सोडून जाणार, या कल्प-नेनें दुःखी झालेल्या मित्रांचे चेहरे, बाबूजींच्या असल्या उद्योगांमुळेंच, ढगांतून आंत बाहेर पडणाऱ्या चंद्राप्रमाणेंच, मधून मधून सारखे हंसतमुख तजेलदार होत असत. बिछान्यावर खिळलेल्या बाबूजींची आस्थेनं करमणूक करायला आलेल्या त्यांचीच... बाबूजी उलट अजून करमणूक करीत असत.

त्या–बाबूजीमुळेंच, ती एखाद्या रोग्याची खोली वाटण्यापेक्षां, तें आनंदाचं साम्राज्यच भासत होतं,... साऱ्यांना !

आज सकाळपासून मात्र, बाबूजी छातीवर सारखा हात ठेऊन दुःख सहन करीत होते ; तरी पण, मोठ्या आनंदी मनानेंच मित्रांशीं बडबडतही होते.

अखेर ऑफिसांच्या वेळा झाल्या. गेले पांचसहा दिवस मंडळी बाबूजीं-जवळच सारखीं बसून राहिलीं होतीं. आजही ऑफिसला जायला कोणी उठत नाहीं असं पाहून, बाबूजी त्यांना हसून म्हणाले—" अरेऽ, असा माझ्याभोंवतीं सारखा कडक पहारा करून, मला घेऊन जाणाऱ्या मृत्यूला तुम्ही अडवूंऽकां शकणार आहांऽ? –माझं...जगणं–मरणं,... तुमच्याहातचं नाहीं ! मूर्ख आहांत बेटयांनों !- तुम्ही सारे उठा पाहूं आधीं ! चलाऽ!–आज साऱ्यांनींच ऑफिसला जायचं !–तुम्ही माझ्यासाठीं माझ्यासारखंच इथं निरुद्योगी बसून राहिलेलं मला खपणार नाहीं !– जाऽ...चलाऽ...आतां संध्याकाळीं या !–त्यावेळीं पुन्हां भेटूं आपण.... "

बाबूजींनीं तसा फारच आग्रह केला ; तव्हां शेवटीं अगदीं नाइलाजानें

' फार तर दुपारच्या सुटीपर्यंतचं तेव्हढं काम आटोपून परत येऊं ' अशा बोलींनें सगळे तेथून निघाले.

श्रीपती मात्र कांहीं केल्या जागचा हालला नाहीं !—

—९—

सारे गेल्यावर, बाबूजी आपल्या गादीवर तक्क्याला ओंडगून बसले. त्यांच्या मनांत,... त्यांच्या आयुष्यांत घडलेल्या साऱ्या गोष्टी येतजात होत्या.

' या परप्रांतांत घालवलेल्या आपल्या आयुष्यांत आपण एकटेच राहिलों ; तरी, शक्य तों,... साऱ्यांना आपले मानून, त्यांना सुखी करण्याचाच आपण प्रयत्न केला !' याबद्दल मनांत फार समाधानच वाटत होतं त्यांना !—' पण मग, आपल्या-वरही साऱ्यांचं कसं निर्मळ प्रेम होतं.... आहे ? '— याबद्दलही आनंद वाटत होता त्यांना !—

असा विचार करत असतांनाच, त्यांच्या छातींत पुन्हां एकदां जोराची कळ आली. ते थोडा वेळ अगदीं कासावीस झाले. ती असह्य होऊन, ते छाती धरूं लागतांच, श्रीपती घाबरा झाला;... धांवत धांवत त्यांच्या जवळ जाऊन, तो घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला —" बाबूजीऽ–बाबूजीऽ, काय झालं?... "

पण बाबूजी कांहीं बोलले नाहींत...त्यांचा चेहेरा पालटत पालटत पांढरा-फटक फिक्का झाला; तरी ते प्रयासानें कळ सोसीतच होते....

श्रीपतीला त्यावेळीं काय करावं...तेंच समजेना--बाबूजींना एक घोटभर पाणी पाजून तो उठला व लगबगीनें दाराकडे वळत म्हणाला..." त्या पलीकडच्या मोठ्या डॉक्टरांना असाच परतपावलीं घेऊन येतों..."

बाबूजी त्याच्याकडे प्रेमभरल्या डोळ्यानें पाहून ' नको ' अशी मान हालवत हंसून अस्पष्ट म्हणाले—" वेडाऽ! "

पण त्यापूर्वींच, श्रीपति दार ओढून लगबगीनें निघूनही गेला होता.

आपल्या नात्यागोत्याच्याही नसलेल्या त्या साऱ्यांच्या धडपडीवरून बाबूजींना एकदम आठवण झाली,..." आपण मेल्यावर हे सारेच रडतील ! हो, खरंच रडतील !—-पण मी तर म्हणालेंय्...' लेकोऽ, तुम्हाला मेल्यावर सुद्धांऽ हसवीन...रडूं म्हणूऽन देणार नाहीं !' "



तेवढ्यांतच, त्यांना पुन्हा एक जोराची कळ आली; त्यांना श्वास कोंडल्या-सारखं झालं. तरी मनांत कसलासा विचार येऊन, मोठ्या कष्टानें ते तक्क्याला कसंबसं ओडगून बसले ;—पण ते कष्टही त्यांना अखेर सहन झाले नाहींत !

" मेल्यानंतर सुद्धांऽहसवीन ! " हे आपलेच शब्द पुन्हां आठवून,... त्या स्थितींतही त्यांना हसूं आलं;...नि तो विचार मनांत असतांनाच, तक्क्याजवळ बसल्या बसल्या,... त्यांनीं मागं मान टाकली;–टाकली ती कायमचीच !—

— १० —

क्षणभरानें, डॉक्टरांना घेऊन शिरप्या आला. पण त्यावेळीं बाबूजी जिवंत नव्हते. त्याबद्दल खात्री करूनच डॉक्टर बाहेर पडले. नि दुःखानें एकदां बाबू-जींच्या निश्चल, हंसतमुख चेहऱ्याकडे पाहून... ओक्साबोक्सी रडत दार लावून, शिरप्या साऱ्यांना बोलावण्यासाठीं बाहेर पडला.

सारी मंडळी जमेपर्यंत दोन तीन तास गेले.

सर्वांना-आपण नसतांना बाबूजी गेल्याचं-दुःख असह्य झालं होतं. बाबूजींच्या निश्चल देहाकडे पहात, सारे थोडावेळ मुकाट्यानें अश्रू ढाळीत होते. त्यांना गेल्या वीस वर्षांतील चालते–बोलते–हसते बाबूजी समोर दिसत होते. बिछान्यावरील बाबूजींच्या प्रत्यक्ष कलेवराला ते क्षणकाळ साफ विसरले होते.

शेवटीं, शेवटची व्यवस्था करणं भाग आहे, हा विचार करून, दोघां-तिघांनीं दुःख आवरलं व सारं सामान आणून बाबूजींची ताटी तयार केली.

बाबूजी तक्क्याजवळ नुकतेच झोंपल्यासारखे पडले होते. त्यांच्या चेहऱ्यावरही नेहमींचं सूक्ष्म हास्य होतं. त्यामुळें अधिकच दुःख वाटून, शेवटीं... सर्वांनीं मनाचा अखेरचा धीर करून, त्यांच्या शरिराला हात घातला.

साऱ्यांनीं बाबूजींना उचलून ताटीवर ठेवलं;... त्यांना ते ताटीवर बांधूं लागले. पण...पण...

पण काय ?... त्यावेळीं तिथं एक नवीनच प्रकरण उपस्थित झालं !...

— ११ —

चार तासापूर्वींच बाबूजींचं प्राणोत्क्रमण झालेलं; त्यामुळें, त्यांचं शरीर अगदीं ताठ झालं होतं. तेव्हा, त्यांना ताटीवर ठेवतांच, त्यांच्या तंगड्या वर झाल्या. तंगड्या नीट खालीं ठेवूं लागतांच, मिटल्या डोळ्यानें पण हसतमुख चेहऱ्यानें, ते जणूं उठून बसले. त्यांचे शखांद्याला धरून, त्यांना पुन्हां ताटीवर खालीं झोंपवूं लागतांच, त्यांनीं स्वतःच जणूं आपल्या तंगड्या वर केल्या.

बाबूजी गेल्याच्या दुःखांतच चूर असलेल्या त्या मंडळीचं प्रथम त्या गोष्टी कडे लक्षच नव्ह्तं. पण तीनचार वेळां तसलीच खटपट करून, बाबूजी आलटून-पालटून उठून बसलेले व जणूं तंगड्या झाडीत असलेले पाहून, शेवटीं, एकाला त्या परिस्थितींतही एकदम हंसूं आलं....

तो एक हंसला, तें कां, म्हणून दुसरा तिकडे पाहूं लागला–तोंच,...बाबूजी समोरच ताटीवर हंसतमुख उठून बसल्याचा त्याला भास झाला; तोही क्षणभर दुःख विसरून हसूं लागला...

त्याचवेळीं, तिसऱ्याच्या डोक्यांत एकदम बाबूजींचे ते शब्द चमकून गेले; नि तो हंसत-रडत पटकन् मोठ्यानें म्हणाला..." बाबूजीऽ...बाबूजीऽ!–म्हणालां होतां खरंऽच तुम्हीं, कीं–' तुम्हाला मी मेल्यावरसुद्धां ऽ हसवीन !'– "

तत्काळ सर्वांनाच एकदम ते शब्द आठवले; नि ताटीवर हंसतमुख बसलेल्या बाबूजींकडे पहात, त्यांच्याभोवतीं बसून, ते सारे मोठ्यानें हसूं लागले.

– १२ –

बाबूजींनीं मेल्यावरसुद्धां अशी पैज जिंकली होती !...' आपण मेल्यावर सुद्धां दुःख करीत बसण्यापेक्षां सर्वांनीं हसावं ! ' अशीच त्यांची इच्छा होती. आणि जणूं काय, म्हणूनच,... आपण अखेर ताटीवरहि हसतमुख बसूं शकूं, अशी त्यांनीं मरतांना मुद्दाम विचारपूर्वकच, ती व्यवस्था केली होती.

साऱ्यांनीं मग, शक्य तों हास्यमुख होऊनच,... बाबूजींना ताटीवर तसंच हंसतमुख बसवलं व त्यांच्या इच्छेप्रमाणेंच, दुःख न करतां,...मुंबईच्या रस्त्यांतून यांना मोठ्या समारंभानें नेलं !—

रस्त्यांतून स्मशानयात्रा जात असतांना, जाणारा प्रत्येक जण, त्या पूर्णपणें अनोळखी बाबूजींकडे पाहूनही, खुदकन् हंसत होता !...

साहजिकच आहे...बाबूजींनीं सर्वांशीं–अगदीं साऱ्या जगाशींच–जणूं पैज मारली होती..." जीतेऽ रहो पट्ठेऽ! तुम्हाला मी तर अगदीं मेल्याऽवर सुद्धां ऽ हसवीन ! !... "

त्यांनीं ती पैज शंभर टक्के जिंकली होती !

---

# न्यायदेवता ★ ७

आणखी चार महिन्यांनी पंचविशी संपूर्ण होणार असल्यामुळें, अगदीं गद्धेपंचविशींत तो शिरला असल्याचा त्यांचा निर्णय,... अगदीं वस्तुस्थितीला धरूनच होता !–आंकडेमोडीचं नी त्याचं तर सात जन्मांचं वैर ! तेव्हां त्याबरोबरच इन्कमटॅक्स खात्याचं नांव त्याच्या वडिलांनी घेतांच, सात्विक संतापानें तो गोरामोरा झाला; त्या भाषा–पदवीधराचा भाषाभिमान साऱ्या ध्येयांसह जागृत झाला; नी त्यांनीं काढलेलीं पुढलीं सारीं वैभवाचीं सुखस्वप्नं वरच्यावर हवेंत विरून, वाङ्मयसेवेचाच आपला वज्रनिर्धार त्यानें जाहीर केला !–

त्यामुळेंच तर वडिलांचा त्या दिवशीं इतका घुस्सा झाला होता, त्याच्यावर ! त्याच रागारागांत,...पांच रुपयांतून पावणेदोनशें रुपये, बेलिफांतून हेडक्लार्क, कारकुनांतून न्यायाधीश, हा. वकिलांतून चीफ जस्टीस, असलीं कित्येक समीकरणं,... खऱ्याखुऱ्या नि अनुभवसिद्ध नांव–गांव–सनांचे दाखले देऊन, त्यांनीं त्याच्यापुढें मांडलीं !...त्यांत, अनुभवी जग नि मानवी कर्तृत्व,...यांचं विश्वरूपदर्शनच साठवलेलं होतं !–

त्यानें शांतपणें तें सारं ऐकलं !—आणि तरी पुन्हां संथपणें म्हटलं, " कबूऽल... पण तेऽ दिवस आतां नाहींऽत !... "

पुढल्या दिव्य स्वर्गाची आशा धरून, ( दुबळ्या झालेल्या विश्वामित्रांना नाहक हांका मारीत ) आपण मात्र मध्येंच त्रिशंकुप्रमाणें आयुष्यभर लोंबकळत राहणं,... त्याला पसंत नव्हतं. त्या स्वर्गापेक्षां त्याला पूर्ण परिचित असलेली ही गरीब पृथ्वीच बरी वाटत होती !–

त्याच्या तसल्या स्पष्टवक्त्या आचरटपणामुळें मात्र,... त्याच्या व्यवहारी वडिलांचा राग उलट अधिकच वाढला. तरी पण, त्यावर ते दबा धरून गप्प बसले. तोहि ' सुटलों ' म्हणून हळूच काढता पाय घेऊन घरांत गेला !–

— २ —

पण थोड्याच वेळानें, त्याचे वडील एकदम त्याला हांक मारून म्हणाले, “ अरेऽ असं झालं, जस्टिस × × मला काल रस्त्यांत भेटले होते. तुला पहायचंय् त्यांना,...ते म्हणाले !...तेव्हां,... त्यांच्याकडे तुला मी आजच पाठवतों,... म्हणून म्हणालोंहि आहे काल... ”

तें नांव सर्वविश्रुतच होतं; त्यांची भयंकर गरीबी-असामान्य हुशारी-प्रचंड धडाडी-कर्तृत्वाचं तें अचाट धूमकेतुत्व-यशाचं दिव्य शिखर... कार्याचा अफाट व्याप...विरळाच आढळणारी तज्ञता, हमखास अधिकार, चौफेर पसरलेला दरारा— दबदबा...सारं सारं त्यानें पूर्वी ( पित्याकडून व वर्तमानपत्रांतूनहि ) ऐकलं होतं. तेव्हां,... त्या नांवाच्या उच्चारानें, त्याचं मन दडपलं; छाती भरून आली; गळा दाटला; जीव कासावीस झाला !

तोंच, वडील पुढें हुकमी आवाजांत म्हणाले —“ आज सुटीच आहे; तेव्हां तूं आतांच जा पाहूं मुंबईला !— मोठीं माणसं कशीं असतात, कशीं वागतात, बघावं जरा माणसानें ! ... कधीं कोणाची कोणाला कशी मदत होते, सांगतां येत नाहीं ! चल उठ, चांगले कपडे घाल, आधीं ...”

सुन्न होऊन तो अगदीं गप्प राहिला; ते आणखीहि पुढं कांहीं चार वाक्यं बोलले !... तेव्हां मग त्यानें नवीन कोट—टोपी घातली ; नी वडिलांनी तरीहि पुढं बोलणं चालूं ठेवल्यावर, तोंडाचं कुलुप व मनाचा दगड करून, मिळालेला पत्ता हातीं घेत, गपचूप स्टेशनकडे तडख चालूंच लागला तो !

— ३ —

गामदेवीला तो पत्त्यांतला रस्ता होता; आणि त्या रस्त्यावर त्यांचा तो स्वतःचाच बंगला होता!—दोन मजले चढून, तो त्यांच्या दारांत जाऊन उभा राहिला. धडधडत्या छातीनें त्यानें समोरची विजेरी घंटा वाजवली !...

क्षणभरानें,... कोणीतरी कारकुनासारखा दिसणारा वयस्क मनुष्य... दार उघडून त्याच्यापुढें उभा राहिला. तो ते नव्हत, हें ओळखण्याइतकं त्याचं डोकं ठिकाणावर होतं. तेव्हां त्यानें आपलं नांव सांगून, जस्टिसना भेटायला आल्याचं कळवलं; पण त्यांनीं म्हटलं, “आत्तांची ॲपॉइंटमेन्ट होतीऽ तुमचीऽ ? बरंऽ, कार्ड द्या पाहूं आपलंऽ !”



त्यानें आधीं नकारात्मक मान हलवली; मग दिलेल्या चिठोऱ्यावर ( पेरभर लांबच्या दोरीनें पुष्ठिपत्राला बांधलेल्या पेन्सिलीनें ) आपलं-वडलांचं नांव-गांव लिहलं; आणि मग, त्याला पुढल्या खोलींत वाट पहात निमूट बसावं लागलं !— सुमारें वीस मिनटं तो गपचूप पहाणी करीत होता.

भिंती ओक्याओक्याच होत्या ! फक्त दोन तीन ठिकाणीं, ( फ्रेम केलेल्या पण--हळूहळू तुकडे पडूं लागलेल्या) ऐतिहासिक डिग्ऱ्या नी (तारखा गेलेलीं) दोन-तीन जुनीं कॅलेंडरं... भिंतीवर दिसत होतीं. त्याच्या जन्मापूर्वी विकत घेतलं असावं असं दिसणारं,...एक काळवंडलेल्या तबकडीचं घड्याळ, खपल्या पडलेल्या भिंतीवर लटकवलेलं दिसत होतं ! त्यांतला बुरसलेला हिरवा-काळा पितळी हलता लोलक, ‘आला क्षण— गेला क्षण’ म्हणत, निघून चाललेला काळ मोजत होता !— आणि त्यावरूनच पुन्हा भानावर येऊन,... त्याला जाणाव झाली—‘बराऽच वेळ झाला कीं आपल्याला—’

इतक्यांत, मघाचे ते कारकूनवजा मनुष्य बाहेर येऊन,...त्याला कुजबुजून हळूंच म्हणाले, “ साहेब आंत बोलावताहेत तुम्हाला; पण हें पहाऽ...घाई आहे बरं का त्यांना जरा...लेखी ॲपॉइंटमेंटशिवाय आलांत हें आधीं चुकलंच... ”

त्याला जरा प्रश्नच पडला. सुटीच्या दिवशींहि घाई असेल त्यांना तर त्याला तरी कुठं त्यांना भेटायला वेळ होता ?... आणि उगीच भेटण्यासारखं तरी काय होतं ?... त्यांनींच ना आपल्याला पाठवून द्यायला सांगितलं होतं. स्टँप कागद का करायला हवा होता आगाऊ ? पग घरीं एखाद्या वेळेस आपल्याला आपले वडील रागावतील या भीतीच्या कल्पनेनेंच तो बिचकत बिचकत आंत शिरला !...नी त्याची दृष्टि तिथल्या ‘ साहेबां ’ ना प्रथम शोधूं लागली !—

— ४ —

आंतल्या खोलींत रंग उडालेल्या वाटोळ्या शिसवी टेबलाजवळ समोरा-समोर दोनच जुनाट खुर्च्या होत्या. त्यापैकींच एकीवर ‘ साहेब ’ बसले होते.

गुडघ्याखालपर्यंत जेमतेम पोंचणारं धोतर,लहानमोठ्या व्यासांचीं अनेक वर्तुळं असलेला ( पूर्वी पांढरा असलेला पण आतां काळसर रंगाकडे झुकणारा ) गंजीफ्राक, धोब्याकडे द्यायला झालेलं, पीळ पडलेलं दोरखंडवजा लोंबणारं जानवं गळ्यांत, सोनेरी काळसर काड्यांचा कपाळावर चढलेला चष्मा, किलकिले डोळे, गुळगुळीत काळसर चेहरा नी तुळतुळीत टाळू...

समोरच्या वाटोळ्या टेबलावर कागदांचा पुष्कळ ढीग पडला होता; नी त्या ढिगाजवळच एक जुनं टाइमपीस उभं राहून टकटकत होतं.

तो आंत शिरतांच, गंभीर चेहऱ्यानें त्यानीं एकदां त्याच्या बाजूस वर पाहिलं; त्याला हातानें बसायला सांगितलं;...नी मग पुन्हां कागदांत त्यांची दृष्टी बुडाली!–

तिऱ्हाइताला रद्दी वाटणारे खूप कागद पुडक्यापुडक्यांनीं कोपऱ्याकोपऱ्यांतून रेकॉर्डावर ठेवले होते!... मोठमोठ्या पुस्तकांचीं तीनचार उंच कपाटं होतीं. कोपऱ्यांतल्या चौकोनीं टेबलावर उघड्या पुस्तकांचे नि अस्ताव्यस्त टाकलेल्या उघड्या कागदपत्रांचे तीन चार ढीग सैरावैरा पडले होते; टेबलाखालीं,... फाडलेल्या कागदांच्या चिठोऱ्या वाऱ्यावर उडत होत्या. धोब्याकडे टाकायच्या मळक्या कपड्यांचा ढीग तिथंच पडला होता.

— ५ —

तेवढ्यांतच,... मान वर करून, गालाला किंचित् सूक्ष्म खळगी पाडत, ते त्याला म्हणाले, “ हंऽ रावसाहेब बरेऽ आहेत नाऽ ? ”

तो उत्तरादाखल लागलीच ‘हो’ म्हणाला खरा; पण मग कालच तर दोघांची भेट झाली होती. त्यांनीं एकमेकांशी हितगुजहि केलं होतं, म्हणे ! आणि पुन्हां आज सकाळींच त्याला त्यांनीं तोच प्रश्न विचारावा ? हें कोडं मात्र त्याला जरा चमत्कारिक वाटलं !–

तेवढ्यांत, पुन्हां त्यांनीं समोरचे कागद वरखालीं केले ! तिथं नांदणाऱ्या अस्वाभाविक शांततेमुळें,... त्याचा जीवहि तसाच वरखालीं होत होता.

त्यानंतर आतां पुढं कोणता प्रश्न येणार, याचा तो साशंक मनानें विचार करीत होता; कारण, त्याच्या वडिलांच्या म्हणण्याप्रमाणें जस्टिसना त्याच्याबरोबर खूप बोलायचं होतं. आपल्या मित्राच्या तरुण मुलाचे विचार, त्यांना मोकळेपणें समजून घ्यायचे होते, म्हणे !...आतां जग बदललं...पिढी बदलली... तरुणांची दृष्टीच साफ बदलली...ती समजून घेतली पाहिजे, असंहि म्हणे ते काल म्हणाले होते !—

“बी. ए. झालास नाऽ? .. ” कांहीं वेळ तसाच गेल्यावर, त्यांनीं आपला चष्मा काढला, पुसला, पुन्हां कपाळावर ठेवला नि तो मग डोळ्यावर ओढत त्याच्याकडे पाहून विचारलं.

“होऽ” तोहि तितक्याच थंडाईनें,...त्यांच्या त्या निर्विकार चेहऱ्याकडे पहात त्यावर म्हणाला.

त्याक्षणीं त्याला भयंकर मोठं कोडं पडलं होतं, तें त्याच्या वडिलांविषयीं ! आणि समोर बसलेल्या त्यांच्या त्या सुप्रसिद्ध विद्वान् मित्राविषयींहि!–वडिलांच्या काल झालेल्या साक्षीची ती कोर्टानें घेतलेली उलटतपासणी तर नव्हती ना ?–



आणि त्याच्या मनांत एक विचार आला, “मग काल हे दोघे माझ्या-
विषयीं असं बोलले तरी काय ? आणि आज मला वडिलांनीं असं मोठ्या अग-
त्यानें यांच्याकडे घाईघाईनें पाठविलं आहे,... तें तरी कां ?”

पण असा विचार करतां करतांच, तो एकदम केवढ्यानें तरी दचकला !–
कारण,... त्या वाटोळ्या टेबलावरील तें वाटोळं घड्याळ, जणू काय,... त्याच्या-
कडेच पाहून, मोठमोठ्यानें बोंबलत होतं !

इतक्या उशीरां न्यायाधीश सकाळीं उठतात, असं गृहित धरणं त्याला क्षण-
भरहि शक्य वाटेना. मग, शांत, अबोल न्यायाधीशांच्या खोलींत एकमेव टकटक
करणाऱ्या त्या घड्याळाचा,... त्यावेळीं तसा अवेळीं गजर कां झाला ? त्यांच्याच
तालमींत वाढलेल्या त्या जुनाट यंत्राचा तो कांटेकोर वक्तशीरपणाहि त्याला
कौतुकास्पदच वाटला !–

तोंच–‘ ॲलार्म ’चा कांटा ‘ सायलेंट ’ च्या बाजूस ओढत, ते त्याच्याकडे साभिप्राय पाहूं लागले !–क्षणभरांत जागचे उठलेहि...

— ६ —

तेवढ्यावरूनच त्यानें सारं ओळखलं. तो आंत येण्यापूर्वीं त्यांनीच तो गजर लावला असावा ! नी आतां त्यापुढें, त्यांच्या व्यग्र आयुष्यांत दुसरं एखादं काम असल्यामुळें,... त्या घड्याळाच्या कांट्याबरोबरच त्यांनींहि एकदम ‘ सायलेंट, ’ होण्याची वेळ आली होती !...

त्या यंत्राचं तें चोख काम, मोजका प्रेमळपणा नी अफाट मोठेपणा त्याला पटकन् पटला;... नी तो झटकन् उठून उभा राहिला !–

तेहि त्याच्या त्या हालचालींकडे अपेक्षित दृष्टीनें पाहून म्हणाले, “ बरंऽमग येत जाऽ कीं कधींतरीऽअसाच!... नी रावसाहेबांना माझा नमस्कार सांग ! बरंऽ कां ?– ”

तो यांत्रिकपणें पायऱ्या उतरला !...त्यावेळीं, त्याला मंडलीकांचीहि ऐति-
हासिक आख्यायिका आठवली. मग, आपल्या वडिलांचा त्यादिवशींचा राग
आठवला ! दोन मिनिटांपूर्वी कानावर एकदम आपटलेला गजर आठवला ! नी
अखेरच्या, त्यांच्या त्या ‘रावसाहेबांच्या नमस्कारा’ चीहि त्याला आठवण झाली !–

त्यानें न्यायदेवतेच्या त्या भावशून्य घड्याळाला, (विस्मयादरानें पण भीतीनेंच) चालतां चालतां कोंपरापासून नमस्कार केला !

———

## विद्यार्थ्यांचीं टिपणें—

[ प्रत्येक 'प्राण्या'च्या अभ्यासावेळीं व चर्चेवेळीं स्वतः करावयाच्या नोंदी ]

१. स्वभावविशेष व तत्सूचक प्रसंग योजना—

२. प्रसंगानुक्रम (कालानुसार व रचनानुसार)—

३. मुख्य प्रसंग; मांडणी; सुरवात – मध्य – शेवट विशेष—

४. मुख्य पात्रें; दुय्यम पात्रें व त्यांची आवश्यकता—

५. वर्णन-शैली— हुबेहूब शब्दचित्रें, रूपकात्मक वर्णनें, आकर्षक संवाद, सूक्ष्म निरीक्षण, हृद्य भावना, सखोल विचार इ.—

६. भाषा-शैली— उपमा-अलंकार, सूचकता, ओघ, विशेष वाक्यरचना, विशेषणें-क्रियाविशेषणें, वाक् – प्रचार – म्हणी, विशेष शब्दयोजना इ.—

— व्यक्तिगत एकवाक्यी मतप्रदर्शक शेरे —

परिशिष्ट

पहिले सात

# मासलेवाईक प्राणी

## [ स्थूल मार्गदर्शन ]

[ –१– ]

### शिस्तीचा शिलेदार

१. काकाजींच्या पुढील उद्गारांवरून त्यांच्या स्वभावाच्या कोणत्या छटा दिसून येतात तें सांगा :—

(१) " तुझ्या बापानें तुला उधळण्यासाठीं नाहींत पैसे ठेवलेले. निर्लज्ज !—लाखाचे बारा हजार करणारा !—जा—आधीं त्या गाडीवाल्याला पकडून आण... माझ्यासमोर..."

(२) " उद्यां तो जगाला ओरडत सांगेल, 'काकाजी वाण्याचा बच्चू गाढव आहे' म्हणून !...मला नाहीं सहन होणार हें..."

(३) " पण आपण मघांपासून बिड्या खिडकींतून अंगणांत भिरकावतां. आतां शिस्त काय माझ्यासारख्यांनीं शिकवायची थोडीच या वयांत आपल्याला ? "

(४) " अरे कोण रे ऽ कुठं चाललास ? गांव कोण तुझं ?..."

२. सुमारें पंचवीस ओळींत काकाजींचें व्यक्तीचित्र रेखाटा.

३. उन्हाळ्यांतील दुपारच्या वेळीं रखरखणाऱ्या उन्हांत खेडेगांवची सजीव व निर्जीव सृष्टि कशी दिसते तें दहापंधरा ओळींत वर्णन करा.

[ -२- ]

**फणसाचे गरे**

४. 'फणसाचे गरे' या लेखाचें शीर्षक त्यांत वर्णिलेल्या मनुष्यस्वभावाचें कसें यथार्थ वर्णन करणारें आहे तें स्पष्ट करा.

५. 'फणसाचे गरे' मधील 'मी' चें थोडक्यांत स्वभाववर्णन करा.

[ -३- ]

**कावळे हेडसर**

६. "त्याच्या कमी बोलण्यांत, कमी हसण्यांत, हेरणाऱ्या दृष्टींत न् अस्वस्थ हालचालींत केवढा गहन अर्थ भरला होता!" ह्या 'कावळे हेडसर'ला उद्देशून लिहिलेल्या शब्दांची सोदाहरण चिकित्सा करा.

७ 'कावळे हेडसर'चें आटोपशीर 'आत्मवृत्त' तयार करा.

[ -४- ]

**स्थितप्रज्ञ**

८. अण्णा वैद्यांची 'दिनचर्या' लिहा.

९. 'अण्णांचें वृत्तपत्रवाचन' एकदोन परिच्छेदांत वर्णन करा.

१०. अण्णा वैद्यांना 'स्थितप्रज्ञ' कां म्हटलें आहे ?

[ -५- ]

**परमेश्वरी प्रकाश**

११. 'परमेश्वरी प्रकाश ही एका हतभाग्याची करुण कहाणी आहे' असें म्हटलें तर तें कितपत उचित ठरेल ?

१२. खंडाळेकराकडे पाहण्याचा लेखकाचा दृष्टिकोण उलगडून सांगा.



[ -६- ]

**बाबूजी**

१३. बाबूजींची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि कशी उदार व सहानुभूतिपर होती तें उदाहरणें देऊन सांगा.

१४. नात्यागोत्याचें कोणीहि नसलेल्या बाबूजींसारख्या एकट्या जीवाला आपलें जीवन कसें सुसह्य व सुखी करतां आलें तें थोडक्यांत निवेदन करा.

१५. बाबूजींच्या स्वभावाचे विशेष सांगा.

[ -७- ]

**न्यायदेवता**

१६. 'न्यायदेवते'चें छोटेखानी 'स्वभावचित्र' रेखाटा. त्यांतील न्यायाधीशाबद्दल तुमचें काय मत बनलें तें सविस्तर सांगा.

**सर्वसाधारण प्रश्न**

१७. तुम्हीं वाचलेल्या सामंतकृत व्यक्तिचित्रांपैकीं तुम्हांला सर्वांत अधिक कोणतें आवडलें व तें कां आवडलें तें सांगा.

१८. व्यक्तिचित्रांत वर्णिलेल्या व्यक्तीचा स्वभाव कोणकोणत्या गोष्टींवरून दिसून येतो.

१९. व्यक्तिचित्रांत संवादाच्या चतुर योजनेला कसें महत्त्व आहे तें सांगा; संवादानें स्वभावरेखनास कशी मदत होते तें लिहा.

२०. 'सामंतकृत व्यक्तिचित्रांतील टिंबें, उद्‍गारचिन्हें, रेघा वगैरेंचा उपयोग या विषयावर, पुस्तकाच्या आधारें, चर्चात्मक निबंध लिहा, आपलें म्हणणें उदाहरणें देऊन स्पष्ट करा.

—भि. अ. परब

—रघुवीर सामंत संपादित—

★

**आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं द्या!**

जुन्या नऊ पुष्पांच्या गटाची दुसरी आवृत्ति तयार होत आहे.

नव्या पद्धतशीर पुस्तकांचे गट
छापून तयार होत आहेत.
लौकरच प्रकाशांत येतील.

---

**मराठींतील मानसशास्त्रीय दृष्टीनें तयार केलेलें बालवाङ्मय**